रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक २२४ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. ११ जानेवारी २०२५

किंमत ४ ₹


## भारताच्या हायड्रोजन ट्रेनची जगभरात चर्चा

**नवी दिल्ली :** भारतीय रेल्वेने अजून एक मोठी कामगिरी फत्ते केली आहे. भारतीय रेल्वे विभागाने जगातील सर्वात शक्तिशाली हायड्रोजन ट्रेन विकसीत केली आहे. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी गुरुवारी याविषयीची माहिती दिली. भारतीय रेल्वेने हायड्रोजन इंधनावर चालणारे ट्रेन इंजिन जगातील सर्वाधिक हॉर्स पॉवरचे इंजिन आहे.जगातील केवळ चार देशांकडेच असे ट्रेन इंजिन आहे. ते पण ५०० ते ६०० हॉर्स पॉवर दरम्यान असलेल्या इंजिनाचे उत्पादन करतात. तर भारतीय रेल्वेने स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर करत हे इंजिन विकसीत केले आहे. या इंजिनाची क्षमता१२०० हॉर्स पॉवर अशी आहे. रेल्वे मंत्री वैष्णव यांनी सांगितले पान २ वर

## जरांगे पाटलांची प्रकृती बिघडली

**जालना :** बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. या हत्येनंतर राजकीय वातावरण ढवळून निघालं आहे. गेल्या काही दिवसांपासून संतोष देशमुख यांना न्याय मिळावा या मागणीसाठी सातत्याने मोर्चे काढले जात आहेत. या मोर्चाला सर्वपक्षीय नेते हजेरी लावत आहे. मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील हे देखील संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना अटक करावी अशी मागणी करत आहेत. त्यातच आता मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती बिघडली आहे. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ आज जालन्यात पान २ वर

**वेधक**

### शाळेत अल्पवयीन मुलीची आत्महत्या

**मुंबई :** मुंबईतल्या एका आंतरराष्ट्रीय दर्जा असलेल्या शाळेत अल्पवयीन मुलीने आत्महत्या केल्याची घटना घडली. या मुलीचा मृतदेह शाळेच्या प्रसाधनगृहात आढळून आला. ही मुलगी ११ वीला शिकत होती. तिने बुटाच्या नाडीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची माहिती पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील यांनी दिली. या प्रकरणात आरे पोलीस ठाण्यात आत्महत्येचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ११ वीत शिकणारी ही मुलगी गेल्या दोन पान २ वर

### नृत्यशिक्षकाला पोलीस कोठडी

**पुणे :** कर्वेनगर येथील नामांकित शाळेत अल्पवयीन बालकांवर अनैसर्गिक लैंगिक अत्याचार करणाऱ्या नृत्य शिक्षकाने या अत्याचाराचे चित्रीकरण केल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले आहे. गुन्ह्याच्या पुढील तपासासाठी न्यायालयाने शिक्षकाला १३ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणी नृत्य शिक्षकाच्या विरोधात दोन गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी पहिल्या गुन्ह्यात न्यायालयीन कोठडीत असलेल्या पान २ वर

# धान्य स्वस्त, नागरिक त्रस्त

- पनवेलच्या ३२ गावांमध्ये धान्य दुकानाचा अभाव
- लाभार्थ्यांना धान्यासाठी करावी लागते दोन ते चार किलोमीटरची पायपीट

| अलिबाग | प्रतिनिधी |

**रायगडमध्ये एक हजारहून अधिक स्वस्त धान्य दुकाने आहेत. सुमारे चार लाखाहून अधिक लाभार्थी आहेत. या लाभार्थ्यांना स्वस्त धान्य दुकानातून तांदूळ, गहू बरोबरच इतर वेळेला साखर, डाळ आदी जिन्नस दिल्या जातात. गोरगरीबांना उभारी देण्यासाठी हा उपक्रम गेल्या अनेक वर्षापासून आहे. स्वस्त धान्य दुकानातून मोफत धान्य दिले जाते. या योजनेचा लाभ घेणाऱ्यांची संख्यादेखील प्रचंड आहे. परंतु अनेक गावे, वाड्यांपासून स्वस्त धान्य दुकाने लांब असल्याने लाभार्थ्यांना पायपीट करावी लागते. काही लाभार्थी पाच ते सात जणांचा ग्रुप करून रिक्षा व अन्य वाहनाने धान्य त्यांच्या घरापर्यंत पाठवण्याची व्यवस्था करतात. त्यासाठी लाभार्थ्यांना अधिक पैसे मोजावे लागत आहे.**



### नवीन दुकानाची मागणी करूनही मान्यता देण्यास टाळाटाळ

रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागाची लोकसंख्या १६ लाखहून अधिक असून दोन हजारहून अधिक गावे, वाड्यांचा समावेश आहे. जिल्हयात वेगवेगळ्या ठिकाणी रास्त भाव दुकान आहेत. परंतु गावे, वाड्यापासून ही दुकाने दोन ते चार किलो मीटर दुर असल्याने अनेकांना धान्य आणण्यासाठी आर्थिक भुर्दंड बसतो. त्यामुळे काही गावांतील नागरिकांनी नवीन दुकानासाठी अर्ज केले होते. परंतु वेगवेगळी कारणे दाखवून या दुकानांना परवानागी देण्यास आली नसल्याची माहिती समोर येत आहे. प्रशासनाकडून मान्यता देण्यास टाळाटाळ होत असल्याची प्रतिक्रीया नागरिकांकडून उमटत आहे.

> नवीन रास्त भाव दुकानासाठी शासनाकडून जाहीरनामा काढण्याचे वेळोवेळी आदेश येतात. सध्या त्याबाबत काहीच आदेश आले नाहीत. परंतु ज्या नागरिकांना दुकान लांब पडत असेल, त्या गावांतील नागरिकांनी तहसीलदार यांना नवीन दुकानासाठी अर्ज करावे. त्यानुसार पुढील कार्यवाही केली जाईल.
> सर्जेराव सोनावणे – जिल्हा पुरवठा अधिकारी

पनवेल तालुक्यातील ७१ ग्रामपंचायत हद्दीतील तब्बल ३२ गावांमध्ये रास्त भाव धान्य दुकान नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे नागरिकांना इतर गावांमध्ये धान्य आणण्यासाठी जावे लागत आहे. यात काही आदिवासी वाड्यांचा देखील समावेश आहे.

निताळे, कोळवाडी, खैरवाडी, तामसई, कोंडले, दुन्दराई, देहरंग, वाघाची वाडी, गाडे, आंबिवली, विहिघर, शिलोत्तर रायचूर, डेरवली, कोळखेपेठ, माची प्रबळ, शेडूंग, पोयंजे कातकरवाडी, जाताडे, दापिवली, चिरवत, देवळोली बुद्रुक, पारगाव डुंगी, वाघिवली, तरघर, पाडेघर, सोनखार, खारकोपर, कर्नाळा, घेराकिल्ला माणिकगड, कालीवली, माडभुवन, कोरळ या ठिकाणी रास्त भाव धान्य दुकान नसल्याची माहिती पुरवठा विभागाकडून देण्यात आली. त्यामुळे नागरिकांना इतर गावांमध्ये हेलपाटे घालत धान्य घेण्यासाठी जावे लागते. मोफत धान्य घेण्यासाठी रिक्षा किंवा इतर वाहन करून त्यांना शंभर ते दीडशे रुपये देऊन प्रवास करावा लागतो. गेल्या कित्येक वर्षांपासून प्रशासनाला प्रत्येक गावामध्ये रेशनिंग दुकान सुरू करण्यात पान २ वर

# पतीने केली पत्नीची हत्या

| खोपोली | प्रतिनिधी |

अज्ञान कारणावरून पतीने पत्नीचा ओढणीच्या सहाय्याने गळा दाबून खून केल्याची घटना खोपोली शहरातील लौजी परिसरात घडली आहे. शितल गणेश घोडके (२८) असे मृत पत्नीचे नाव आहे. गणेश दादासाहेब घोडके (३२) हा घटनास्थळावरून पसार झाला होता. या घटनेमुळे खोपोलीत खळबळ उडाली. ही घटना बुधवारी (दि.८) रात्री घडली. खोपोली पोलिसांनी अवघ्या बारा तासांत पतीला साताऱ्यातून ताब्यात घेतले.

खोपोली पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, खोपोलीत उदय विहार भागात सुखकर्ता आपर्टमेंटमध्ये गणेश घोडके व त्याची पत्नी शीतल घोडके हे मागील तीन चार महिन्यांपासून राहत होते. लग्नाला पाच वर्षे झाली तरी त्यांना मुलबाळ नव्हते. दोघे पती-पत्नी एकमेकांवर चारित्र्यावरून संशय घेत होते. त्यामुळे त्यांचे कायम भांडण होत.

बुधवारी रात्री त्यांच्यामध्ये कडाक्याचे भांडण झाले. गणेशने पत्नी शीतल हिचे डोके दोन-तीन वेळा भिंतीवर आपटले. त्यानंतर तिचा गळा आवळला. त्यात तिचा जीव गेला. पत्नीची हालचाल होत नाही, हे पाहून त्याने त्याच्या मित्राला आशुतोष देशमुख यांस फोन करून बोलावले व घडलेला प्रकार सांगितला. आशुतोषने गणेशला पोलिसांत जाण्याबाबत सांगितले. पण गणेश काही तयार झाला नाही. तेव्हा आशुतोष खोपोली पोलीस ठाण्यात आला. दरम्यान, गणेशने पत्नीचा मृतदेह बाथरूममध्ये टाकला व तो आपली कार घेऊन पसार झाला. पोलीस घटनास्थळी गेले असता त्यांना शीतलचा मृतदेह बाथरूममध्ये सापडला. पण गणेश मिळून आला नाही. गणेश आपली कार घेऊन साताऱ्याच्या दिशेने जात असल्याचे समजताच सातारा टोल नाक्यावर पान २ वर

## आईनेच केली लेकराची हत्या

**मुंबई :** एका ३६ वर्षीय महिलेने तिच्या १० वर्षांच्या मुलाची वायरने गळा आवळून हत्या केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. मुंबईतील वांद्रे परिसरात गुरुवारी संध्याकाळी ही घटना घडली. अभिलाषा औटी असं या महिलेचं नाव आहे. महत्त्वाचं म्हणजे आरोपी महिलेला स्क्रिझोफेनिया हा आजार असून त्यातून तिने ही हत्या केल्याचं पुढे आलं आहे. याप्रकरणी आता पोलिसांनी महिलेविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या पान २ वर

## बदलापूर-खोपोली लोकल बंद

**कर्जत येथे रविवारी वाहतूक ब्लॉक**

| कर्जत | प्रतिनिधी |

मध्य रेल्वेच्या कर्जत येथील यार्डमध्ये सुधारणा तसेच कर्जत स्थानकावरील पायाभूत कामे पूर्ण करण्यासाठी रविवारी (दि.१२) विशेष वाहतूक ब्लॉक घेण्यात आला आहे. ब्लॉक कालावधीत बदलापूर-खोपोली लोकल सेवा बंद ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे अनेक लोकल अंशतः रद्द करण्यात येणार आहेत.

मध्य रेल्वेवरील पळसधरी आणि भिवपुरी रोड स्थानकांदरम्यान अप, डाऊन आणि मधल्या मार्गिकेवर रविवारी दुपारी १.५० ते ३.३५ या कालावधीत ब्लॉक घेण्यात आला आहे. ब्लॉक कालावधीत बदलापूर-खोपोली स्थानकांदरम्यानची लोकल सेवा बंद करण्यात येणार आहे. रविवारी दुपारी १२.२० वाजता सुटणारी सीएसएमटी खोपोली आणि दुपारी १.१९ वाजता सुटणारी सीएसएमटी-कर्जत लोकल अंबरनाथपर्यंत चालवण्यात येणार आहे. दुपारी १.४० वाजता सुटणारी सीएसएमटी-कर्जत लोकल बदलापूरपर्यंत चालवण्यात येणार आहे.

रविवारी दुपारी पान २ वर

# १३ जानेवारीपासून विद्यार्थ्यांची नोंदणी

## ८ हजार ६२४ खासगी शाळांची आरटीई पोर्टलवर नोंद

| रायगड | प्रतिनिधी |

आपल्या पाल्यास चांगल्या इंग्रजी शाळेत प्रवेश मिळावा, अशी इच्छा गरजू पालकांची असते. यासाठीच राईट टू एज्युकेशन अंतर्गत प्रवेश दिले जातात. आरटीई प्रवेश प्रक्रियेचा पहिला टप्पा पूर्ण झाला आहे. आता विद्यार्थी नोंदणी सुरू होणार आहे. त्यासाठी १३ जानेवारी ही तारीख निश्चित करण्यात आली आहे. राज्यातील ८ हजार ६२४ खासगी शाळांनी आरटीई पोर्टलवर नोंद केली असून त्या माध्यमातून १ लाख ५ हजारवर जागा उपलब्ध होणार.



शाळा नोंदणीचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून १३ जानेवारीपासून विद्यार्थी नोंदणीस सुरुवात होणार आहे. या वर्षी १८ डिसेंबरपासून शाळा नोंदणीची प्रक्रिया सुरू झाली होती. मात्र, यात उदासीनता दिसून आल्याने अपेक्षित नोंदणी शाळा पातळीवर झाली नव्हती. म्हणून ४ जानेवारीपर्यंत मुदत वाढवून देण्यात आली होती. आता पुन्हा एकदा मुदतवाढ मिळाली आहे.

सध्या अनेक शाळांची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. प्रवेश प्रक्रिया सुरू करीत जानेवारीत ती पूर्ण करण्यात येते. पान २ वर

# राज्य मंडळाकडून बारावीच्या परीक्षेचे प्रवेशपत्र उपलब्ध

| पुणे | वृत्तसंस्था |

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) फेब्रुवारी-मार्चमध्ये घेतल्या जाणाऱ्या बारावीच्या परीक्षेचे प्रवेशपत्र शुक्रवारपासून (दि.१०) पासून ऑनलाईन उपलब्ध होणार आहे. शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रवेशपत्र मुद्रित करून विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, त्यासाठी कोणतेही वेगळे शुल्क आकारू नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

राज्य मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली.

राज्य मंडळातर्फे बारावीची लेखी परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत होणार आहे. दरवर्षीच्या तुलनेत यंदा काही दिवस लवकर परीक्षा होणार आहे. कुलाळ यांनी दिलेल्या माहितीनुसार, बारावीच्या परीक्षेचे प्रवेशपत्र राज्य पान २ वर

### प्रवेशपत्रातील दुरुस्ती

प्रवेशपत्रामध्ये नाव, आईचे नाव, जन्मतारीख अशा दुरुस्त्या करायच्या असल्यास त्या ऑनलाईन पद्धतीने करायच्या आहेत. त्यासाठी दुरुस्ती शुल्क भरून दुरुस्त्या विभागीय मंडळाकडे मान्यतेसाठी सादर कराव्यात. विभागीय मंडळाच्या मान्यतेनंतर सुधारित प्रवेशपत्र उपलब्ध होणार आहेत. विषय, माध्यम बदल असल्यास प्रचलित पद्धतीनुसार विभागीय मंडळात संपर्क साधून दुरुस्त्या कराव्यात.






## ऑनलाईन आर्थिक लुट करणाऱ्याचा उपद्रव

| अलिबाग | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील वावे, उसर परिसरात एका भामट्याने ऑनलाईन आर्थिक लुट करण्याचा उपद्रव सुरु केला आहे. मासळी विक्रेत्यांपासून भाजी व हॉटेल व्यवसायिकांना टारगेट करून त्यांच्याकडून आर्थिक लूट करीत असल्याचा प्रकार घडत आहे. याबाबत रेवदंडा पोलिसांकडे माहिती देऊनही पोलिसांकडून कोणतीही कारवाई केली जात नसल्याचा आरोप व्यवसायिकांकडून करण्यात येत आहे. पोलिसांच्या या भूमिकेबाबत नाराजीचे सुर उमटत असून चोरट्यांना पोलिसांकडून अभय दिला जात आहे, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

> संबंधित घटनेची माहिती माझ्यापर्यंत आली नाही. परंतु याबाबत माहिती घेऊन संबंधिताविरोधात कारवाई केली जाईल.
> श्रीकांत किरवले– सहाय्यक पोलीस निरीक्षक, रेवदंडा

सायबर गुन्हेगारी रोखण्यासाठी जिल्ह्यात सायबर पोलीस ठाणे सुरु करण्यात आले आहे. ऑनलाईन फसवणूक व आर्थिक लुट होऊ नये. तसेच वेगवेगळ्या आकर्षक जाहिरातीला फसू नका असे आवाहन पोलिसांकडून कायमच केले जात आहे. जिल्ह्यात ऑनलाईन लुट रोखण्यासाठी पोलिसांकडून जनजागृती पान २ वर

### पोलीस अंमलदाराचा अजब कारभार

**ऑनलाईन आर्थिक लुट करणाऱ्याविरोधात तक्रार करण्यासाठी व्यवसायिक पोलीस ठाण्यात दाखल झाले. त्याठिकाणी असलेल्या महिला अंमलदारांच्या ही बाब लक्षात आणून दिली. तक्रार करू नका, त्याला शोधून आणतो. त्यानंतर तुम्हाला बोलावले जाईल .त्यावेळी तुम्ही पोलीस ठाण्यात या असे सांगून पोलीस अंमलदारांनी कारवाई करण्यास टाळाटाळ केली. पोलीस अंमलदारांच्या अजब कारभाराबाबत आश्चर्य व्यक्त केला जात आहे.**




# उद्योग गुजरातला नेण्याचा डाव हाणून पाडणार

## कामगार नेते भाई जगताप यांचा इशारा



**। खोपोली । वार्ताहर ।**

**पारले कंपनी सतरा वर्षापासून सुरू असताना कामगारांच्या सहकार्यातून कंपनी सुरळीतपणे चालू होती. बिस्कीट हा लोकांच्या रोजचा आवडीचा असताना अचानक बिस्किट कंपनी डबघाईला कशी आली असा सवाल कामगार नेते आ.भाई जगताप यांनी करीत खालापूरात जमिनींना सोन्याचा भाव आल्याने कंपन्या विकून उद्योग गुजरातला घेवून जाणाच्या डाव सुरू आहे. शेवटपर्यंत लढण्याची ताकद आमच्यात असल्याने कामगारांसाठी लढणार असल्याचा इशारा आ.जगताप यांनी पारले कंपनी व्यवस्थापनाला दिला.**

खालापूर तालुक्यातील खिरकंडी गावातील पारले कंपनीतील १४ कामगारांना दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित करण्याची नोटीस दिली आहे. तसेच कामगारांवर अन्याय केला जात असल्यानेच न्याय मिळण्याच्या उद्देशाने कंपनीतील १९४ कामगारांनी भारतीय कामगार कर्मचारी महासंघाचे सदस्यत्व स्वीकारल्यानंतर संघटनेचे सरचिटणीस आ.भाई जगताप यांनी पारले कंपनीसमोर जंगी गेट सभा आयोजित केली होती. यावेळी अध्यक्ष दिलीप जगताप, उपाध्यक्ष सदानंद चव्हाण, रवींद्र नेमाणे कोषाध्यक्ष एस.आर.सावंत उपस्थित होते.

पारले कंपनीत सुरू झाल्यामुळे कंपनीत काम करतो,येथील झाडही आम्ही लावली आहेत.कंपनीतील पूर्वीचे मॅनेजर कामगारांशी चांगले वागत होते.परंतु सध्याचा मॅनेजर जुना वाद काढत कामगारांवर राग काढत कामगारांवर खोटे गुन्हे दाखल करीत असल्याचे काम गारांनी बोलताना सांगितले.ऐन दिवाळीत लोकं फटाके वाजवून दिवाळी साजरी करीत असताना आमच्यावर कंपनीने अन्याय केला त्यावेळेस न्याय मिळविल्यासाठी कामगार फिरत महादेव भारकड यांनी बोलताना सांगितले.

मलीदा खाल्यावर कंपनी बंद करणार असल्याचे सांगत असाल येणाऱ्या काळात कामगारांच्या न्याय हाक्कासाठी मोठा संघर्ष करायची तयारी आमची आहे असा इशारा संघटनेचे उपाध्यक्ष रविंद्र नेमाणे यांनी देत कामगरांकडून चुका होत असतील तर त्या समजून घेण्यासाठी एका टेबलावर बसून चर्चा करण्यासाठी कामगार आणि व्यवस्थापकांनी एक पाऊल पुढे येण्याचे भावनिक अवाहन रविंद्र नेमाणे यांनी सभेत केले आहे.

कामगारांच्या मेहनतीने उभं राहिलेला पारले बिस्कीट कंपनीचा गोड पाहिजे होता १७ वर्षानंतर बिस्किट कडु कसा झाला असा सवाल भाई जगताप यांनी विचारत कामगार रोजीरोटीसाठी रस्त्यावर आलेत गुन्हेगार नाहीत. अन्यायाविरोधात लढण्याचा अधिकार डॉ. आंबेडकरांनी राज्यघटनेतून दिला आहे म्हणून कोणाच्या बापाला घाबरायच नाही असे जगताप यांनी सांगत मुंबईत तुमची दादागिरी मोडीत काढली आहे. कंपनीत नेते येतात पाकीट घेवून जातात परंतु आपली युनियन कामगारांचा करार करणारी आहे. कामगारांच्या हितासाठी दोन पावले मागे येणारी आहे.

कंत्राटी कामगार गुलाम असतो परंतु कंत्राटी कामगार कायमस्वरूपी होतो हे मस्को कंपनीमधून दाखवून दिलंय,अन्याय अत्याचारीची चिंता करू नका संधी देवू आडचणी सांगा,कामगारांचा आडचणी सांगा. कंपनीत काम करताना पक्षाचा लेबल लावू नका,मी कधीही काँग्रेसची पावती फाडू नका असे सांगतिले नाही. इव्हिएम घोटाळा झाला म्हणूनच आमचं सरकार आले नाही, आम चा सरकार आल्यावर कामगार मंत्री होणारच असा विश्वास भाई जगताप यांनी व्यक्त करीत दिल्लीतील रंगा भिल्ला कायदे रदद करीत असल्याची टिका करीत गेट मिंटीग झाल्यावर कामगार परत कंपनीत येतील अस नाही आपण लढाई लढून सन्मानाने परत आणू असा शब्द जगताप यांनी कामगारांना देत युनियन लावली म्हणून कंपनीत दादागिरी करू नका काम करून प्रोडक्शन वाढवा असा सल्ला कामगारांना दिला आहे.

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मौजे खारपेढांबे, ता.अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| खारपेढांबे | ४१ | ००-४९-७०<br>पो.ख.००-०३-००<br>एकूण ००-५२-७० | ८.३२ | १) धर्मा जोमा पाटील<br>२) रामकृष्ण जोमा पाटील |

सदरची संपूर्ण मिळकत विद्यमान मालकांचा निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष तांबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकण्यास त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमचा अशिलांस दिलेला आहे, मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, बक्षीस, लिज, लिएन, या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांचा हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत या विद्यमान मालकांचा निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे, असे गृहीत धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वास कळावे.

अलिबाग
ता. १०/०१/२०२५

**ॲड. विधान अरविंद पाटील**
'वत्सला' टिळक रोड, स्टेट बँकेसमोर
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो. नं. ९४२२३७५११५

# गोखले महाविद्यालयात पोलीस दलाचा रेझिंग डे



**। बोर्लीपंचतन । वार्ताहर ।**

श्रीवर्धन येथील गोखले एज्युकेशन सोसायटी संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात श्रीवर्धन पोलीस स्टेशन तर्फे रेझिंग डे संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य, प्रा. किशोर लहारे उपस्थित होते. या वेळी श्रीवर्धन पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक सुधाकर लहाने व त्यांचे सहकारी रेझींग डे संबंधित मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित होते.

हा कार्यक्रम महाविद्यालयातील एन एस एस विभाग व श्रीवर्धन पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. यावेळी सुधाकर लहाने, पोलीस उपनिरीक्षक यांनी भारतीय क्षेपणास्त्र कार्यक्रम तसेच समाजातील गुन्हेगारी विषयी विद्यार्थी-स्वयंसेवकांना सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास प्रा. लोहार, प्रा. खोपकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा. नवज्योत जावळेकर यांनी केले, तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक, प्रा. खोपकर यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी, प्रा. लोहार यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील कनिष्ठ व वरीष्ठ वर्गाचे विद्यार्थी-स्वयंसेवक व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारीवर्ग उपस्थित होते.

# माजी विद्यार्थ्यांची स्नेहपूरक भेट

**। पाली । वार्ताहर ।**

ग.बा. वडेर कॉलेज पालीच्या १९९५-९६ च्या कला शाखेच्या बॅचचा स्नेह मेळावा रविवार ५ जानेवारी रोजी वर्गमैत्रीण सुचिता देशमुख यांच्या राज रिसॉर्ट उन्हेरे येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी त्या बॅचचे २७ विद्यार्थी मित्र २८ वर्षानंतर पुन्हा एकदा एकत्र आले होते.

श्री बल्लाळेश्वराचे दर्शन घेऊन उन्हेरे येथील राज रिसॉर्ट वर पोचल्यावर आनंद मेळाव्याला सुरुवात झाली. सुरुवातीला बॅच मधील मृत्यू पावलेल्या मित्र मैत्रिणींना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.यावेळी सर्वांनी आपला परिचय करून दिला. काही मित्रांनी कॉलेजमधील जुन्या आठवणींना ऊजाळा देत कॉलेज मधील गमती जमती सांगून सर्व मित्र मैत्रिणींना जुन्या आठवणीने मनोरंजन केले.

या गेट टुगेदरचे खास आकर्षण म्हणजे सुधागडाचे सुप्रसिद्ध गायक संजय (बाबू) महाडिक याने आपल्या सुमधुर आवजाने विविध प्रकारच्या गाण्यावर सर्व मित्र मैत्रिणींनी ताल धरून मनसोक्त नाचण्याचा आनंद घेतला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नरेश शेडगे यांनी केले. अशा प्रकारे हा कार्यक्रम आनंदी वातावरणात संपन्न झाला व सर्वांन वर्षभर पुरेल एवढा आनंद देऊन गेला कारण मित्र म्हणजे एक टॉनिकच आहेत जे औषधांपेक्षाही गुणकारी असतात.

पान १ वरून

## धान्य स्वस्त, नागरिक त्रस्त

अपयश आले आहे.

गावात रास्त भाव धान्य दुकान नसल्याने अनेकांची परवड होत आहे. शासनाकडून रास्त भाव धान्य दुकान सुरू करण्यासाठी बचत गटाला प्राधान्य दिले जात आहे. मात्र काही ठिकाणी बचत गटांनी देखील रेशनची दुकाने भाड्याने दिले असल्याचे समोर आले आहे. तर बरीचशी दुकाने काही दिवसांपूरतीच आणि ठराविक वेळेसाठीच उघडी असतात. त्यानंतर ती बंद असतात. त्यामुळे काही लाभार्थ्यांना धान्य मिळत नाही. पुरवठा विभागाचे याकडे दुर्लक्ष होत आहे. काही दुकाने गावांपासून लांब असल्याने गावात दुकाने उभे करण्यात यावीत अशी मागणी बचत गटाकडून केली जात आहे. परंतु जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय राजकीय दबावापोटी याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे चित्रदेखील आहे. वेगवेगळी कारणे दाखवून नवीन दुकाने सुरु करण्याची मान्यता देण्यासदेखील टाळाटाळ होत असल्याची प्रतिक्रीया अनेक गावांतील नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## आईनेच केली लेकराची हत्या

माहितीनुसार, अभिलाषा औटी ही त्यांच्या कुटुंबियांबरोबर वांद्रे पूर्वेला असणाऱ्या खेरवाडी परिसरात राहते. गुरुवारी संध्याकाळी अभिलाषा आणि तिचा मुलगा सर्वेश दोघेच घरात होते. अभिलाषा हिला स्क्रिझोफेनिया आजार असल्याने तिची मानसिक स्थिती स्थिर नव्हती. अशातच काही कारणामुळे तिला राग आला आणि रागाच्या भरात तिने सर्वेशला बेडरुममध्ये खेचत नेले. त्यानंतर बेडरुमचा दरवाजा बंद करत वायरने त्याचा गळा आवळला. त्यामुळे सर्वेशचा मृत्यू झाला. ऑफीसमधून घरी आल्यानंतर सर्वेशच्या वडिलांना संपूर्ण प्रकार सम जला. त्यानंतर त्याच्या पायाखालची जमीनच सरकली. याप्रकरणी त्यांनी पत्नीविरोधात पोलिसांत तक्रार दाखल केली. वडिलांच्या तक्रारीनंतर पोलिसांनी अभिलाषा औटी यांच्यावर हत्येचा गुन्हा नोंदवून तिला अटक केली आहे. पोलीस सध्या या घटनेचा पुढील तपास करत आहेत. या घटनेमुळे खेरवाडी परिसरात खळबळ उडाली आहे. आरोपी महिलेचे पती सरकारी कर्मचारी असून उपसचिवपदी कार्यरत आहेत. या घटनेनंतर ते खचून गेले असल्याची महिती पोलिसांनी दिली आहे.

## पतीने केली पत्नीची हत्या

त्याला जेरबंद करून ताब्यात घेतले. अवघ्या १२ तासांच्या आत त्याला खोपोलीला आणले. त्यानंतर गणेश घोडके यांने खून केल्याची कबुली दिली. पुढील तपास खोपोली पोलिस निरिक्षक शीतल राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरिक्षक मनोज ठाकरे करीत आहेत.

## बदलापूर-खोपोली लोकल बंद

१.५५ वाजता सुटणारी कर्जत-सीएसएमटी लोकल, दुपारी १.४८ वाजता सुटणारी खोपोली-सीएसएमटी लोकल अंबरनाथ येथून चालवण्यात येणार आहे. त्याचबरोबर दुपारी ३.२६ वाजता कर्जत-सीएसएमटी लोकल बदलापूर येथून सुटेल. गाडी क्रमांक २२१९४ ग्वाल्हेर-दौंड एक्स्प्रेस दुपारी २.५० ते ३.३५ दरम्यान चौक येथे थांबवण्यात येईल, अशी माहिती मध्य रेल्वेद्वारे देण्यात आली.

## राज्य मंडळाकडून बारावीच्या परीक्षेचे प्रवेशपत्र उपलब्ध

मंडळाच्या http://www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. प्रवेशपत्रावरील छायाचित्र सदोष असल्यास त्यावर विद्यार्थ्याचे छायाचित्र चिकटवून त्यावर संबंधित मुख्याध्यापक किंवा प्राचार्य यांनी शिक्का मारून स्वाक्षरी करावी. प्रवेशपत्र विद्यार्थ्याकडून गहाळ झाल्यास संबंधित उच्च माध्यमिक शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालयाने पुन्हा प्रवेशपत्राची मुद्रित प्रत घेऊन त्यावर लाल शाईने द्वितीय प्रत असे नमूद करून विद्यार्थ्यांना द्यायचे आहे.

## १३ जानेवारीपासून विद्यार्थ्यांची नोंदणी

एप्रिल महिन्यात काही काळासाठी व नंतर जूनपासून नियमित शाळा सुरू होतात. म्हणून शिक्षण विभागास एप्रिल महिना महत्त्वाचा आहे. तोपर्यंत ही प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. या प्रक्रियेतून प्रवेश घेणारे विद्यार्थी हे नियमित विद्यार्थ्यांसोबत शिक्षण घेऊ शकतील. शिक्षण हक्क कायद्यानुसार खाजगी शाळात राखीव असणाऱ्या २५ टक्के जागांवर राबविण्यात येणारी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया जानेवारीपासून सुरू होणार. त्यामुळे पालकांचा फायदा होणार. यावर्षी पालकांना आपल्या मुलाच्या ऑनलाईन प्रवेशासाठी नोंदणी सुविधा लवकर उपलब्ध होणार आहे.

आरटीई प्रवेश प्रक्रियेत दरवर्षी सर्वाधिक जागा पुण्यात उपलब्ध असतात. आतापर्यंत एकूण ८५३ खासगी शाळांची नोंदणी झाली आहे. त्यात १६ हजार ४२३ जागा उपलब्ध आहेत. पुढील काही दिवसात ही नोंदणी वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. शिक्षण हक्क कायद्यानुसार उपलब्ध इंग्रजी शाळेतील हा २५ टक्के कोटा काही वर्षांपासून वादग्रस्त ठरत आला आहे. त्यामागे मुख्य कारण म्हणजे या कोट्यातील विद्यार्थ्यांची शुल्क प्रतिपूर्ती. म्हणजे या कोट्यातून प्रवेश होणाऱ्या विद्यार्थ्यांचे शुल्क शासन संबंधित खाजगी शाळेस देत असते. परंतु काही वर्षांपासून ही रक्कम राज्यातील शाळांना मिळाली नाही. म्हणून शाळा नोंदणी करण्यास शाळा संचालक प्रतिसाद देण्यास मागेपुढे पाहतात. पण शासन रेटा असल्याने या प्रक्रियेत खासगी शाळा सहभागी होत असल्याचे चित्र आहे.

## ऑनलाईन आर्थिक लुट करणाऱ्याचा उपद्रव

केली जात आहे. आर्थिक लुट करणारे निदर्शनास आल्यास पोलिसांना माहिती देण्याचेही आवाहन केले जात आहे. पोलिसांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत असतानाही ऑनलाईन लुट करणाऱ्या भामट्याविरोधात रेवदंडा पोलिसांकडून कारवाई केली जात नसल्याची प्रतिक्रीया समाजात उमटत आहे.

अलिबाग तालुक्यातील वावे, उसर परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून खैरे परिसरातील एका तरुणाने ऑनलाईन आर्थिक लुट सुरु केली आहे. मासळी विक्रेत्यांपासून हॉटेल, भाजी विक्रेत्यांना टारगेट करून त्यांच्याकडून पैसे बळकावण्याचा फंडा सुरु केला आहे. पंधरा रुपयांचे लिंबू खरेदी करून पंधरा रुपये जी पे करण्याचा बहाणा करीत त्याच्या बनावट जीपेमधून पंधराशे रुपये जास्त गेल्याचा दिखावा त्याने केला आहे. त्यानंतर एका हॉटेल व्यवसायिकांकडूनदेखील त्याने वडापाव खरेदी केल्याचा बहाणा करीत जास्त पैसे ऑनलाईनला गेल्याचे सांगून आर्थिक लुट करण्याचा त्याने प्रयत्न केला. या परिसरात त्याने गेल्या अनेक दिवसांपासून धुमाकूळ घातला आहे. त्याचा उपद्रव वाढत असल्याने सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

हा तरुण खैरे परिसरातील असून त्याच्याविरोधात दुसऱ्या जिल्ह्यातदेखील चोरीचा गुन्हा दाखल झाल्याची चर्चा आहे. तो वीस ते २२ वर्षाचा तरुण असून अशाच प्रकारची फसवणूक करीत आहे. याबाबत रेवदंडा पोलिसांकडे तक्रार करण्यास गेलेल्या व्यक्तींची तक्रार न घेता त्याला पकडून आणतो. त्यानंतर तुम्हाला बोलावतो असे सांगून संबंधिताविरोधात गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ होत असल्याचा आरोप अनेकांनी केला आहे. लुटमार करणाऱ्या विरोधात कारवाई का केला जात नाही. त्याच्याविरोधात गुन्हा दाखल का केला जात नाही. पोलिसांचे आर्थिक हितसंबंधत तर नाहीत ना अशा अनेक प्रकारची चर्चा केली जात आहे. चोरट्याला पोलिसांकडून अभय का दिला जात आहे. घटना घडून अनेक दिवस उलटून गेले, तरीदेखील कारवाई का केली जात नाही, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

मागील आठ दिवसांपूर्वी चौल परिसरात एका टेम्पाला पर्यटकाच्या गाडीने धडक दिली. नाशिकमधील पर्यटकाने टेम्पो चालकाला मारहाण केली होती. मात्र पोलिसांनी राजकीय दबावापोटी पर्यटकावर गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ केल्याचा प्रकार सर्वज्ञात असताना पुन्हा रेवदंडा पोलिसांचा मनमानी कारभार उघडकीस आला आहे. या प्रकारामुळे दाद कोणाकडे मागायची असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## शाळेत अल्पवयीन मुलीची आत्महत्या

महिन्यांपासून नैराश्यात होती. ती नेहमीप्रमाणे शाळेत गेली. त्यानंतर तिचे कराटे क्लास सुरु असताना ती मुलगी प्रसाधनगृहात गेली. मात्र प्रसाधनगृहातून बराच वेळ झाला तरीही कराटे क्लासला आली नाही. शाळेत हजेरी घेणाऱ्यांनी प्रसाधनगृहात जावून पाहिलं तेव्हा प्रसाधनगृहाचं दार बंद आढळून आलं. त्यानंतर प्रसाधनगृहाचा दरवाजा तोडण्यात आला. त्यावेळी ही मुलगी गळफास लावलेल्या अवस्थेत आढळून आली.

यानंतर शाळा प्रशासनाने तातडीने या मुलीला रुग्णालयात नेलं. मात्र डॉक्टरांनी तिला मृत घोषित केलं. या मुलीच्या पालकांनी कुठलाही संशय व्यक्त केला नाही. घटनास्थळावर करण्यात आलेल्या तपासात पोलिसांना कोणतीही सुसाईड नोट सापडली नाही. पोलिसांनी मृत विद्यार्थिनीच्या पालकांना कोणावर संशय आहे का? या घटनेबद्दल विचारले असता, पालकांनी कोणावरही संशय नसल्याचे सांगितलं.

## नृत्यशिक्षकाला पोलीस कोठडी

आरोपीला दुसऱ्या गुन्ह्याच्या तपासासाठी पोलिसांनी ताब्यात घेत न्यायालयात हजर केले. यावेळी आरोपीला पोलीस कोठडी देण्याची मागणी विशेष सरकारी वकील नितीन कोंघे आणि तपास अधिकारी सहायक निरीक्षक रणजित मोहिते यांनी न्यायालयाकडे केली.

आरोपी नृत्य शिक्षकाने बालकांवर लैंगिक अत्याचार करताना त्याचे चित्रीकरण केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. हे चित्रीकरण इतरांना पाठविण्याची धमकी त्याने दिली होती. विशेष न्यायाधीश के. डी. शिरभाते यांच्या न्यायालयाने आरोपीला १३ जानेवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावली.

## जरांगे पाटलांची प्रकृती बिघडली

सकल मराठा समाज आणि मराठा संघटनांकडून जनआक्रोश मोर्चा आयोजित करण्यात आला. या मोर्चामध्ये देशमुख कुटुंबीय, मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील, दीपक केदार यांच्यासह समाज बांधव सहभागी झाले होते. परंतु या मोर्चात मनोज जरांगे यांचे भाषण झाले नाही. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची तब्येत खराब आहे. त्यामुळे त्यांनी मोर्चाच्या आयोजकाना मी बोलणार नाही. माझी तब्येत खालावली आहे, असे सांगितले होते.

त्यानंतर आता मनोज जरांगे पाटील यांना उपचारासाठी गॅलेक्सी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले.आज जालन्यात मराठा सम ाजाचा आक्रोश मोर्चा होता. या मोर्च्यात मनोज जरांगे पाटील हे तब्येत खराब असतानाही चालले. त्यांना थकवा जाणवत असल्याने त्यांनी भाषण दिले नाही. यानंतर आता त्यांना उपचारासाठी गॅलेक्सी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. यावेळी गॅलेक्सी हॉस्पिटलचे डॉक्टर प्रदीप चावरे यांनी जरांगे पाटील रक्तदाब कमी आहे. बॅक पेन जास्त आहे त्यामुळे त्यांचे सिटी स्कॅन करण्यात येणार आहे. आता रिपोर्ट आल्यावर त्यांच्यावर पुढील रिपोर्ट आल्यावर उपचार केले जाणार आहेत.सध्या मनोज जरांगे पाटील यांची कंबर दुखत आहे. त्यांना पायऱ्या चढायला उतरायला त्रास होत आहे. सध्या त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु असले तरी त्यांनी उद्या धाराशिवमध्ये मोर्चाला जाण्याचा निर्णय घेतला आहे, असे म्हटले आहे.

## भारताच्या हायड्रोजन ट्रेनची जगभरात चर्चा

की इंजिनचे काम पूर्ण झाले आहे. सिस्टिम इंटीग्रेशनचे काम सुरू आहे. हे इंजिन पूर्णपणे स्वदेशी बनावटीचे आहे. भारतीय तंत्रज्ञानाने जागतिक बाजारात स्वत:ला सिद्ध केल्याचे ते म्हणाले. हायड्रोजन ट्रेन इंजिन पर्यावरण पूरक असेल. ही ट्रेन शून्य कार्बन उत्सर्जन करेल. ही भारतातील स्वच्छ ऊर्जा आणि अक्षय ऊर्जेवर आधारीत दळणवळणासाठी उपयोगी ठरेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या इंजिनचे पहिले परीक्षण हरयाणातील जिंद ते सोनीपत या मार्गावर होईल. ८९ किलोमीटर लांबीच्या या मार्गावर हायड्रोजन ट्रेनची चाचणी होईल. आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये ३५ हायड्रोजन फ्यूल सेल ट्रेन विकसीत करण्यासाठी रेल्वे मंत्रालयाने २८०० कोटी रुपये दिले होते.

**द नॅशनल को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**
नोंदणीकृत आणि प्रशासकीय कार्यालय : २१४, रहेजा सेंटर, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१. वसुली विभाग : प्लॉट क्रमांक ८ सी, १ ला मजला, सेक्टर -१३, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (पश्चिम), रायगड, ४१० २०६
दूरध्वनी क्रमांक : (०२२) २७४५ ८६२८ ई मेल तपशील : recovery@ncbmumbai.com

**रजिस्टर्ड ए डी**

संदर्भ : एनसीबी/एचओ/वसुली/८५४/२०२४-२५ — दिनांक : ०९/०१/२०२५

प्रति
**मेसर्स स्पेशल प्राईस गुड्स प्रायव्हेट लिमिटेड**
**संचालक श्री आनंद कुमार हरिदास सोनी**
**संचालक श्रीमती माधुरी ए सोनी**
**संचालक श्री तेजस्वी ए सोनी**
**संचालक श्रीमती अचल ए सोनी**
**नोंदणीकृत पत्ता** : कार्यालय क्रमांक ए / २३९, प्लॉट क्रमांक ४२ ए, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४
**व्यवसाय** : शॉप क्रमांक १ ते ५ आणि ७, ७ अव्हेन्यू, सेक्टर ८, उलवे, नवी मुंबई ४१० २०६

महोदय,

**विषय : सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शिअल असेट्स अँड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ चे कलम १३ (२) ची सूचना**

आपल्या विनंतीच्या अनुसार आपणास ओव्हरड्रॉफ्ट सुविधा खाते क्रमांक **ओडी / ४९ (५-१४-१९)** च्या माध्यमातून बँकेने दिनांक २८/०६/२०२३ रोजी दिली होती आणि **रु १२१. ०० लाख** त्यांच्या **नेरुळ स्थानक शाखेच्या** माध्यमातून विविध मालमत्ता बँकेच्या नावे तारण करून दिली होती. सदरील ओव्हरड्रॉफ्ट सुविधा आणि करारनामे / प्रपत्रे जी आपण निष्पादित केली आहेत त्यांचा सविस्तर तपशील परिशिष्ट ए आणि बी मध्य अनुक्रमाने दिली आहेत. आपण सदरील वित्तीय सुविधा सदरील कर्ज करारनाम्यात आणि प्रपत्रात नमूद करण्यात आलेल्या अटी आणि शर्तीच्या अनुसार त्या सुविधेची परतफेड करण्याचे मान्य करून घेतली होती.

तसेच सदरील वित्तीय सुविधा घेताना टायटल डीड्स जमा केली होती आणि नोंदणीकृत तारण करारनामा करून बँकेच्या नावे सिक्युरिटी इंटरेस्ट बँकेच्या केले होते. या तारणखताच्या संदर्भात करारनामे परिशिष्ट बी मध्ये विस्ताराने वर्णित करण्यात आली आहेत.

सदरील प्रतिभूत मालमत्तांचा सविस्तर तपशील परिशिष्ट सी मध्ये विस्ताराने देण्यात आला आहे. सदरील कर्ज सुविधांची परतफेड अनियमित झाली होती आणि सदरील कर्ज खाते रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी मालमत्ता वर्गीकरणाच्या संदर्भात वेळोवेळी जारी केलेल्या दिशा निर्देशांच्या **अनुसार अनुत्पादक मालमत्ता** म्हणून दिनांक २९/०९/२०२४ रोजी वर्गीकृत करण्यात आले आहे.

सदरील कर्ज सुविधा खालील प्रमाणे नमूद केलेल्या व्यक्तींच्या व्यक्तिगत हमीनेही संरक्षित करण्यात आल्या आहेत.

**ओडी/४९:(०५-१४-४९) करिता :** **१) श्री आनंदकुमार हरिदास सोनी.**
**२) श्रीमती माधुरी आनंदकुमार सोनी.**
**३) श्री तेजस्वी आनंदकुमार सोनी.**
**४) श्रीमती अचल आनंदकुमार सोनी.**

वारंवार विनंती करूनही आपलं सदरील कर्ज खात्यांच्या संदर्भात देणे असलेली रक्कम अदा केलेली नाही किंवा त्याकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे बँक याद्वारे आपणास सदरील कायद्याच्या कलम १३ (२) च्या अनुसार सूचना निर्गमित करून आपल्या देयता, बँकेला ही सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांत अदा करण्याचे आवाहन करीत आहे.

सिक्युरिटायझेशन कायद्याच्या अनुसार सूचना :

आपल्याकडून बँकेला ओडी/ ४९ (५-१४-४९) करिता दिनांक ३१/१२/२०२४ रोजी एकूण रक्कम **रुपये १,२५,३७,०७२. ०० (रुपये एक कोटी पंचवीस लाख सदतीस हजार बहात्तर मात्र)** येणे आहे तसेच आपण त्या रकमेवरील पुढील व्याज दिनांक ०१/०१/२०२५ पासून विहित करण्यात आलेल्या दराने तसेच आकस्मिक खर्च शुल्क आणि अन्य आकार जे दोन्ही खात्यांच्या संदर्भात आहेत एवढी रक्कम देय आहात.

जर ओडी / ४९ (५-१४-४९) करिता दिनांक ३१/१२/२०२४ रोजी एकूण रक्कम **रुपये १,२५,३७,०७२. ०० (रुपये एक कोटी पंचवीस लाख सदतीस हजार बहात्तर मात्र)** जी आपल्याकडून येणे आहे तसेच आपण त्या रकमेवरील पुढील व्याज जे वरील प्रमाणे नमूद करण्यात आले आहे, कायद्याच्या कलम १३(२) च्या अनुसार, ते अदा करण्यात आपण कसूर केल्यास बँक कायद्याच्या कलम १३ उप कलम (४) च्या अनुसार तसेच कायद्याच्या लागू असलेल्या अन्य तरतुदींच्या अनुसार बँक त्यांना उपलब्ध असलेल्या एक किंवा सर्व पर्यायांचा अवलंब करील.

आपणास याद्वारे सूचित करण्यात येते की कायद्याच्या कलम १३ उप कलम १३ च्या अनुसार आपण सदरील मालमत्ता ज्यांचे सविस्तर वर्णन या सूचनेच्या परिशिष्ट सी मध्ये करण्यात आले आहे त्या मालमत्ता बँकेच्या लेखी पूर्व परवानगीच्या शिवाय विक्री, लीज किंवा अन्य कोणत्याही माध्यमातून हस्तांतरित करू शकणार नाही.

ही सूचना कोणत्याही पूर्वग्रहाशिवाय आणि येणे असलेली रक्कम वसूल कारण्यासाठी कायद्याच्या अनुसार बँकेला उपलब्ध असलेल्या पर्यायांच्या अनुसार आहे.

आपले विश्वासू
**(श्री बाळासाहेब के पांढरकर), प्राधिकृत अधिकारी**

प्रत रवाना :
**ओडी / ४९ (५-१४-४९) करिता**
**१. श्री आनंदकुमार हरिदास सोनी (संचालक)**
सदनिका क्रमांक १०१, ए विंग, बालाजी सीएचएस, प्लॉट क्रमांक ११/ १, सेक्टर क्रमांक १५, नेरुळ पूर्व, अपीजय स्कुलच्या जवळ, नवीन पनवेल ४०० ७०६.
**२. श्रीमती माधुरी ए सोनी (संचालक)**
सदनिका क्रमांक १०१, ए विंग, बालाजी सीएचएस, प्लॉट क्रमांक ११/ १, सेक्टर क्रमांक १५, नेरुळ पूर्व, अपीजय स्कुलच्या जवळ, नवीन पनवेल ४०० ७०६.
**३ श्री तेजस्वी ए सोनी (संचालक)**
सदनिका क्रमांक १०१, ए विंग, बालाजी सीएचएस, प्लॉट क्रमांक ११/ १, सेक्टर क्रमांक १५, नेरुळ पूर्व, अपीजय स्कुलच्या जवळ, नवीन पनवेल ४०० ७०६.
**४ श्रीमती अचल ए सोनी (संचालक)**
सदनिका क्रमांक १०१, ए विंग, बालाजी सीएचएस, प्लॉट क्रमांक ११/ १, सेक्टर क्रमांक १५, नेरुळ पूर्व, अपीजय स्कुलच्या जवळ, नवीन पनवेल ४०० ७०६.

आपणास सल्ला देण्यात येतो की आपण सूचनेत नमूद करण्यात आल्या प्रमाणे तसेच आपण निष्पादित केलेल्या हमीच्या अनुसार सदरील रक्कम अदा करावी.

**(श्री बाळासाहेब के पांढरकर), प्राधिकृत अधिकारी**
सिक्युरिटायझेशन कायद्याच्या अनुसार सूचना

**परिशिष्ट ए**

| सुविधेचे नाव | येणे असलेली रक्कम व्याजासह दिनांक ३१/१२/२०२४ |
|---|---|
| ओव्हरड्रॉफ्ट सुविधा खाते क्रमांक ओडी / ४९<br>मंजुरी दिनांक : ३१/०७/२०२० | मूळ रक्कम : रु १,२०,३४,४२१. ००,<br>व्याजाची रक्कम : रु ५,०२,६५१. ००,<br>**एकूण येणे असलेली रक्कम : रुपये १,२५,३७,०७२. ०० (रुपये एक कोटी पंचवीस लाख सदतीस हजार बहात्तर मात्र)** |

**परिशिष्ट बी**
( निष्पादित करण्यात आलेली प्रपत्रे ज्यात पुष्ट्यर्थ प्रपत्रे आणि तारण ठेवल्याची पुष्टी देणाऱ्या कागदपत्रांचा समावेश आहे)

| अनुक्रमांक | निष्पादित करण्यात आलेल्या प्रपत्राचे नाव | ओव्हरड्रॉफ्ट सुविधा खाते क्रमांक ओडी / ४९ (५-१४-४९) | |
|---|---|---|---|
| | | निष्पादित करण्यात आल्याची तारीख | रक्कम रु |
| १ | डिमांड प्रॉमिसरी नोट | २२/०९/२०२० | रु १,२५,००,००० /- |
| २ | कर्ज करारनामा | "-" | "-" |
| ३ | लेटर ऑफ लिन अँड सेट ऑफ | "-" | "-" |
| ४ | लेटर ऑफ गॅरंटी | "-" | "-" |
| ५ | लेटर ऑफ लिन आणि सेट ऑफ हमीदार आणि को ऑब्लिगंट यांच्याकडून | "-" | "-" |
| ६ | कंटिन्यूइंग सिक्युरिटी लेटर | "-" | '-" |
| ७ | डीड ऑफ ओव्हरड्रॉफ्ट | "-" | "-" |
| ८ | अंडरटेकिंग | "-" | "-" |
| ९ | डीड ऑफ हायपोथिकेशन | "-" | "-" |
| १० | सबॉर्डिनेशन अग्रीमेंट | "-" | "-" |
| ११ | अंडरटेकिंग कम डिक्लरेशन | २१/०१/२०१९ | २१/०१/२०१९ |
| १२ | लेटर ऑफ एक्नॉलेजमेंट डेट | २८/०७/२०२३ | रु १,२१,००,००० /- |

**परिशिष्ट सी**

**भाग १ बँकेला देण्यात आलेल्या प्राथमिक प्रतिभूतींचा तपशील**
**मालमत्तेचे नाव / आणि त्यांचा तपशील**
**१. सदनिका क्रमांक ६०१, ६ वा मजला, रॉयल बेल्लेझा, प्लॉट क्रमांक ९९, सेक्टर क्रमांक २०, उलवे, नवी मुंबई ४१० २०६ क्षेत्र ६५६ चौरस फूट/**
**२. सदनिका क्रमांक ६०२, ६ वा मजला, रॉयल बेल्लेझा, प्लॉट क्रमांक ९९, सेक्टर क्रमांक २०, उलवे, नवी मुंबई ४१० २०६ क्षेत्र ५७४ चौरस फूट/**
**३. सदनिका क्रमांक ६०३, ६ वा मजला, रॉयल बेल्लेझा, प्लॉट क्रमांक ९९, सेक्टर क्रमांक २०, उलवे, नवी मुंबई ४१० २०६ क्षेत्र ४५२ चौरस फूट/**
**४. सदनिका क्रमांक ६०४, ६ वा मजला, रॉयल बेल्लेझा, प्लॉट क्रमांक ९९, सेक्टर क्रमांक २०, उलवे, नवी मुंबई ४१० २०६ क्षेत्र ४६७ चौरस फूट/**

**वरील प्रमाणे नमूद करण्यात आलेल्या मालमत्ता तारण ठेवण्यासाठी प्रपत्रांचा तपशील**
१. सदनिका क्रमांक ६०१, ६०२, ६०३ आणि ६०४ रॉयल बेल्लेझा संदर्भात मूळ ब्लँक विक्री करारनाम्याची प्रत
२. मूळ तारण खत जे मेसर्स शिवपार्वती ग्रुप त्यांचे प्रोप्रायटर श्री आनंद कुमार हरिदास सोनी भाग १ म्हणून आणि मेसर्स स्पेशल प्राईस गुड्स प्रायव्हेट लिमिटेड त्यांचे संचालक श्री आनंदकुमार हरिदास सोनी, श्रीमती माधुरी आनंदकुमार सोनी, श्री तेजस्वी आनंद सोनी आणि श्रीमती अचल सोनी भाग २ म्हणून आणि नॅशनल को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड तिसरा भाग म्हणून दिनांक १९/०१/२०१९ रोजी पावती क्रमांक पीव्हीएल ३- १२२७-२०१९ प्रमाणे करण्यात आले आहे.
३. मूळ तारण खत जे मेसर्स शिवपार्वती ग्रुप त्यांचे प्रोप्रायटर श्री आनंद कुमार हरिदास सोनी भाग १ म्हणून आणि मेसर्स स्पेशल प्राईस गुड्स प्रायव्हेट लिमिटेड त्यांचे संचालक श्री आनंदकुमार हरिदास सोनी भाग २ म्हणून आणि नॅशनल को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड तिसरा भाग म्हणून दिनांक २२/०९/२०२० रोजी पावती क्रमांक पीव्हीएल २- ६९४८-२०२० प्रमाणे करण्यात आले आहे.
४. मेसर्स शिवपार्वती ग्रुप यांनी सदनिका क्रमांक ६०१, ६०२, ६०३ आणि ६०४ च्या संदर्भात दिलेला ना हरकत दाखला दिनांकीत २२/०१/२०१९.
५. सिरसाई अहवाल दिनांकीत ०३/०४/२०१९ ची प्रत

## वर्षभरापूर्वी विद्यमान खासदारांच्या हस्ते उद्घाटन

# वडवली शाळेतील मुलांचे भवितव्य अंधारात

**। दिघी । वार्ताहर ।**

**श्रीवर्धन तालुक्यातील वडवली गावातील जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत गेल्या वर्षभरापासून वीजपुरवठा खंडीत आहे. जानेवारी २०२४ मध्ये या शाळेच्या इमारतीचे खा. तटकरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले होते. मात्र, वर्ष झाले तरी शाळेतील वर्ग खोल्या अंधारातच आहेत. विशेष म्हणजे वडवली हे सांसद आदर्श ग्राम योजनेंतर्गत दत्तक घेतलेले गाव आहे.**



वडवली गावातील अत्यंत जुनी व जीर्ण झालेली जिल्हा परिषदेची मराठी शाळा मोडकळीस आली होती. शाळेची धोकादायक स्थिती पाहता खा. तटकरे यांनी सीएसआर फंडातून शाळेच्या इमारतीचे नुतनीकरण केले. गेल्यावर्षी इमारतीचे उद्घाटन करून विद्यार्थ्यांना खोल्या उपलब्ध देखील करून देण्यात आल्या होत्या. मात्र, लाईट फिटिंग न केल्याने शाळेत वीजपुरवठा बंद अवस्थेत आहे. त्यामुळे, मागील काही महिन्यांपासून विद्यार्थ्यांना अंधारातच बसावे लागत आहे. वीज नसल्याने ई-लर्निंग सारख्या अत्याधुनिक शैक्षणिक प्रणालीचा बट्ट्याबोळ झाला आहे. याशिवाय डिजिटल शाळेचा देखील बोजवारा उडाला आहे.

या शाळेतील विद्यार्थ्यांची पटसंख्या साडेतीनशे इतकी आहे. एकीकडे जिल्हा परिषद शाळेत मुले कमी झाल्याचा कांगावा करत आहे आणि जिथे मुले शिकत आहेत तेथे सुविधा न देण्याच्या जिल्हा परिषद विभागाच्या दुट्टपी भूमिकेवर ग्रामस्थ संताप व्यक्त करत आहेत. ग्रामीण भागातील जि.प.च्या शाळा टिकाव्यात आणि विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळून त्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढावी यासाठी राज्याच्या शिक्षण विभागाकडून दरवर्षी लाखो रुपये खर्च केले जातात. मात्र, प्रत्यक्षात गोरगरीब सर्वसामान्य नागरिकांच्या मुलांना त्यांच्या मुलभूत सोयीसुविधा मिळत नसल्याचे या प्रसंगातून अधोरेखित होत आहे.

> **“वडवली शाळेत वीजपुरवठा नसल्याबाबत मला माहित नाही. मात्र, वर्गखोल्यांतील लाईट फिटिंग बाबत पाठपुरावा घेतला जाईल. शाळेत कायमस्वरूपी मुख्याध्यापक मिळावे यासाठी देखील पाठपुरावा घेतला जात आहे.”**
>
> **– पुनिता गुरव, शिक्षणाधिकारी, अलिबाग**

> **“वडवली शाळेत वर्षभर वीजपूरवठा नाही. विद्यार्थ्यांच्या वर्गखोल्या लाईट शिवाय कशा राहू शकतात? विद्यार्थ्यांचे भविष्य कसे घडवणार? याबाबतीत शिक्षणाधिकाऱ्यांकडे बोलणे झालेले आहे, पत्र देखील दिले आहे. मात्र, त्यावर अद्याप कार्यवाही नाहीच.”**
>
> **– सुनील नाकती, ग्रामस्थ**

# सुपारी, मिरी चोरीतील आरोपीला अटक

**। पनवेल । वार्ताहर ।**

पाच कोटी रूपयांच्या सुपारी आणि मिरी चोरीतील तिसऱ्या आरोपीला पनवेल शहर पोलिसांनी अटक केली. रामदास कुरंगळे असे आरोपीचे नाव आहे.

शिरढोण येथील गाळ्यात कस्टम विभागाकडून कस्टम ड्युटी न भरलेला तीन कंपन्यांचा सुपारी व मिरी हा माल चोरून नेण्यात आला होता. या चोरी प्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी कुणाल रमेश भानुशाली याला भिवंडी येथून ताब्यात घेतले होते. त्यानंतर दुसरा आरोपी सागर बांगर याला देखील पोलिसांनी अटक केली. त्याचा या चोरीमध्ये प्रत्यक्ष सहभाग असल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक शोध घेत असताना तांत्रिक तपासाच्या आधारे या गाळ्यात सुरक्षा रक्षक म्हणून काम करणारा रामदास कुरंगळे याचा सुद्धा या गुन्ह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले असून त्याला पुढील तपासाकरिता पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. याबाबत अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वप्नील केदार करत आहेत.

# माथेरानमध्ये ई-रिक्षा बनलाय जिव्हाळ्याचा विषय

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



माथेरान शहरात येणाऱ्या पर्यटकांची संख्या पर्यावरण पूरक ई-रिक्षा सुरू झाल्यानंतर कमालीची वाढली आहे.त्यात माथेरान शहरातील सर्व शाळांचे वेळापत्रक लक्षात घेता पर्यटकांना ई-रिक्षा उपलब्ध होत नाहीत. ही बाब लक्षात घेऊन माथेरान शहरात सर्व हात रिक्षा चालकांना ई-रिक्षा चालवण्याची परवानगी देण्याची मागणी आणि हात रिक्षा संघटनेच्या उपोषणाला पाठिंबा देण्याचा निर्णय माथेरानच्या माजी नगराध्यक्षा दिव्या डोईफोडे यांनी केली आहे.

ई-रिक्षा हा माथेरान शहरातील स्थानिक आणि पर्यटकांच्या जिव्हाळ्याचा विषय झाला आहे. दस्तुरीनाका टॅक्सी स्टँड येथून ते थेट माथेरान गावात अत्यंत स्वस्तात आणि वेगाने प्रवास होत असल्यामुळे पर्यटकांची संख्या कमालीची वाढली आहे. ही वाढ लक्षात घेता ई-रिक्षाच्या संख्येत वाढ होणे आवश्यक असल्याचे मत स्थानिकांचे आहे. सध्या शहरात असलेले २० ई-रिक्षांपैकी १५ ई-रिक्षा या माथेरानमधील तीन शाळेतील विद्यार्थ्यांना सेवा देत आहेत. त्यात तिन्ही शाळांचे वेळापत्रक वेगवेगळे असल्याने अवघ्या पाच ई-रिक्षाच नागरिकांच्या सेवेत असतात. त्यामुळे नागरिकांना तासनतास वाट पहावी लागते. त्यामुळे माथेरान शहरात वाढलेले पर्यटक निर्माण होणारा व्यवसाय लक्षात घेऊन शासनाने ई-रिक्षांची संख्या वाढवावी, अशी मागणी माजी नगराध्यक्ष डोईफोडे यांनी केली आहे.

त्यासाठी माथेरान सनियंत्रण समितीने पुढील बैठक ही माथेरान शहरात घेण्यात यावी. जेणेकरून माथेरानमधील व्यवसायिक, दुकानदार व पर्यटकांच्या बाजू समजून घ्याव्यात, अशी सूचना केली आहे. तसेच, येत्या १४ एप्रिलपासून ई-रिक्षाच्या श्रमिक रिक्षा संघटनेने बेमुदत उपोषणाचा इशरा दिला आहे. त्या बेमुदत उपोषणाला देखील डोईफोडे यांनी पाठिंबा दिला आहे.

# रेल्वे स्थानकातील कॅन्टीन कालबाह्य

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ जंक्शन रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक दोन वर दिवाडकर कॅन्टीन होते. प्रवासी वर्गाला काही खाद्य पदार्थ उपलब्ध व्हावेत यासाठी उभारण्यात आलेले दोन्ही कॅन्टीन गेली दोन वर्षे बंद स्थितीत आहेत. दरम्यान, नेरळ स्थानकाचा मेकओव्हर होत असताना त्या बंद असलेल्या खानसामा कॅन्टीन कालबाह्य होण्याची भीती प्रवासी वर्गाला लागली आहे. त्यात फलाट एकवर अशी कोणतीही व्यवस्था आजतागायत उभारण्यात आलेली नाही.



कोरोना काळापासून नेरळ रेल्वे स्थानकातील कॅन्टीन बंद झाली आहेत. त्या दोन्ही कॅन्टीनमधून मिळणारी खानसामा सेवा बंद झाली असून आता प्रवाशांच्या सोयीसाठी असलेल्या दिवाडकर कॅन्टीन या कायमच्या विस्मृतीत जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. स्थनाकात अनेक विकासकामे सुरु असून बंद असलेल्या कँटीनचे फलक देखील रंगरंगोटीत पुसले जात आहेत. त्यामुळे नव्याने नेरळ स्थानकात येणाऱ्या प्रवाशांना त्या ठिकाणी खानसामा होता हे देखील समजून येणार नाही. प्रवाशाच्या सोयीसाठी नेरळ प्रवासी संघटनेने देखील आवाज उठवण्याची मागणी प्रवासी करीत आहेत.

## मुबलक पाणी देण्याचे आश्वासन

**पनवेल** : महाराष्ट्र जीवन प्राधिकरण येथील कार्यालयात उप विभागीय अभियंता जनार्दन कुलकर्णी यांची करंजाडे कॉलनी वेल्फेअर असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी भेट घेतली. यावेळी, त्यांच्या समोर पाण्याविषयीच्या समस्या मांडण्यात आल्या. करंजाडे नोडला जास्तीत जास्त एमएलडी पाणी मिळावे, अशी मागणी करण्यात आली आहे. ही मागणी करंजाडे नोडमधील वाढत्या लोकसंख्येमुळे रास्त आहे, असे कुलकर्णी यांनी सांगितले आहे. तसेच, मुबलक पाणी देण्यात येण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.



# हिंदू सणांवर कलागुण सादर

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

विश्व हिंदू परिषदेचा उपक्रम असलेल्या नेरळ विद्या विकास मंदिर शाळेमध्ये वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी, हिंदू सणांवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले.

या स्नेहसंमेलनात प्राथमिक विभागातील पहिली ते सातवी मधील विद्यार्थ्यांनी कलागुण सादर केले. त्यात गुढी पाडव्याचा सण, राम सिया राम, ए जो केसरी के लाल, लोहरी आयी, दिंडी चालली, ओमकार स्वरुपा, नागोबाला पाहू, मंगळागौर सण, सण आयलाय गो नारळी पुनवेचा, कृष्ण जन्मला ग, गोविंदा रे गोपाळा, मातृदिन, डम डम डम डमरू वाजे, नवीन वर्ष शुभारंभ, मार्तंडय कन्या रिमिक्स, आली दिवाळी आली, निराकार गुरू, हे कथा संग्राम की, ढील दे ढील दे, मंगलमूर्ती मोरया, होलिका दहन आणि लय भारी या गीतांवर विद्यार्थी थिरकले.

# बाजारात महिला चोरांना चोप

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल आणि आसपासच्या परिसरात भुरट्या चोरांनी थैमान घातले आहे. यामध्ये महिला चोर देखील सातत्याने गर्दीच्या ठिकाणी आपला डाव साधत असल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, विचुंबे येथील आठवडा बाजारात दोन महिला चोरांना चोप दिल्याची घटना घडली आहे.

पनवेल परिसरातील विचुंबे गावात आठवडा बाजार भरतो. या आठवडा बाजारात तुफान गर्दी होती. यावेळी २ चोरट्या महिलांनी एका लहान बाळाच्या गळ्यातील काळ्या धाग्यात ओवलेले सोन्याचे लॉकेट आणि एका महिलेच्या गळ्यातील दागिन्यांवर डल्ला मारला. मात्र, वेळीच ही बाब आठवडा बाजारातील अन्य ग्राहकांच्या लक्षात आली. त्यावेळी या दोन्ही चोरट्या महिलांना आठवडा बाजारात आलेल्या अन्य महिलांनी भर बाजारात चांगलाच चोप दिला. तसेच, पुन्हा चोरी करणार नाही असे वदवून घेतले. यावेळी चोरी केलेले महिलेच्या गळ्यातील दागिने चोरट्या महिलांनी परत केले मात्र बाळाचे लॉकेट सापडू शकले नाही. त्यामुळे गर्दीच्या ठिकाणी खबरदारी घेण्याचे आवाहन विशेषतः महिलांना करण्यात येत आहे.

## मोटरसायकलची ट्रेलरला धडक

**नवीन पनवेल** : सुरज वाघमारे आणि योगेश कातकरी हे बुधवारी (दि.८) दुचाकीवरून जात होते. ते गंधार ऑईल कंपनीच्या समोर तळोजा एमआयडीसी येथे आले असता रस्त्यावरच एक टँकर उभा होता. अंधारात दुचाकीस्वाराला टँकरचा अंदाज न आल्याने थेट टँकरला पाठीमागून धडकला. त्यात सुरज वाघमारे याच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन तो बेशुद्ध झाला. त्याला एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. अपघाताप्रकरणी टँकर चालकाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पावसाळावाडी रस्त्याची दुरावस्था

## • ग्रामस्थांकडून दुरुस्तीची मागणी

**। सुधागड-पाली । वार्ताहर ।**



सुधागड तालुक्यातील अत्यंत दुर्लक्षित भागांमध्ये माणगांव बु. ग्रामपंचायत विभागातील पावसाळावाडी गावाचा समावेश आहे. पावसाळावाडी गावाला आणि आदिवासी वाडीला जोडणारा रस्ता दोन-तीन वर्षांपूर्वी बांधण्यात आला होता. परंतु, आता या रस्त्याची दयनीय अवस्था झाली असून, या रस्त्यावरून चालणे देखील अवघड झाले आहे.

या रस्त्यावरून जाताना दुचाकी वाहन चालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. अनेकदा दुचाकीचा अपघात होऊन अनेक जणं जखमी देखील झाले आहेत. या रस्त्याचा पृष्ठभाग पूर्णपणे निखळला असून, मोठे दगड आणि माती सर्वत्र विखुरलेली आहे. ग्रामस्थांनी पावसाळावाडी रस्त्याच्या समस्यांबाबत वारंवार तक्रारी केल्या आहेत. परंतु, संबंधित अधिकाऱ्यांकडून कुठलाही प्रतिसाद मिळत नसल्याने स्थानिक आणि प्रवासी वर्गातून प्रचंड नाराजीचे सुर उमटत आहेत.

## कुंभारवाड्यातील सुगडीला मोठी मागणी | महिला वर्गाची लगबग सुरू

# मकर संक्रांतीनिमित्ताने सुगड पुजण्याची प्रथा

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

**मकर संक्रांतीला अवघ्या काही दिवसांचा कालावधी उरला आहे. त्यामुळे उरणसह पनवेल, नवी मुंबई व मुंबईच्या बाजारात प्रचंड मागणी असलेल्या काळ्या-लाल रंगाच्या मातीची सुगड्या बनविण्यासाठी चिरनेरच्या कुंभार वाड्यात लगबग सुरू झाली आहे.**



नवीन वर्षाच्या स्वागतानंतर पहिलाच येणारा सण मकर संक्रात हा आहे. या दिवशी माणुसकीची नाती, मैत्रीतील क्लिमिष दूर करण्यासाठी तिळगुळ वाटून गोड गोड बोलण्याची संधी उपलब्ध करून दिली जाते. तिळगुळ घ्या गोड गोड बोला, अशी साद घालून दोन्हीकडून प्रेमाने एकमेकांना भेटून गोडवा पसरविण्याचे काम केले जाते. या सणानिमित्ताने महिला वर्गात सुगड पुजण्याची प्रथा आहे. मातीच्या छोट्या मडक्यात गव्हाच्या औंब्या, भुईमुगाच्या शेंगा, बोर, साखर, फुटाणे, लाडू, हरभरे, गाजर, ऊस व फुले घालून महिला पूजा करून वाण देत असतात.

मकर संक्रातीच्या दिवशी सुगडीतून वाण देण्याची प्रथा घाटावरील महिला वर्गामध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येते. यात काही महिला लाल तर काही महिला काळी सुगडी पूजेसाठी वापरत असतात. आधुनिकरण आणि शहरीकरणामुळे मातीच्या भांड्यांकडे नागरिकांनी पाठ फिरवली असली तरी मकर संक्रातीला मातीने बनविलेल्या सुगडीला मोठी मागणी आहे. त्यामुळे उरण तालुक्यातील चिरनेर, तेलीपाडा, मुळेखंड येथील कुंभारवाड्यात मागील महिनाभरापासून सुगड बनवण्याची लगबग येथील महिला वर्गात सुरू झाली आहे.

### उरणसह आजूबाजूच्या बाजारपेठांत मागणी

शेतातील माती आणून ती भिजत घालून, गाळून त्यानंतर माती मळून ती मऊ करून चाकावर छोटीछोटी मडकी बनविण्यात येतात. त्यानंतर ही मडकी उन्हात वाळवून, भट्टीत चांगल्या प्रकारे भाजणे अशा अनेक प्रकारच्या प्रक्रिया पार पाडाव्या लागतात. काही ठिकाणी पारंपरिक चाकावर तर काही ठिकाणी विजेच्या मोटारीवरही सुगडी बनवली जातात. या बनविण्यात आलेल्या सुगडीला उरणसह मुंबई, नवी मुंबई, पनवेल येथील बाजारात मोठी मागणी असल्याचे कुंभारवाड्यातील महिलांकडून सांगण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांनी संयम, ध्येय बाळगावे: विवेक पोतदार



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

ममदापूर येथील विद्या मंदिर मंडळाचे मातोश्री टिपणीस महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले. त्यावेळी, मातोश्री सुमती चिंतामणी टिपणीस महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या नावाने आपली शाळा व संस्था ओळखली जावी, असे आवाहन विवेक पोतदार यांनी केले आहे. तसेच, या ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी संयम आणि ध्येय बाळगावे, असा सल्ला देखील त्यांनी दिला. यावेळी, डॉ. मिलिंद पोतदार, विवेक पोतदार, अरुण धारप, निलेश वैद्य, कविता देशमुख, उप निरीक्षक नितीन मंडलिक, डॉ. नंदकुमार इंगळे, रिमेश कुंभार, सुशांत बदले, अनिता अनेराव, पी.बी.विचवे आदी उपस्थित होते.

## निवडक

### रसायनीतील प्रवासी वर्गाची गैरसोय



**रसायनी :** पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रात नवनवीन कारखानदारी येत असल्यामुळे याठिकाणी कामानिमित्त मुंबई, नवी मुंबई, पनवेल, बेलापूर येथून प्रवासी ये-जा करत असतात. कोरोना काळामध्ये नवी मुंबई महानगरपालिकेने प्रवाशांचा वाढता कल लक्षात घेता रसायनी (वाशिवली) ते सीबीडी बेलापूर अशी बससेवा सुरू केली होती. परंतु, या बससेवेचे सुव्यवस्थित वेळापत्रक नसल्यामुळे रसायनी विभागात कमी प्रमाणात बससेवा उपलब्ध होत आहे. संध्याकाळच्या वेळेत येथे येणाऱ्या प्रवासी वर्गाची प्रचंड गैरसोय होत आहे. शिवाय रसायनीकडे येणाऱ्या एनएमएमटीची बस स्त्यावर कोठेना कोठे बंद पडल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे प्रवासी वर्गाला दुसरी बस येईपर्यंत ताटकळत बसावे लागते. परिवहन विभागाने प्रवासी वर्गाचा विचार करून रसायनीतील एनएमएमटी बसच्या फेऱ्या वाढवाव्यात, अशी मागणी नागरिक करत आहेत.



### पोलीस ठाण्याला सीसीटीव्ही भेट

**रसायनी** : खालापूर शहर हे तालुक्याचे ठिकाण असून या ठिकाणी दररोज शेकडो नागरिक कामानिमित्ताने येत असतात. खालापूर बस स्थानकात सीसीटीव्ही कॅमेरा नसल्याने या ठिकाणी मद्यपी, टवाळखोर यांचा मुक्त वावर असतो. सकाळी लवकर शाळा महाविद्यालय जाणाऱ्या विद्यार्थिनींना तसेच रात्री उशिरा कामावरून सुटल्यानंतर घरी परतणाऱ्या महिलांना बस स्थानकात असुरक्षित वाटत असल्याने प्रवासी तसेच बस स्थानकातील व्यापाऱ्यांनी सीसीटीव्ही कॅमेरा बसवावे, अशी मागणी केली होती. यावेळी कळमकर कुटुंबानी त्यांच्या मातोश्री स्व. प्रभावती कळमकर यांच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त दिलासा फाऊंडेशन आणि मनोज कळमकर यांनी खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्याकडे सीसीटीव्ही कॅमेरा सुपूर्द केला आहे. तसेच, हा कॅमेरा बस स्थानकात बसविण्यात देखील आला आहे.

### सराईत गुन्हेगार गजाआड

**पनवेल** : गेल्या काही महिन्यामध्ये पनवेल एस.टी. स्टँड आवारात अशा प्रकारच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. याबाबतच्या तक्रारी पनवेल शहर पोलीस ठाण्यात करताच वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उप.नि. विनोद लभडे, पोहवा नितीन वाघमारे, पोहवा अविनाश गंथडे, पोहवा अमोल डोईफोडे, पोहवा परेश म्हात्रे, पोहवा महेंद्र वायकर, पोहवा संदेश म्हात्रे, पोना विनोद देशमुख, पोशि चंद्रशेखर चौधरी आदींचे पथक या गुन्हेगाराचा शोध घेत असताना तांत्रिक तपासाच्या आधारे पोलीस हवालदार परेश म्हात्रे यांना सराईत गुन्हेगार जॉर्ज शेट्टी (४) याची माहिती मिळाली. त्यानुसार या पथकाने सापळा रचून या आरोपीला ताब्यात घेऊन त्याच्याकडून आतापर्यंत दिड लाखापर्यंत चोरीचे दागिने हस्तगत केले आहेत. तर, त्याचे दोन साथीदार पसार असून त्यांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.



### उभ्या ट्रकमधून डिझेल चोरी

**पनवेल** : पनवेल तालुक्यातील खारपाडा टोल नाक्याजवळ शिव हॉटेलसमोरील पार्कींगमध्ये उभ्या करून ठेवलेल्या ट्रकमधून अज्ञात चोरट्याने २०० लीटर डिझेलची चोरी केली आहे. यावेळी चालकाने त्यांना हटकले असता त्याला धमकावून त्याच्याकडील मोबाईल व रोख रक्कम जबरीने चोरी करून ते पसार झाले आहेत. बलवान गौतम (३८) याने त्याच्या ताब्यातील ट्रक शिव हॉटेलसमोरील पार्कींगमध्ये उभा करून ठेवला होता. बलवान ट्रकमध्ये झोपला असताना ४ अनोळखी इसमांनी त्याच्या ट्रकमधील २०० लीटर डिझेलची चोरी केली. यावेळी त्याने हटकले असता त्याला चौकडीने धमकावून त्याच्याकडील मोबाईल फोन व ७०० रुपये रोख रक्कम काढून घेऊन ते पसार झाले आहेत. याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



### बांगलादेशी नागरिकावर कारवाई

**नवीन पनवेल** : कळंबोली पोलिसांनी एका बांगलादेशी नागरिकावर कारवाई करत त्याला अटक केली आहे. सफायत सत्तर मोहम्मद शेख (३४) असे त्याचे नाव आहे. पनवेलमधील कळंबोली गाव येथे बांगलादेशी नागरिक ये-जा करत असल्याची माहिती कळंबोली पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार सफायत सत्तर मोहम्मद शेख याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याने बांगलादेशातील गरिबीला आणि उपासमरीला कंटाळून पोट भरण्यासाठी भारतात बेकायदेशीर प्रवेश केल्याचे सांगितले. तसेच, त्याच्याकडून मोबाईल देखील जप्त करण्यात आला आहे.

# ‘इंडिया’चे भवितव्य

गेल्या वर्षी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विरोधकांची इंडिया आघाडी स्थापन झाली. त्या निवडणुकीचे निकाल चांगले होते. त्यामुळे ही आघाडी अधिकाधिक बळकट होईल असे वाटत होते. पण एका वर्षानंतर तिच्या भवितव्याबाबतच शंका व्यक्त केल्या जाऊ लागल्या आहेत. बिहारमधील राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांनी ही आघाडी लोकसभेपुरतीच मर्यादित होती असे म्हटले आहे. तसे असेल तर ती बरखास्तच करून टाका अशी आततायी व अनावश्यक मागणी काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी केली आहे. त्यांचे पिताजी फारुख अब्दुल्ला यांनीच त्यांना झापले आहे व ही आघाडी लोकसभेपुरती नसून कायमची आहे असे स्पष्ट केले आहे. दिल्ली विधानसभेच्या निवडणुकांच्या निमित्ताने इंडिया आघाडी संपली असा गवगवा अधिक सुरू झाला आहे. यामागे अर्थातच भाजप नेते असून ते मिडियातून पद्धतशीररीत्या याचा प्रचार होईल हे पाहत आहेत. दिल्ली विधानसभा निवडणुकीत तिरंगी लढत होणार असून आम आदमी पक्ष, काँग्रेस आणि भाजप हे एकमेकांशी लढत आहेत. भाजपला १९९८ नंतर आजतागायत दिल्ली जिंकता आलेली नाही. काँग्रेसच्या शीला दीक्षित तीन वेळा सलग मुख्यमंत्री होत्या. आता गेली दहा वर्षे केजरीवालांचा आम आदमी राज्यावर आहे. त्यामुळे दिल्लीत काँग्रेस स्वतंत्रपणे लढणार व आम आदमीसोबत तिची लढाई होणार हे इंडिया आघाडी स्थापन होतेवेळीच स्पष्ट होते. लोकसभेच्या सात जागा या दोन्ही पक्षांनी एकत्रित लढवून पाहिल्या. पण त्यांना यश आले नाही. त्यामुळे हरियाणामध्ये आम आदमी पक्षाने स्वतंत्रपणे निवडणूक लढवली. काँग्रेसला तेथे सत्ता खेचून आणता आली नाही त्याचे एक कारण या तिरंगी लढती हेही होते. आम आदमीचा तेथे पूर्ण सफाया झाला. त्यांना लोकांनी नाकारले. तरीही त्यांनी नुकसान करायचे ते केलेच. म्हणजेच काँग्रेस विरुध्द आम आदमी ही लढाई काही पहिल्यांदाच होते आहे असे नव्हे. दिल्लीत आम आदमीला तृणमूल काँग्रेस, समाजवादी इत्यादी पक्षांनी पाठिंबा दिला आहे. त्यामुळे इंडिया आघाडीला जबर हादरा मिळाल्याची चर्चा बातम्यांमध्ये करण्यात येते आहे.

## नवीन घडले नाही

पण या दोन्ही पक्षांची दिल्लीत ताकद ती किती. शिवाय, गेल्या दोन निवडणुकांमध्ये आम आदमी पक्षाने कोणाच्याही मदतीशिवाय ७० पैकी तीनचतुर्थांश जागा जिकल्या हत्या. दिल्ली हा त्या पक्षाचा बालेकिल्ला होता. आता तो तसाच राहिलाय की भाजपने तिथे घुसखोरी केली आहे हा यंदाचा कळीचा प्रश्न आहे. त्याचा इंडिया आघाडीशी संबंध नाही. काँग्रेसचीही या शहरात पारंपरिक ताकद आहे. तिला ती वाढवता आली आहे का हे निवडणुकीतून दिसणार आहे. बहुसंख्य विधानसभा निवडणुकींमध्ये इंडिया आघाडीतील पक्ष एकमेकांविरुद्ध लढले आहेत. ते तसे लढणार हे आधीपासूनच उघड होते. भाजपवाले आणि त्यांच्या मांडीवर जाऊन बसलेला मिडिया हे मात्र हा एकदम नवीनच शोध असल्यासारखे त्याचे ढोल वाजवत आहेत. केरळमध्ये कम्युनिस्ट आणि काँग्रेस यांच्यात टोकाचे मतभेद आहेत. तेथे राहुल गांधी यांच्या वायनाड मतदारसंघात कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस राजा यांच्या पत्नी एनी राजा उभ्या होत्या. अगदी प्रियांका गांधी यांच्या पोटनिवडणुकीतही कम्युनिस्टांनी समझोता केला नव्हता. बंगालमध्ये तृणमूल विरुध्द काँग्रेस अधिक कम्युनिस्ट यांच्यात तीव्र संघर्ष आहे. अलिकडे हरियाणा व महाराष्ट्रातही आम आदमी पक्षाने वेगळी चूल मांडली होती. त्यामुळे दिल्लीत हे पक्ष वेगळे राहिले तर त्यात एकाएकी काहीही जगावेगळे व विपरीत घडलेले नाही. गंमत म्हणजे काही दिवसांपूर्वी अजितदादांच्या राष्ट्रवादीने दिल्लीत उमेदवार उभे करण्याचे जाहीर केले आहे. तेव्हा भाजपप्रणीत संयुक्त लोकशाही आघाडी मोडली असे कोणीही म्हटले नाही. उद्या राज्यामध्ये महायुतीचे तीनही पक्ष महापालिका व जिल्हा परिषदा निवडणुका वेगवेगळ्या लढवतील अशीच शक्यता आहे. तरीही महायुती तुटली असा प्रचार होणार नाही. इंडिया आघाडीच्या बाबतीत मात्र बरोबर उलटे घडते. तिच्या वाइटावर टपलेले लोक छोट्याशा विसंवादानंतर लगेच तिचे श्राध्द घालायला तयार असतात. दुर्दैवाने इंडिया आघाडीतले तृणमूल काँग्रेससारखे पक्षही त्यांना हरहमेश मालमसाला पुरवत असतात.

## एक व्हावेच लागेल

इंडिया आघाडीचे नेतृत्व सर्वात मोठा पक्ष म्हणून काँग्रेसकडे होते. मात्र आघाडीकडे स्वतःची अशी संघटना वा निवडलेले पदाधिकारी वगैरे नव्हते. भाजपच्या राजकारणाला विरोध करण्यासाठी निर्माण झालेले ते सैलसर संघटन होते. त्यामुळे इंडिया आघाडी टिकली की नाही याच्या चर्चेपेक्षा मोदींच्या भाजपच्या विरोधातल्या राजकारणाचे काय होणार हा खरा कळीचा प्रश्न आहे. आघाडीच्या घटक पक्षांपैकी समाजवादी, तृणमूल, कम्युनिस्ट, आम आदमी इत्यादी पक्ष कधीही भाजपसोबत जाऊ शकणार नाहीत. कारण आपापल्या राज्यांमध्ये त्यांची थेट भाजपसोबत लढाई आहे. तो त्यांच्या विचारसरणीचा व अस्तित्वाचा प्रश्न आहे. उद्या ममता किंवा अखिलेश यादव भाजपसोबत युती करायला गेले तर त्यांचे राजकारण संपून जाईल. त्यामुळे इंडिया आघाडी म्हणा किंवा अन्य कोणत्याही रुपात भाजपविरोधाचे हे राजकारण चालू ठेवून मजबूत करावे लागणार आहे. महाराष्ट्रात शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांनी आजवर तरी ठामपणे मोदी-शाह यांच्या भाजपच्या विरोधात भूमिका घेतली आहे. सध्या उद्धव यांचा साम ना देवेंद्र फडणवीस यांच्याविषयी सौम्य भूमिका घेताना दिसतो. शरद पवार यांनीही मोदींना साहित्य संमेलनाच्या उद्घाटनासाठी येण्याच्या निमित्ताने राजकारणाचा सूर बदलला. असे असले तरी दीर्घकालीन भविष्याचा विचार करता हे दोन्ही पक्ष भाजपसोबत जाऊ शकणार नाहीत. मोदींचा भाजप हा आपल्या मित्रांना कसा संपवतो याचे धडधडीत उदाहरण महाराष्ट्रातच सर्वांच्या डोळ्यापुढे आहे. शिवाय, मोदींच्या एकाधिकारशाहीला विरोध यावर उद्धव व पवार हे ठाम होते. त्यामुळे अध्येमध्ये काहीही वादळे आली तरी इंडिया आघाडीचे राजकारण चालू राहणार आहे. लोकांमधील संभ्रम दूर होण्यासाठी या आघाडीच्या नेत्यांनी एकमेकांवर टीका करताना सबुरीने बोलायला हवे. शिवाय, लवकरात लवकर एक बैठक बोलावून आघाडीच्या वाटचालीबाबत खुलासाही करायला हवा. इंडिया आघाडीमध्ये वादविवाद झाले किंवा ती अडखळली म्हणून भाजपला आनंदाच्या उकळ्या फुटत आहेत. मात्र इंडिया आघाडीचे काहीही झाले तरी तिच्यातील सदस्य पक्षांचा भाजप व मोदींना असणारा विरोध संपणारा नाही. काही काळ तो कदाचित एकत्रितपणे व्यक्त होणार नाही. पण काळाच्या ओघात जनता या सर्वांना पुन्हा एक होणे भाग पाडेलच.

विचार

# हिमालयात बर्फ न टिकण्याचे नवे संकट

**ओम पर्वत, बद्रीनाथ आणि केदारनाथ यासह मध्य हिमालयाच्या उंच टेकड्यांवर नोव्हेंबरपासून बर्फवृष्टी सुरू होते. यंदा डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात बर्फवृष्टी सुरू झाली आहे; पण उंच टेकड्यांवर हा बर्फ जास्त काळ राहण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे वैज्ञानिक चिंतित असून हिम ालयीन प्रदेशासह मोठ्या नद्यांच्या पाणलोट आणि लाभक्षेत्रात जलसंकट निर्माण होण्याची शक्यता आहे.**

मिलिंद बेंडाळे

हवामान खात्याच्या अंदाजानुसार, ईशान्येचा भाग वगळता उर्वरित हिमालयीन प्रदेशात या वर्षी सामान्यपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे आणि पाऊस कमी झाला तर बर्फ कमी पडेल. त्याचा हिमालयाशी संबंधित पाच देशांवर व्यापक प्रभाव पडतो. कारण हिमालय हा आशियाचा जल स्तंभ असण्याबरोबरच या खंडाचा हवामान नियंत्रकदेखील आहे. भारतीय हवामान विभागाच्या मते उत्तर आणि उत्तर-पश्चिम भारताच्या बहुतेक भागात आणि पूर्व आणि ईशान्य भारताच्या काही भागात सामान्यपेक्षा कमी पाऊस पडू शकतो. येत्या काळात दक्षिण भारतातील द्वीपकल्पीय भागात सामान्यपेक्षा १२१ टक्के जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. अंदाजानुसार, दक्षिण पॅसिफिक म हासागरात तटस्थ ‘अल निनो’ परिस्थिती आहे, तर ‘ला निना’ परिस्थिती आणखी विकसित होऊ शकते. त्यामुळे भारतीय हवामानावर परिणाम होऊ शकतो. हिमालयातील बर्फवृष्टीवर कमी पावसाचा थेट परिणाम होतो. कारण हिमवर्षाव पावसाच्या स्वरूपात होतो; पण ते तापमान आणि उंचीवर अवलंबून असते. कमी पावसामुळे, हिमालयातील उंच शिखरे आणि खोऱ्यांना बर्फाऐवजी हलका पाऊस किंवा कोरड्या हवामानाचा सामना करावा लागू शकतो. तज्ज्ञांच्या मते, हिमालयात कमी पाऊस आणि कमी बर्फवृष्टीची मुख्य कारणे म्हणजे जागतिक हवामानबदल, ‘अल निनो’चा प्रभाव, वातावरणातील दाब आणि मानवी क्रियाकलापांतील बदल. वातावरणातील दाबाच्या नमुन्यातील बदलांमुळे उत्तर-पश्चिमी वारे हिमालयाच्या वरच्या भागात पोहोचू शकत नाहीत. त्यामुळे पाऊस आणि बर्फवृष्टी कमी होऊ शकते.

जागतिक हवामानबदलामुळे तापमान वाढत आहे. त्याचा परिणाम बर्फवृष्टीच्या प्रक्रियेवर होतो. उष्णता वाढली की बर्फाऐवजी पाऊस अधिक पडू लागतो. याव्यतिरिक्त, पृथ्वीच्या हवामानचक्रात नैसर्गिक बदल आहेत, जसे की आंतरमॉन्सून आणि मॉन्सून ब्रेक्स. त्यामुळे हिमालयाच्या प्रदेशात कमी पाऊस आणि बर्फवृष्टी होऊ शकते. कमी हिम वर्षाव म्हणजे बर्फ वितळणे. त्याचा थेट परिणाम नद्यांच्या जलपातळीवर होतो. यामुळे पाण्याचे संकट उद्‌भवू शकते. त्याचा परिणाम शेती, पिण्याचे पाणी आणि उद्योगांवर होतो. गंगा, यमुना, सतलज, सिंधू आणि ब्रह्मपुत्रा या ग्लेशियरवर आधारित नद्या भारतीय उपखंडासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. कारण या नद्या केवळ पाणीपुरवठ्याचे प्रमुख स्त्रोत नसून शेती, उद्योग, वीजनिर्मिती आणि पिण्याच्या पाण्यामध्येही मोठी भूमिका बजावतात. या नद्यांवर मोठे जलविद्युत प्रकल्प सुरू आहेत आणि आणखी अनेक बांधकामे सुरू आहेत. त्यांना कमी बर्फवृष्टीचा फटका बसेल.

हिमवर्षाव कमी झाल्यामुळे हिमनद्या झपाट्याने वितळू लागतात. परिणामी, हिमालयीन प्रदेशातील पाण्याची पातळी वाढू शकते. त्यामुळे नंतर बर्फाचे वादळ, पूर आणि भूस्खलन यासारख्या आपत्ती उद्‌भवू शकतात. कमी बर्फवृष्टीमुळे, तापमान वाढल्यामुळे पर्यावरणीय प्रणाली असंतुलित होते. हिमवर्षावाचे एक नैसर्गिक कार्य म्हणजे सूर्याची किरणे (अल्बेडो इफेक्ट) परावर्तित करणे. बर्फ कमी असतो, तेव्हा जास्त उष्णता शोषली जाते. त्यामुळे जागतिक तापमान वाढते. हिमालयात कमी बर्फवृष्टीमुळे भारतीय मॉन्सून आणि पावसाच्या पद्धतींवरही परिणाम होऊ शकतो. वाढत्या उष्णतेमुळे मॉन्सूनची दिशा आणि स्वरूप बदलू शकते. त्यामुळे असामान्य पाऊस आणि दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होऊ शकते. हिमालयातील बर्फवृष्टी कमी झाल्यामुळे पाणीपुरवठ्यात घट होऊ शकते. रब्बी आणि खरीप पिकांवर त्याचा नकारात्मक परिणाम होऊ शकतो. हिमालयीन प्रदेशात स्कीइंग, ट्रेकिंग आणि बर्फावर आधारित इतर पर्यटन उपक्रम खूप प्रसिद्ध आहेत. बर्फवृष्टी कमी झाल्यामुळे या क्रियाकलापांचे आकर्षण कमी होऊ शकते. त्याचा पर्यटन उद्योगावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. याचा परिणाम स्थानिक रोजगार आणि आर्थिक क्रियाकलापांवर होऊ शकतो. या स्थितीत हिमालयातील हवेचा दाब आणि वायुगतीकीमध्ये बदल होऊ शकतो. यामुळे वायू प्रदूषणाची पातळी वाढून श्वसनाचे आजार आणि आरोग्य समस्या उद्‌भवू शकतात.

हिमालयात कमी बर्फवृष्टीमुळे उष्णतेच्या लाटा अधिक तीव्र होऊ शकतात. अतिउष्णतेमुळे उष्माघात, निर्जलीकरण आणि इतर आरोग्य सम स्या उद्‌भवू शकतात. अशा परिस्थितीत सरकार आणि सामान्य जनतेने कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्यासाठी अगोदरच तयार राहणे आवश्यक आहे. खास रचनेसाठी ओळखल्या जाणाऱ्या ओम पर्वतावरील बर्फापासून बनवलेला ओमचा आकार काढून टाकण्यात आला आहे. तज्ज्ञांच्या मते तो काढणे हे जागतिक आणि स्थानिक पर्यावरणीय संकटाचे प्रतिबिंब आहे.

ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यात हा बर्फ गायब झाला. शास्त्रज्ञांच्या मते ओम पर्वत भारत, चीन आणि नेपाळच्या सीमेवर स्थित आहे आणि समुद्रसपाटीपासून सुमारे ५९०० मीटर उंचीवर आहे. हा पर्वत कैलास मानसरोवर यात्रेतही महत्त्वाचा थांबा आहे. चीनच्या सीमेला लागून असलेल्या लिपुलेखपर्यंतचा रस्ता तयार झाल्यानंतर येथील पर्यटकांची संख्याही वाढली आहे. अल्मोडा येथील ‘सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंटल असेसमेंट अँड क्लायमेट चेंज सेंटर’चे जे. सी. कुनियाल यांच्या म्हणण्यानुसार, जगभरात हंगामी बदल दिसून येत आहेत. ओम पर्वतावरही हवाम ान बदलाचा परिणाम दिसून येत आहे. जागतिक तापमान वाढत आहे आणि त्याचा सर्वाधिक परिणाम हिमनद्यांवर होत आहे.

जंगलाला आग लागण्याच्या घटना आणि त्याची व्याप्ती वाढत आहे, हे विशेष. जंगलातील आगीतून निघणारा काळा कार्बन हिमनद्यांवर परिणाम करतो. हिमनदीच्या चांगल्या आरोग्यासाठी त्याच्या खाली असलेल्या झुडपांमध्ये चांगले गवत असावे. अल्पाइन प्रदेशातील जंगलांचे आरोग्य चांगले असावे. या सगळ्यामुळे तापमान संतुलित राहते. या सगळ्याकडे एकत्रितपणे पाहण्याची गरज आहे. संयुक्त राष्ट्रांनी आधीच इशारा दिला आहे. २०२२ च्या संयुक्त राष्ट्राच्या अहवालानुसार, हिमालयातील एक तृतीयांश हिमनद्याला ‘ग्लोबल वार्मिंग’चा धोका आहे. वाढत्या तापमानामुळे २००० पासून हिमनदी वितळण्याचे प्रमाण वाढले आहे. ग्लेशियर्स दरवर्षी ५८ अब्ज टन बर्फ गमावत आहेत. हे फ्रान्स आणि स्पेनच्या एकूण पाण्याच्या वापराच्या बरोबरीचे आहे. ‘द इंटरनॅशनल सेंटर फॉर इंटिग्रेटेड माउंटन डेव्हलपमेंट’ च्या मते हिंदुकुश हिमालयीन प्रदेशात तापमान वाढीचा दर जागतिक दरापेक्षा खूप जास्त आहे. २०२३-२४ च्या हिवाळ्यात संपूर्ण प्रदेशात विक्रमी कमी हिमवृष्टी झाली. विशेषत: पश्चिम हिमालयात फार कमी हिमवर्षाव झाला. २०२३ च्या भारतीय हवामान विभागाच्या अहवालानुसार, गेल्या वर्षी म ॉन्सूननंतर उत्तराखंडमध्ये ऑक्टोबर, नोव्हेंबर आणि डिसेंबरमध्ये तापमानात दोन अंशांपेक्षा जास्त बदल झाला होता. याशिवाय हिवाळ्यानंतर पावसाचे प्रमाण खूपच कमी होते. या वर्षी उत्तराखंडच्या मैदानी आणि डोंगराळ भागात भीषण उष्मा होता. डेहराडूनमध्ये तापमान ४४ अंशांवर पोहोचले आहे. ग्लेशियोलॉजिस्ट डॉ.अनिल देशमुख यांच्या मते, देशाच्या इतर भागांच्या तुलनेत हिमालयात तापम ान अधिक वेगाने वाढत आहे. याला एलिव्हेटेड इफेक्ट म्हणतात. जसजशी उंची वाढते तसतसे तापमानही वाढते. त्यामुळे, हंगामी बर्फ आता उन्हाळ्यात तसेच हिवाळ्यात आणि वसंत ऋतूमध्ये वेगाने वितळत आहे. ओम पर्वतावरील बर्फ गायब होणे हा त्याचा पुरावा आहे. डोंगराळ प्रदेशात होत असलेल्या बदलांचे हे प्रतीक आहे.

गेल्या ३० ते ४० वर्षांच्या मूल्यांकनावरून असे दिसून येते, की बर्फवृष्टीचे प्रमाण कमी होत आहे आणि पावसाचे प्रमाण वाढत आहे. कमी बर्फ आणि वाढत्या तापमानामुळे हिमनद्या वितळत आहेत.’ गढवाल विद्यापीठाचे प्राध्यापक आणि हिमनदी शास्त्रज्ञ एचसी नैनवाल यांनी सांगितले, की हवामानातील बदल आणि ‘ग्लोबल वॉर्मिंग’मुळे हिमवर्षाव कमी होत आहे. त्यामुळे हिमालयातील हिमनद्यांवरही त्याचा परिणाम होत आहे. हिम नद्यांमध्ये बर्फ साचू शकत नाही, हे भविष्यातील जलसंकटाचे लक्षण आहे. हिमालयीन प्रदेश हिमवर्षाव नसलेले दिसतात. नैनवाल म्हणतात, की हिमवर्षाव नसणे ही चिंतेची बाब आहे; परंतु त्याहून धक्कादायक बाब म्हणजे हिमनदीतील रात्रीचे तापमान वाढत आहे. त्यामुळे बर्फवृष्टी झाली तरी बर्फ वेगाने वितळत आहे. बर्फ गोठवणे अधिक महत्त्वाचे आहे. ग्लेशियरमध्ये बर्फ गोठत नसेल तर हिमनदीचे वस्तुमान संतुलन ऋणात्मक होते. वस्तुमान शिल्लक म्हणजे वर्षापेक्षा जास्त बर्फ वितळत आहे, ही चिंतेची बाब आहे. रात्रीच्या वेळी हिमनदीचे तापमान हवे तितके थंड नसते. त्यामुळे हिमनद्याही मागे सरकत आहेत. नोव्हेंबर ते मार्च या कालावधीत हिमनदीमध्ये सर्वाधिक बर्फ पडतो. मे ते ऑक्टोबर या काळात बर्फ वितळतो. जेव्हा पृथ्वी तापमानवाढीच्या अवस्थेत असते, तेव्हा हिमनद्या मागे सरकतात. म्हणजे त्यांची घनता आणि जाडी कमी होते.

चर्चा आजची

# ३०० मिटरचा रस्ता कोणाच्या बापाचा



आविष्कार देसाई

अलिबाग हे गेल्या काही वर्षांपासून पर्यटनदृष्ट्या झपाट्याने विकसीत होणारे शहर ठरले आहे. दरवर्षी लाखो पर्यटक शहरातील विविध पर्यटनस्थळांना भेट देत असतात. कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असल्याने शहराची आर्थिक कूस बदलत आहे. गोवा आणि केरळ राज्यासारख्या पायाभूत सुविधा उपलब्ध केल्यास पर्यटकांचा ओघ वाढणार आहे. कोणत्याही शहराची वेस ही पहिल्यांदा येणाऱ्या प्रत्येकाच्या कायमची स्मरणात राहते. अलिबाग शहरामध्ये प्रवेश करण्याआधीच एचपी पेट्रोल पंप ते सेंटमेरी कॉन्व्हेट स्कूल या पट्ट्यातील रस्त्याची दुरावस्था झाली आहे. त्यामुळे खड्ड्यातून जाताना नेहमीच ते सरकारी यंत्रणांना शिवांच्या लाखोल्या वाहत नसतील, तर नवलच म्हणावे लागेल.

दररोज स्थानिकांसह हजारो पर्यटक या ३०० मिटरच्या रस्त्यावरुन ये-जा करतात. रस्त्याची ठिकठिकाणी भले मोठे खड्डे पडून रस्त्याची दुरावस्था झाली आहे. नक्की हा रस्ता कोणत्या यंत्रणेकडे आहे. याचा मागमुस नागरिकांना लागलेला नव्हता. सुरुवातीला हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत होता. नतंर अलिबाग-वडखळ हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे गेला आहे. याबाबतचा सरकारी निर्णय (जीआर) सुमारे महिना दीड महिन्या आधी निघाला आहे. नागरिकांस पर्यटकांना त्रास होत असल्याने माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांनी स्वखर्चाने काही वर्षांपूर्वी या रस्त्याची दुरुस्ती केली होती. त्यानंतर दोन वर्षांनी पुन्हा रस्त्याची चाळण झाली. नागरिकांना त्रास होत असल्याने खड्डे ॲक्टीविस्ट दिलीप जोग यांनी त्यांच्या अनोख्या स्टाईलने आंदोलन करुन यंत्रणेच्या डोळ्यात अंजन घालण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या मागणीला यश आले आणि पावसाळ्याआधी त्या रस्त्याची सरकारी यंत्रणेने डागडुजी केली.

आता पावसाळ्यानंतर पुन्हा रस्त्याची प्रचंड दुरावस्था झाल्याने येथून वाहतूक करणे अवघड झाले आहे. बऱ्याच वेळा येथील खड्ड्यांमध्ये पडून दुचाकीस्वारांचा अपघात झाला आहे. यामार्गावरुन शाळेची मुले-मुली मोठ्या प्रमाणावर जातात. त्यामुळे या मार्गाची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे, असे असताना मात्र राष्ट्रीय महामार्ग हात वरती करत आहे. हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे वर्ग झाल्याचा सरकारी निर्णय झाला असला, तरी त्यांची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही, असे अधिकारी सांगतात, असे दिलीप जोग यांनी सांगितले. लवकरच हा मार्ग सुस्थित व्हावा यासाठी आंदोलन करणार असल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले. नागरिकांनी देखील अशा विधायक कार्यात जोग यांना पाठींबा देणे गरजेचे आहे. दरवर्षी सार्वजनिक बांधकाम विभाग खड्ड्ये दुरुस्तीवर कोट्यवधी रुपयांचा खर्च करते. मात्र, फक्त ३०० मीटरच्या रस्त्याची दुरुस्ती करण्यासाठी निधी नसवा हे शेंबड्या पोरालाही पटण्यासारखे नाही. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यानावर दररोज रस्ते निर्मितीचे विविध रेकार्ड नोंदवले जात आहेत. त्यांच्या कालावधीत देखील राष्ट्रीय महामार्गाची अशी अवस्था असेल, तर हे शोभनिय नाही.मध्यंतरी नितीन गडकरी यांनी जाहिरपणे सांगितले होते. विकाससंदर्भातील कोणतेही काम असु दे ते तातडीने पूर्ण करण्यात येईल. त्यांच्याच खात्याचा मंत्री एवढा सकारात्मक असताना संबंधीत विभागाने आपली बुध्दी गहाण टाकली आहे काय, असा सवाल आपसुकच नागरिकांच्या मनामध्ये येतो.

नागरिकांना होणार त्रास तातडीने दुर करण्यासाठी आता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने तातडीने पावले उचलावीत ते जर गोधडी अंगावर घेऊन झोपेचे सोंग करणार असतील (यामध्ये जिल्हाधिकारी, लोकप्रतिनिधी, पोलीस प्रशासन, जिल्हा परिषद प्रशासनाचे प्रमुख ओघाने आलेच) तर आता जनतेलाच उठाव करावा लागेल अन्यथा या रस्त्याची दुरावस्था अशीच राहून या रस्त्याचा बाप कोण अशी म्हणण्याची वेळ संगळ्यावर आल्या शिवाय राहणार नाही.

लोकसंसद

## माणुसकी हरवत चालली आहे.....

पुण्यातील विमाननगर परिसरातील डब्लूएनएस कंपनीत नोकरीस असलेल्या तरुणीवर झालेल्या खुनी हल्ल्याचा व्हिडिओ समाज माध्यमात व्हायरल झाला. हल्लेखोर तरुण त्या तरुणीवर निर्घृणपणे चाकुने वार करीत होता. मात्र बघ्यांच्या गर्दीतून एकही जण तरुणीला वाचवण्यासाठी किंवा तरुणाला रोखण्यासाठी पुढे आला नाही. उलट काही जण त्या तरुणीवर हल्ला होत असताना तिला वाचवण्याऐवजी मोबाईल मध्ये त्या घटनेचे शूटिंग करण्यात मग्न होते वास्तविक या वेळी उपस्थित नागरिकांनी बघ्याची भूमिका न घेता त्या मुलीला वाचवण्याचा प्रयत्न करायला हवा होता मात्र तसा प्रयत्न झाला नाही. जर लोकांनी एकत्र येऊन आरोपीला थांबवले असते तर त्या तरुणीचा जीव वाचला असता. त्या तरुणीच्या मृत्यूस तिथे उपस्थित असूनही केवळ बघ्याची भूमिका घेणारे असंवेदनशील नागरिकही जबाबदार आहेत. अशा प्रकारे घटना झाल्यावर संवेदनशील भावनेने नागरिकांनी भूमिका निभावण्याची गरज आहे. काही लोक अपघात घडतात, दुर्घटना घडते तेंव्हा समोर असूनसुद्धा सहभाग घेत नाही. माणुसकी हरवत चालल्याचेच हे लक्षण आहे. या सगळ्या गोष्टींचा विचार करून माणुसकी हरवणार नाही याची सर्वांनी दक्षता घ्यायला हवी.

– श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे

## वकिलांची संख्या लक्षणीय रित्या वाढली

सध्या अनेक क्षेत्रात पुढील भविष्यासाठी चांगले दिवस आहेत . त्यामध्ये अभियांत्रिकी फार्मसी बरोबरच वकिली हे एक क्षेत्र आहे. या क्षेत्रात मोठा वाव असल्याचे दिसून आले आहे. विविध प्राधिकरणे, अनेक प्रकारच्या संस्था, गृहनिर्माण सोसायट्या, बँका, अनेक कार्यालये इत्यादी क्षेत्रात वकिलांची गरज मोठ्या प्रमाणात वाटू लागली आहे. साहजिकच वकिलांची संख्या सुद्धा वाढत चालली असल्याचे आकडेवारी सांगते. गेल्या पाच वर्षात तब्बल ६६ हजारा हुन अधिक वकिलांची नोंद झाली असल्याचे वृत्त वाचण्यात आले. २०२० तुलनेत २०२४ च्य अखेरीस महाराष्ट्र व गोवा वकील परिषदेत नोंद झालेल्या वकिलांची संख्या ७७ टक्क्यांनी वाढली आहे. दरवर्षी सुमारे ५० हजार विद्यार्थी प्रवेशासाठी अर्ज करतात. त्यातील सुमारे २३ हजर विद्यार्थ्यांना प्रवेश मिळतो. स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून सुद्धा अनेक विद्यार्थी आपले नशीब अजमावतात. एकूणच वकिली व्यवसायाला एक नवे स्वरूप प्राप्त होत आहे हे सुचिन्ह आहे अनेक राज्यात नवोदित वकिलांना मानधन दिले जाते ही खरेतर या व्यवसायाला गती देण्यासाठी चांगली योजना आहे. एकूणच अभियांत्रिकी क्षेत्राबरोबरच वकिली क्षेत्र हे सुद्धा पुढे येत आहे

**– शांताराम वाघ पुणे**

दिनविशेष

# ‘शांतिपुरुष’- लाल बहादूर शास्त्री

आज ११ जानेवारी, लाल बहादूर शास्त्री यांची पुण्यतिथी. लाल बहादूर शास्त्री हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्वातंत्र्यसैनिक होते. त्यांनी १९६४ ते १९६६ या काळात भारताचे दुसरे पंतप्रधान म्हणून काम केले. तसेच त्यांनी यापूर्वी १९६१ ते १९६३ या काळात भारताचे सहावे गृहमंत्री म्हणून काम केले. १९५२ रोजी शास्त्री यांची भारतीय प्रजासत्ताकच्या पहिल्या मंत्रिमंडळात रेल्वे आणि वाहतूक मंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली.१९५९ मध्ये ते वाणिज्य आणि उद्योग मंत्री होते आणि १९६१ मध्ये ते गृहमंत्री होते. विशिष्ट पोर्टफोलिओशिवाय मंत्री असताना शास्त्री यांनी १९६४ मध्ये मंगळूर बंदराची स्थापना केली.

भारतात ब्रिटीश राजवटीला पाठिंबा देणाऱ्या भारतीय राजांची महात्मा गांधी यांनी केलेल्या निंदेमुळे ते अत्यंत प्रभावित झाले. त्यावेळी लाल बहादूर शास्त्री केवळ अकरा वर्षांचे होते, आणि तेव्हापासून राष्ट्रीय स्तरावर काहीतरी करण्याबाबतची प्रक्रिया त्यांच्या मनात घोळू लागली.

महात्मा गांधींनी भारतात ब्रिटिश सरकारविरोधात सुरू केलेल्या असहकार चळवळीचे कार्यकर्ते लाल बहादूर यांना थोड्या काळासाठी (१९२१) तुरुंगवास भोगावा लागला. सुटकेनंतर त्यांनी काशी विद्यापीठ (सध्या महात्मा गांधी काशी विद्यापीठ), एक राष्ट्रीय विद्यापीठात शिक्षण घेतले आणि पदव्युत्तर शास्त्री (शास्त्राचे अभ्यासक) ही पदवी मिळवली. संस्कृत भाषेमध्ये पदवीपर्यंतचे शिक्षण घेतल्यानंतर ते भारत सेवक संघात सामील झाले आणि देशसेवेचे व्रत घेत त्यांनी येथून आपल्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली.

तीसहून अधिक वर्षे आपल्या समर्पित सेवेदरम्यान लाल बहादूर शास्त्री निष्ठा, क्षमतेसाठी जनमानसांत लोकप्रिय झाले. नम्र, दृढ आणि जबरदस्त आंतरिक शक्ती असलेले शास्त्रीजी लोकांची भावना समजून घेणारे खऱ्या अर्थाने त्यांचे मित्र बनले. त्यांनी आपल्या दूरदर्शी वृत्तीने देशाला विकासाच्या मार्गावर नेले. लाल बहादूर शास्त्री यांच्यावर महात्मा गांधींच्या राजकीय शिकवणीचा मोठा पगडा होता. आपले गुरु महात्मा गांधीच्या शैलीत ते एकदा म्हणाले. कठोर मेहनत ही प्रार्थनेच्या समान आहे.

लाल बहादूर शास्त्रींनी ममरू नका, माराफअसा नारा दिला ज्यामुळे देशभरात क्रांती झाली.

कृषी क्षेत्रातील योगदान

लाल बहादूर शास्त्री यांनी देश घडवण्यासाठी आणि विकसित करण्यासाठी सैनिक आणि शेतकरी या दोघांच्याही महत्त्वावर भर दिला. १९६४ मध्ये श्वेतक्रांतीचे समर्थन केले आणि १९६५ मध्ये गुजरातमधील आनंद येथे राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाची स्थापना केली. त्यांच्या कार्यकाळात, कृषी क्षेत्रात कृषी मूल्य आयोग, भारतीय अन्न महामंडळ (ऋउख), राष्ट्रीय बियाणे महामंडळ आणि भारतीय गोदाम निगम यांसारख्या अनेक संस्था स्थापन करण्यात आल्या. त्यांनी दिलेला मजय जवान-जय किसानफ हा नारा अजूनही लोकांच्या जिभेवर आहे. ११ जानेवारी १९६६ रोजी, लाल बहादूर शास्त्री यांचे ताश्कंद, उझबेकिस्तान येथे निधन झाले. त्यांनी देशासाठी केलेल्या महत्त्वपूर्ण कार्यासाठी १९६६ मध्ये त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्काराने गौरवण्यात आले. आजही संपूर्ण भारत शास्त्रीजींना त्यांच्या साधेपणा, देशभक्ती आणि प्रामाणिकपणासाठी आठवतो.

# अभिनव ज्ञानमंदिरात विज्ञान प्रदर्शन

**| माणगाव | वार्ताहर |**

छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित अभिनव ज्ञानमंदिर उसर खुर्द विद्यालयात शाळांतर्गत कल्पकतेतून कृतीकडे अविष्कार २०२४-२५ विज्ञान प्रदर्शन संपन्न झाले.

या विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन उसर खुर्दच्या माजी सरपंच सायली घाग, दामोदर काते, उपसरपंच भानंग ग्रुप ग्रामपंचायत शांताराम नटे गुरुजी शालेय समिती निमंत्रित सदस्य, परीक्षक पवार, शाळेचे मुख्याध्यापक नागनाथ सुर्वे यांच्या हस्ते करण्यात आले.

या विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे वैज्ञानिक प्रयोग सादर करून प्रतिकृतींची माहिती दिली. सदर विज्ञान प्रदर्शनात सौर ऊर्जा, औषधी वनस्पतीं, बायोगॅस, पवन ऊर्जा, पाणी शुद्धीकरण आदी विविध प्रतिकृतीतून विद्यार्थ्यांनी माहितीपूर्ण सादरीकरण केले. या विज्ञान प्रदर्शनामध्ये इयत्ता सहावीतून राणी पागार औषधी वनस्पतींचे उपयोग प्रथम क्रमांक, इयत्ता सातवीमध्ये मानवी काप अपारंपारिक उर्जानिर्मिती प्रथम क्रमांक, इयत्ता आठवी वैष्णवी चिंचाळकर पुनर्प्रक्रिया व पुनर्वापर प्रथम क्रमांक, इयत्ता नववी- सिद्धि पतारे पुर्नप्रक्रिया व पुनर्वापर वरील सर्व विद्यार्थ्यांची विभाग स्तरावर निवड झाली आहे. शालेय समितीचे अध्यक्ष किशोर आल्हाट यांनी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. संस्थेचे सरचिटणीस डॉ. निलेश रेवगडे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. सर्व विद्यार्थ्यांचे विद्यालयाचे मुख्याध्यापक नागनाथ सुर्वे व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच संस्था पदाधिकारी यांनी अभिनंदन केले आहे. या प्रतिकृतीतून प्रथम क्रमांकाच्या प्रतिकृती विभाग स्तरावर शाळेचे प्रतिनिधित्व करणार आहेत. विज्ञान शिक्षक अमोल तोडकरी यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन केले. या विज्ञान प्रदर्शनाचे परीक्षण कल्पक शिक्षक पवार यांनी केले.


## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे किकवी, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| १२०/२ | ०.५३.०० पो.ख. ०.०७.०० | ०.३० | श्री. रवि प्रेमचंद पारेख. |
| | एकुण ०.६०.०० | | |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या ०७ (सात) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- ११/०१/२०२५

सही /-
**ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे
मो. नं. ७३८५००४८०६.

## कोकण मर्कंटाईल को- ऑप. बँक लिमिटेड मल्टी स्टेट बँक

Since 1973

**नोंदणीकृत कार्यालय:** १ ला मजला, हार्बर क्रेस्ट, माझगाव टी.टी. मुंबई ४०००१०.
दूरध्वनी : २३७२३७५३, २३७२९९६९, २३७२९९७०, २३७२९९७१, २३७३४२०२, २३७३४३११.
फॅक्स: २३७४८५८९ | वेबसाईट : www.kokanbank.net

### ताबा सूचना

ज्याअर्थी कोकण मर्कंटाईल को- ऑप. बँक लि. चे प्राधिकृत अधिकारी यांनी दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (अमंलबजावणी) नियमन २००२ च्या नियम ८ आणि ९ सह वाचावयाच्या कलम १३ (१२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून कर्जदार **१) मे. अथर्व प्लास्टिक्स - प्रोप्रा. स्वप्निल वसंत रसाळ - कर्जदार/गहाणवटदार, २) श्री. जिलानी ए. लतिफ पटेल - जामीनदार, ३) श्री. अमोल भरत शिंदे - जामीनदार, ४) सौ. प्रिया चंदर तेलंग - जामीनदार** यांना दि. २२.१०.२०२४ रोजी मागणी सूचना जारी करून कर्ज खाते क्र. ७०३२/३ आणि १८३६/२ करिता दि. १४.१०.२०२४ रोजी नुसार **रु. १२,२९,८६६.०४ (रुपये बारा लाख एकोणतीस हजार आठशे सहासष्ट व पैसे चार मात्र) आणि रु. ९,९३,३१४.०२ (रुपये नऊ लाख त्र्याण्णव हजार तीनशे चौदा व पैसे दोन मात्र)** व त्यावरील १३.५०% प्रति वर्ष दराने पुढील व्याज आणि इतर प्रभार तुमच्या विरुद्धची सदर सूचना प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत परतावा करण्याची मागणी केली होती.

कर्जदार, गहाणवटदार, पुष्टी करणारे पक्षकार आणि जामीनदार सदर रकमेचा परतावा करण्यास अयशस्वी ठरल्यामुळे, याद्वारे कर्जदार, गहाणवटदार, पुष्टी करणारे पक्षकार, जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकार यांनी सदर नियमनांच्या नियम ८ आणि ९ सह वाचावयाच्या सदर कायद्याच्या कलम १३ (४) अन्वये त्यांना प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून याखाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा **दि. ७ जानेवारी, २०२५** रोजी ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदार, गहाणवटदार, पुष्टी करणारे पक्षकार, जामीनदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे खबरदार करण्यात येते की, सदर मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये आणि या मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार हा कर्ज खाते क्र. ७०३२/३ आणि १८३६/२ करिता दि. १०.०१.२०२५ रोजी नुसार **रु. १०,८५,४१९.५१ (रुपये दहा लाख पंचाऐंशी हजार चारशे एकोणीस व पैसे एक्कावन्न मात्र) आणि रु. १०,०७,९७५.९३ (रुपये दहा लाख सात हजार नऊशे पंचाहत्तर व पैसे त्र्याण्णव मात्र)** व त्यावरील १३.५०% प्रति वर्ष दराने पुढील व्याज आणि इतर प्रभार एवढ्या प्रभारास अधीन असेल.

**मालमत्तेचा तपशील**

गट पंचायत माणकिवलीच्या हद्दीमधील गाव अंजरुण, तालुका खालापूर, जिल्हा रायगड येथे स्थित गट क्र. १६ धारण केलेल्या मोजमाप अदमासे ०.०५.९० एच.आर.पी. जमिनीवर स्थित शेड हाऊस क्र. ७६, मोजमाप क्षेत्रफळ ७८.०६ चौ.मी.

**नियम ८ (६) सह वाचावयाच्या सरफैसी कायदा २००२ अन्वये वैधानिक ३० दिवसांची विक्री सूचना**

कर्जदार, गहाणवटदार, भागिदार आणि जामीनदार यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, मागणी सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार रक्कम व त्यासह आजपर्यंतचे व्याज आणि सहाय्यक खर्च आजपासून ३० दिवसांच्या आत भरणा करावे, असे न केल्यास मालमत्ता विक्रीस ठेवली जाईल/विक्री करण्यात येईल आणि शिल्लक देणी, जर असल्यास, व्याज आणि शुल्कासह वसूल केली जाईल.

कोकण मर्कं. को- ऑप. बँक लि. करिता
सही/-
प्राधिकृत अधिकारी

ठिकाणः खोपोली
दिनांकः ११.०१.२०२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमीन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे-दहिवली तर्फे नीड, तालुका-कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सिटी सर्व्हे नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|
| प्रकाश वल्लभदास शहा | ७३५ | एकूण क्षेत्र २८.०९.८० चौ.मी. त्यापैकी लिहून देणार यांनी लिहून दिलेले क्षेत्र १४०० चौ.मी. (१४ गुंठे) |

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकाच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत ही तदंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली जमीन मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकित दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. ११/०१/२०२५

खरेदीदारातर्फे वकील
**ॲड. स्वप्निल बाबूराव देशमुख**
पत्ता : मार्वल क्षिप्रा रेसिडेन्सी, शॉप नं. २४,
डी विंग, मुद्रे बुद्रूक, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९२७३२२४६८०/८८३०५६०९६२

## जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. मंदार धनंजय ठाकुर, रा. दैवतेश्वर कॉलनी, कॉलेज रोड, व्ही.टी.सी. नाशिक यांनी खालील वर्णनाची मिळकत मिळकतींचे मुळ मालकांकडुन खरेदी करण्याचे ठरविले असुन तशी बोलणी देखील केलेली असुन सदर मिळकत कायम फरोक्त खरेदीखताने विकत घेण्याचे आमचे अशिलांनी ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | पो.ख. (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| निधवली | ५८/४ | ०-८८-०० | ०-१२-०० | १.२३ |

वरील वर्णनाची मिळकत व त्यातील दगड, धोंडा, पाणी, जाणे येण्याचा मार्ग सर्व वहिवाटी, सर्व हक्क दरोबस्त अशी मिळकत ही या जाहीर नोटीसीचा विषय असुन सोयीकरीता तिला यापुढे सदर मिळकत असे संबोधिले जाईल.

सदर मिळकत ही विद्यमान मालक यांचे ताबेकब्जातील, वहीवाटीतील, निर्वेध, बोजारहीत, विकण्यायोग्य असल्याची हमी मिळकतीचे मुळ मालक यांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तरी सदर मिळकतीवर अथवा तिचे कोणतेही भागावर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहीवाट, ताबेकब्जा इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बक्षिस, बोजा, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, भागीदारी, खरेदीखत, या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी योग्य त्या प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे लेखी स्वरुपात नोंदवाव्यात. या कालावधीत कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकती संदर्भातील नियोजीत व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

पेण
ता. १०/०१/२०२५

**ॲड. पुष्कर धनदास मोकल**
रा. ईशान्य को. ऑप. हौ. सोसायटी,
बी - विंग, पहिला मजला, फ्लॅट नं. १०३,
महाजन हॉस्पिटलचे बाजुला, चिंचपाडा, पेण,
ता. पेण, जि. रायगड.
मो.नं. ९८५०३६११७२, ८४२५९४१३२६

## जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. मंदार धनंजय ठाकुर, रा. दैवतेश्वर कॉलनी, कॉलेज रोड, व्ही.टी.सी. नाशिक यांनी खालील वर्णनाची मिळकत मिळकतींचे मुळ मालकांकडुन खरेदी करण्याचे ठरविले असुन तशी बोलणी देखील केलेली असुन सदर मिळकत कायम फरोक्त खरेदीखताने विकत घेण्याचे आमचे अशिलांनी ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | पो.ख. (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| निधवली | ५८/६ | ०-८८-०० | ०-१२-०० | १.२३ |

वरील वर्णनाची मिळकत व त्यातील दगड, धोंडा, पाणी, जाणे येण्याचा मार्ग सर्व वहिवाटी, सर्व हक्क दरोबस्त अशी मिळकत ही या जाहीर नोटीसीचा विषय असुन सोयीकरीता तिला यापुढे सदर मिळकत असे संबोधिले जाईल.

सदर मिळकत ही विद्यमान मालक यांचे ताबेकब्जातील, वहीवाटीतील, निर्वेध, बोजारहीत, विकण्यायोग्य असल्याची हमी मिळकतीचे मुळ मालक यांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तरी सदर मिळकतीवर अथवा तिचे कोणतेही भागावर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहीवाट, ताबेकब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बक्षिस, बोजा, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, भागीदारी, खरेदीखत, या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी योग्य त्या प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे लेखी स्वरुपात नोंदवाव्यात. या कालावधीत कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकती संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहीत मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

पेण
ता. १०/०१/२०२५

**ॲड. पुष्कर धनदास मोकल**
रा. ईशान्य को. ऑप. हौ. सोसायटी,
बी-विंग, पहिला मजला, फ्लॅट नं.१०३,
महाजन हॉस्पिटलचे बाजुला, चिंचपाडा,
पेण, ता. पेण, जि. रायगड.
मो.नं. ९८५०३६११७२, ८४२५९४१३२६

## जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. मंदार धनंजय ठाकुर, रा. दैवतेश्वर कॉलनी, कॉलेज रोड, व्ही.टी.सी. नाशिक यांनी खालील वर्णनाची मिळकत मिळकतींचे मुळ मालकांकडुन खरेदी करण्याचे ठरविले असुन तशी बोलणी देखील केलेली असुन सदर मिळकत कायम फरोक्त खरेदीखताने विकत घेण्याचे आमचे अशिलांनी ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | पो.ख. (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| निधवली | ५८/९/ग | ०-६५-७० | ०-०९-३० | ०.९१ |
| निधवली | ५८/९/भ | ०-६३-१० | ०-०८-९० | ०.८८ |
| निधवली | ५८/९/ल | ०-६३-१० | ०-०८-९० | ०.८८ |
| निधवली | ५८/९/व | ०-६३-१० | ०-०८-९० | ०.८८ |
| निधवली | ५८/९/स | ०-६३-१० | ०-०८-९० | ०.८८ |
| निधवली | ५८/९/श | ०-६३-१० | ०-०८-९० | ०.८८ |
| निधवली | ५८/९/ध | ०-६३-१० | ०-०८-९० | ०.८८ |
| निधवली | ५८/९/न | ०-६३-१० | ०-०८-९० | ०.८८ |
| निधवली | ५८/९/प | ०-६३-१० | ०-०८-९० | ०.८८ |
| निधवली | ५८/९/फ | ०-६३-१० | ०-०८-९० | ०.८८ |
| निधवली | ५८/९/ब | ०-६३-०० | ०-०९-०० | ०.८७ |
| निधवली | ५८/९/द | ०-६३-१० | ०-०८-९० | ०.८८ |

वरील वर्णनाच्या मिळकती व त्यातील दगड, धोंडा, पाणी, जाणे येण्याचा मार्ग सर्व वहिवाटी, सर्व हक्क दरोबस्त अशी मिळकती ह्या या जाहीर नोटीसीचा विषय असुन सोयीकरीता त्यांना यापुढे सदर मिळकती असे संबोधिले जाईल.

सदर मिळकती ह्या विद्यमान मालक यांचे ताबेकब्जातील, वहीवाटीतील, निर्वेध, बोजारहीत, विकण्यायोग्य असल्याची हमी मिळकतीचे मुळ मालक यांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तरी सदर मिळकतीवर अथवा तिचे कोणतेही भागावर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहीवाट, ताबेकब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बक्षिस, बोजा, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, भागीदारी, खरेदीखत, या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी योग्य त्या प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे लेखी स्वरुपात नोंदवाव्यात. या कालावधीत कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकती संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहीत मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

पेण
ता. १०/०१/२०२५

**ॲड. पुष्कर धनदास मोकल**
रा. ईशान्य को. ऑप. हौ. सोसायटी,
बी-विंग, पहिला मजला, फ्लॅट नं. १०३,
महाजन हॉस्पिटलचे बाजुला, चिंचपाडा,
पेण, ता. पेण, जि. रायगड.
मो.नं. ९८५०३६११७२, ८४२५९४१३२६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे-आवळस, तालुका-कर्जत, जि.-रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| कृष्णाबाई नारायण महाडीक<br>संतोष नारायण महाडीक<br>सचिन नारायण महाडीक<br>स्वाती नारायण महाडीक<br>मिनाक्षी सुरेश मोरे | ३२ | ३/ब | ०-३२-४० | ५-४४ |

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत ही तद्ंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली जमीन मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. ११/०१/२०२५

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड. स्वप्निल बाबूराव देशमूख**
पत्ता. मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं.२४,
डी विंग, मुद्रे बुद्रक, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९२७३२२४६८०/८८३०५६०९६२

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. जनार्दन विष्णु पाटील व श्री. राजेश विष्णु पाटील, दोघे रा. घर नं. ३०१, पाटणोली, पनवेल उरण रोड, दत्त मंदिर जवळ, कुंडेवाहळ, ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२०६, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे खांडस, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.**

| स. नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ८०/३ | १.४९.०० | १.०० | श्री. जनार्दन लडकु कुरंगले, वैगरे एकुण ४ |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- ११/०१/२०२५

सही /-
**ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत,''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे .
मो. नं. ७३८५००४८०६.

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे वंजारवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतींचे मालक मुकेश आनंदराव सावे यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ८ | १८/अ | १-२२-०० | १-०६ |
| ८ | ३/ब | ०-८०-०० | ०-६२ |
| ८ | १७ | ०-३५-०० | ०-३० |

सबब सदर वर नमुद केलेल्या मिळकतींच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १० दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर वर नमुद केलेल्या मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतींचे मालकाबरोबर पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ११/०१/२०२५

**ॲड. सी. बी. ओसवाल**
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर-निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि. रायगड -४१०२०१.

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे तिलोरे, ता.पेण, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल श्री. प्रविण मुकुंद पाटील, रा. जासई, ता.उरण, जि.रायगड, व श्री.दिलीप अर्जुन जोशी रा.नवघर, ता.उरण यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक श्री. अजिंक्य चंद्रकांत पोटे यांच्याकडून रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./गट नं./हि.नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| तिलोरे | ९९/१ | ०.२२.०० पो.ख.०.००.०० एकूण क्षेत्र ०.२२.०० | ०.१६ |

वरील संपुर्ण क्षेत्र आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिपः सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

ठिकाण: पेण
दि. ११/०१/२०२५

सही /-
**ॲड हेमा ज. पाटील (घोडिंदे)**
साई श्रध्दा सबुरी बिल्डिंग बी-विंग,
ब्लॉक नं. ००२ प्रभु आळी, पेण

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकविस) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे - हालिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.-पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| श्री. बाळकृष्ण बाबु बोराडे | ३१ | ३/अ/१ | ०-२०-२० | २ | ५० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४, चौथा मजला, गणेश अपार्टमेंट, कर्जत नगरपालिका कार्यालय शेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- ११/०१/२०२५
मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com

## सहयोग व्यापारी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अलिबाग

**ठिकरूळ नाका-अलिबाग**
**कर्मचारी भरती २०२५**

सहयोग व्यापारी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अलिबाग या संस्थेमध्ये १ लेखनिक व एक संगणक तज्ञ अशा एकूण २ पदांच्या जागा खालील अटीनुसार भरावयाच्या आहेत. तरी पात्रता असणाऱ्या उमेदवारांनी दिनांक २५/०१/२०२५ पर्यंत पतसंस्थेच्या ठिकरूळ नाका अलिबाग या कार्यालयीन पत्त्यावर अर्ज करावेत.

**अ) लेखनिक पद**

१. शैक्षणिक पात्रता-कोणत्याही शाखेचा पदवीधर (बी.कॉम./बी.ए./बी.एस्सी) पास
२. महाराष्ट्र शासनाची एम.एस.सी.आय.टी. संगणक परिक्षा पास
३. महाराष्ट्र शासनाची टंकलेखन मराठी व इंग्रजी प्रती मिनिट ३० शब्दगतीने पास असणे आवश्यक आहे.
४. दिनांक ०१-०१-२०२५ रोजी उमेदवाराचे वय १८ वर्ष पूर्ण असावे य ३५ वर्षांपेक्षा जास्त नसावे कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल प्रोवेशन कालावधी १ वर्ष राहील.

**आ) संगणक तज्ञ पद**

१. शैक्षणिक पात्रता उमेदवार सॉफ्टवेअर इंजीनियर मधील पदवी किंवा पदवीकाधारक असावा. पतसंस्थाच्या सॉफ्टवेअर कामाचा २ वर्षाचा अनुभव असावा/सहकार क्षेत्रातील कामाचा अनुभव असावा/महाराष्ट्र शासनाची एम.एस. सी.आय.टी संगणक परिक्षा व महाराष्ट्र शासनाची टंकलेखन मराठी व इंग्रजी प्रती मिनिट ३० शब्दगतीने पास असणे आवश्यक आहे. प्रोवेशन कालावधी १ वर्षे राहील. उमेदवाराचे वय ०१-०१-२०२५ रोजी १८ वर्षे पूर्ण व ३५ वर्षांपेक्षा जास्त नसावे.

**श्री. योगेश रामदास मगर** — **चेअरमन**
**श्री. संजय हरिश्चंद्र पाटील** — **व्हा. चेअरमन**
**सहयोग व्यापारी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अलिबाग**


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

\- मुख्य संपादक


## MAHATRANSCO — E –TENDER NOTICE

Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000034847**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/ e-Tender-72/ 2023-2024.**<br>RFx e-tender for work of Painting of Power Transformer/ICT at various substations under EHV (O&M) Dn. Panvel...**3rd call**.<br>**Tender amount Rs. 18,63,907/- ,**<br>**EMD amount Rs. 18,639/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **10.01.2025, 18:00 Hrs. to 20.01.2025, 10:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 20.01.2025 up to 10:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **20.01.2025 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**

## सिडको — शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून,खालील तपशीलानुसार संबंधिताना भूखंड वाटपासाठी **जाहीर सूचना**.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र./ हिस्सा क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्यस्थितीनुसार जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वडघर ५९- करंजाडे | SR- ६/७ | १४४/० १४५/१ १४५/२A+२B | ०-४७-० ०-९३-३ १-११-८ | २२०० चौ.मी. | नोड करंजाडे सेक्टर-२, भूखंड क्र. २, क्षेत्र -२२०० चौ.मी. | १) श्री. रियाझ अजिज पटेल व दस्त क्र. ७१७४/२००४ दिनांक२०.०९.२०२४ रोजीच्या हक्कसोडपत्रानुसार २) श्री. फौजान इकबाल पटेल | -- |
| | | | एकूण | २-५२-१ | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितानी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकाच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितानी सदर जाहीर सूचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करुन वाटपपत्र करुन देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितानी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
तळ मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर,
नवी मुंबई ४०० ६१४.

**अति.मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (पनवेल)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/३९५/२०२४-२५

# निवडक




## ऑस्ट्रेलियन ओपन टेनिस ग्रँडस्लॅम स्पर्धा

**मेलबर्न :** गतविजेता यानिक सिनेर आणि सर्बियाचा दिग्गज नोव्हाक जोकोविच यांना रविवारपासून रंगणाऱ्या ऑस्ट्रेलियन ओपन टेनिस ग्रँडस्लॅम स्पर्धेत वेगवेगळ्या ड्रॉमध्ये स्थान मिळाले आहे. त्यामुळे यंदा ते एकमेकांविरुद्ध उपांत्य सामन्यात भिडणार नाहीत. गेल्या वर्षी सिनेरने उपांत्य सामन्यात जोकोविचला नमवले होते. अव्वल मानांकित सिनेर सलामीला निकोलस जारीविरुद्ध खेळेल. त्याच्या गटात टेलर फ्रिट्झ, बेन शेल्टन आणि दानिल मेदवेदेव या अनुभवी खेळाडूंचाही समावेश आहे. त्यामुळे सिनेरला प्रत्येक सामन्यात आपला सर्वोत्तम खेळ करावा लागेल. जोकोविच व स्पेनचा स्टार टेनिसपटू कार्लोस अल्काराझ यांचा सामना उपांत्यपूर्व फेरीत होऊ शकतो. महिलांमध्ये सबालेंका सलग तिसऱ्यांदा ऑस्ट्रेलियन जेतेपद पटकावण्याचा प्रयत्न करेल. याआधी मार्टिना हिंगीसने १९९७-१९९९ दरम्यान असा पराक्रम केला होता. भारताचा आघाडीचा टेनिसपटू सुमित नागल याचा सलामीचा सामना झेक प्रजासत्ताकच्या थॉमस माचाकविरुद्ध होईल. नागल सध्या एटीपी क्रमवारीत ९६ व्या स्थानी आहे. गेल्या वर्षी या स्पर्धेत नागलने सलामीला २७ व्या मानांकित कझाकस्तानच्या अलेक्झेंडर बुबलिक याला पराभवाचा धक्का दिला होता. मात्र, पुढील फेरीत त्याला चीनच्या जुनचेंग शांगविरुद्ध पराभवाचा सामना करावा लागला होता. आता तो कसा खेळ करणार याची उत्सुकता त्याच्या चाहत्यांना लागली आहे. त्यामुळे स्पर्धा कधी सुर होणार याकडे सर्वांचे लक्ष राहणार आहे.

## एन.जगदीशनचा अनोखा विक्रम

**मुंबई :** विजय हजारे ट्रॉफीच्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात तामिळनाडूचा सलामीवीर एन. जगदीशनने आपल्या उत्कृष्ट फलंदाजीने सर्वांची मनं जिंकली. या खेळाडूने स्फोटक फलंदाजी करत विरोधी संघाच्या एका गोलंदाजाला चांगलाच घाम फोडला. त्याने राजस्थानच्या अमन शेखावतच्या एकाच षटकात सलग ६ चौकार मारत त्याला दिवसा चांदण्या दाखवल्या. जगदीशनने शेखावतच्या षटकात एकूण ७ चौकार मारत २९ धावा कुटल्या. उजव्या



हाताचा मध्यमगती गोलंदाज अमन शेखावत डावातील दुसरे षटक टाकायला आला होता. त्याचा पहिलाच चेंडू वाईड होता, जो यष्टीरक्षकाच्या मागून सीमारेषेच्या बाहेर गेला. यानंतर अमन शेखावतने पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला. मात्र तो अयशस्वी ठरला. अमन शेखावतने सतत शॉर्ट बॉल टाकले आणि जगदीशनने ऑफ साइडच्या बाहेर कट आणि ऑन साइड पुल शॉट खेळून सलग ६ चौकार मारले. अशा प्रकारे अमनच्या प्रत्येक चेंडूवर तामिळनाडूला चौकार मिळाला. त्याने चांगलीच खळबळ उडवली.

## गावसकर यांनी केली भविष्यवाणी

**मुंबई :** नुकत्याच संपलेल्या बॉर्डर-गावसकर ट्रॉफी कसोटी मालिकेत शानदार कामगिरी करणारा भारताचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह याच्यातील नेतृत्वक्षमता प्रभावित करणारी आहे. तो लवकरच रोहित शर्माच्या जागी राष्ट्रीय संघाचे नेतृत्व करेल, असा विश्वास दिग्गज फलंदाज सुनील गावसकर यांनी व्यक्त केला. बुमराहने ऑस्ट्रेलिया दौऱ्यात ३२ बळी घेतले. ऑस्ट्रेलियाच्या भूमीत विदेशी गोलंदाजाची ही सर्वोत्कृष्ट कामगिरी आहे. नेतृत्वाचे सर्वच गुण त्याच्यात आहेत. बुमराहच्या नेतृत्वात पर्थमध्ये झालेला पहिला कसोटी सामना भारताने जिंकला होता. चॅनेल सेव्हनशी संवाद साधताना गावसकर म्हणाले, बुमराह भारतीय संघाचा पुढील कर्णधार असू शकेल. तो जबाबदारीने पुढे येत नेतृत्व करतो. त्याची वागणूक फार चांगली असून अनावश्यकदृष्ट्या कुणावरही दडपण आणण्याचा त्याचा स्वभाव नाही. नेतृत्वाचे सर्वच गुण त्याच्यात आहेत. अनेकदा कर्णधारावर अनावश्यक दडपण येते. बुमराह मात्र असा विचार करतो की, तुम्हाला दिलेली जी जबाबदारी आहे, ती पूर्ण करण्यासाठी संपूर्ण ताकद लावा; पण त्यासाठी कुणावरही दडपण आणत नाही. बुमराह मागच्या काही वर्षांपासून भारतीय गोलंदाजीचे नेतृत्व करीत आहे. त्याच्या मार्गदर्शनात मोहम्मद सिराजला वेगवान गोलंदाज म्हणून विकसित होण्यास मदत झाली आहे, हे विसरता येणार नाही.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- जमिनीची खरेदी व विक्री अलिबाग परिसरात NA. Plat उपलब्ध बुरुमखान, भुते, खडताळपुल, एरियामध्ये जागा उपलब्ध. सहाण, खानाव, भादाणेमध्ये जागा उपलब्ध. ऑफीस सन स्टोन रीयल इस्टेट अलिबाग, साईना कॉम्प्लेक्स, बायपास रोड ८६६९००६९०२,९२७०८८८८०३
- Vacancy for Office staff in Alibag Interested Graduate candidates can call 9923750549 For interview
- अलिबाग येथे वाडीमध्ये कामासाठी माणूस पाहिजे. राहण्याची सोय होईल. पगार १०,०००/- मो.नं.९८२००२९४५८.
- ST स्टॅन्ड च्या शेजारी वासुदेव कॉम्प्लेक्स या इमारतीत पहिल्या मजल्यावर ७०० sqft. road touch व्यापारी गाळा भाड्याने देण्याचा आहे. फोन no. 9271432026, 7387516945
- फर्निचर वर्कशॉपमध्ये कामाला मुले पाहिजेत. १० वी १२ वी पास/नापास पगार -१२०००/- रुपये महिना, १२ तास ड्युटी ठिकाण-बामणसुरे, चोंढी,संपर्क- ९८२३५८५३२१
- दुकान गाळा भाड्याने मिळेल ९४२३३७५१९८/८४११०१६४४४
- २ BHK प्रशस्त फ्लॅट विकणे आहे. ठिकाण : अलिबाग, ४ व्हिलर पार्किंग, २ लिफ्टस्, इमारतीचे उत्तम दर्जाचे बांधकाम, शाळा, कॉलेज, मच्छीमार्केट, भाजीमार्केट, हॉस्पिटल मंदिर, बँक यापासून अगदी जवळ. रक्कम ७५ लाख (कमी होतील.) मो. ९६७३९४८६३९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# चार संघाचा सुपर आठमध्ये प्रवेश

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**शेतकरी कामगार पक्ष, पुरोगामी युवक संघटना अलिबाग शहर पुरस्कृत व प्रशांत नाईक मित्रमंडळ अलिबाग आयोजित तीन दिवसीय नाईट टेनिस क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या पहिल्या दिवशी गुरुवारी (दि.०९) झालेल्या सामन्यात चार संघांनी सुपर आठमध्ये प्रवेश केला आहे. प्रत्यक्ष मैदानाबरोबरच ऑनलाईनदेखील क्रीडाप्रेमींनी या स्पर्धेचा आनंद लुटला. या सर्व सामन्यांचे समालोचन संदीप जगे यांनी केले.**






अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या संकल्पनेतून गतवर्षापासून अलिबाग चॅम्पियन्स ट्रॉफी नाईट टेनिस क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षीदेखील ही स्पर्धा अलिबाग येथील क्रीडा भूवनमध्ये भरविण्यात आली आहे. गुरुवारी सायंकाळी या स्पर्धेचा शुभारंभ शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. पहिल्या दिवशी गुरुवारी (दि.०९) सायंकाळी सुरु झालेली स्पर्धा शुक्रवारी(दि.१०) सकाळपर्यंत झाली. या स्पर्धेत वेगवेगळ्या संघातील खेळाडूंनी जिंकण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले. गोलदांज, क्षेत्ररक्षक, फलंदाज, यष्टीरक्षक अशा सर्वांनीच आपल्या परिने मेहनत घेत यश आपल्या हाती घेण्याचा प्रयत्न केला. वेगवेगळ्या संघातील गोलंदाजासह फलंदाज, क्षेत्ररक्षक, यष्टीरक्षकांची कामगिरी महत्वपूर्ण ठरली.

प्रेक्षणीय सामना अलिबाग प्रेस असोसिएशन विरूध्द ॲड. इलेव्हन अलिबाग या संघात झाला. ॲड. इलेव्हन संघाने सुरुवातीला फलंदाजी स्वीकारली. चार षटकात ७० धावा केल्या होत्या. अलिबाग प्रेस असोसिएशन समोर चार षटकांत ७१ धावांचे आव्हान होते. मात्र चार षटकात फक्त १६ धावा देत चार खेळाडू बाद करीत ॲड. इलेव्हन संघाने हा सामना जिंकला. ॲड. इलेव्हन अलिबाग संघ प्रेक्षणीय सामन्याचा विजेता ठरला असून ॲड. महेश म्हात्रे सामनावीर ठरले. तसेच अलिबाग प्रेस असोसिएशन संघ उपविजेता ठरला. या दोन्ही संघाला मान्यवरांच्या हस्ते चषक देऊन गौरविण्यात आले.

त्यानंतर प्रत्यक्ष निमंत्रित संघामध्ये सामना भरविण्यात आला. सुरुवातीचा सामना अर्जून इलेव्हन दिघोडी आणि जे.डी. भार्गवी इलेव्हन अलिबाग या संघात झाला. त्यामध्ये दिघोडी संघाने क्षेत्ररक्षण स्वीकारले. भार्गवी इलेव्हन संघाने फलंदाजी करीत ५ षटकात सहा बाद २२ धावा काढल्या. त्यामुळे दिघोडी संघासमोर पाच षटकात २३ धावांचे लक्ष होते. २.१ षटकात एक बाद २६ धावा करीत त्यांनी विजय मिळविला.

प्रफुल्ल ॲन्ड निलेश स्पोर्टस साखर आणि फैजी इलेव्हन अलिबाग या संघामध्ये दुसरा सामना झाला. फैजी इलेव्हन संघाने क्षेत्ररक्षण केले. पाच षटकात प्रफुल्ल ॲन्ड निलेश स्पोर्टस साखर संघाने ३६ धावा केल्या. फैजी संघासमोर विजयासाठी ३७ धावांचे आव्हान होते. परंतु पाच षटकात फक्त २६ धावांवर हा खेळ संपविण्यास साखर संघाला यश आले. या सामन्यातील दुसरा विजेता साखर संघ ठरला.

तिसरा सामना अर्जून इलेव्हन दिघोडी आणि प्रफुल्ल ॲन्ड निलेश स्पोर्टस् साखर या संघामध्ये झाला. दिघोडी संघाने क्षेत्ररक्षण स्वीकारले. साखर संघाने पाच षटकात ४५ धावा केल्या. त्यांनतर दिघोडी संघाने फलंदाजीला सुरुवात केली. ४६ धावांची गरज या संघाला होती. परंतू पाच षटकात ३९ धावांमध्येच हा सामना संपला. त्यामुळे तिसऱ्या सामन्यातील साखर संघ विजेता ठरला.

चौथा सामना जे.डी. भार्गवी इलेव्हन अलिबाग आणि फैजी इलेव्हन अलिबाग या संघामध्ये झाला. भार्गवी संघाने पाच षटकात ४७ धावा केल्या होत्या. विजयासासाठी फैजी संघासमोर ४८ धावांचे लक्ष होते. परंतू पाच षटकामध्ये फैजी संघाला ३८ धावांवर समाधान मानावे लागले. या स्पर्धेतील भार्गवी संघ विजेता ठरला. पहिल्या दिवशी झालेली नाईट टेनिस क्रिकेट स्पर्धा आठ संघामध्ये झाली.

दरम्यान, आठ संघाच्या सामन्यात चार संघ विजयी झाले असून ते सुपर एटमध्ये गेले आहेत. प्रफुल्ल ॲन्ड निलेश स्पोर्टस् साखर, जे.डी. भार्गवी इलेव्हन अलिबाग, ए.बी. ग्रुप अलिबाग आणि यु. व्ही. स्पोर्टस् अलिबाग या संघाचा त्यामध्ये समावेश आहे.

### विजेत्यांना आकर्षक बक्षिसे

शनिवारी सायंकाळपासून सुपर एटच्या संघामध्ये लढत होणार आहे. त्यात विजयी चार संघात सामना रंगणार आहे. अंतिम विजेता संघ अलिबाग चॅम्पियन्स चषकाचा मानकरी ठरणार आहे. अंतिम विजेत्या संघाला दोन लाख रुपये व चषक, द्वितीय क्रमांकाला एक लाख रुपये व चषक, तृतीय व चतुर्थ क्रमांकाला प्रत्येकी ५० हजार रुपये व चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. मालिकावीराला दुचाकी, उत्कृष्ट गोलंदाज व फलंदाज यांना सायकल आणि विजेता व उपविजेता संघ मालकाला एलईडी टीव्ही देऊन सन्मानित केले जाणार आहे.

### कोण ठरणार अलिबाग 'चॅम्पियन्स'

अलिबागच्या समुद्रकिनारी असलेल्या क्रीडा भुवन येथे नाईट टेनिस क्रिकेट स्पर्धेचा थरार सुरु आहे. या स्पर्धेच्या अंतिम सामन्यानंतर कोण ठरणार अलिबागच्या चॅम्पियन्स ट्रॉफीचा मानकरी याकडे प्रेक्षकांसह संपूर्ण अलिबागकरांचे लक्ष लागून राहिले आहे. गुरुवारपासून क्रीडा भूवन येथे क्रिकेट स्पर्धेला सुरुवात झाली. पहिल्या दिवशी आठ संघामध्ये स्पर्धा झाली. त्यात चार संघाची सुपर आठ मध्ये निवड झाली. दुसऱ्या दिवशीदेखील शुक्रवारी सायंकाळपासून सामने सुरु झाले. यामधील चार संघाची सुपर आठमध्ये निवड होणार आहे. शनिवारी सायंकाळी सुपर आठ संघातील क्रिकेटचा थरार पहावयास मिळणार आहे. या स्पर्धेच्या अंतिम सामन्यानंतर संघातील अलिबाग चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५चा मानकरी कोण ठरणार आहे, याकडे लक्ष लागून राहिले आहे.

---

*महाराष्ट्राच्या दोन्ही संघानी बाद फेरी गाठली*

# ५० वी कुमार-कुमारी गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्राच्या दोन्ही संघानी ५० व्या कुमार-कुमारी गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत साखळी सामन्यात सलग दोन विजय मिळवीत बाद फेरी गाठण्याच्या दिशेने पहिले पाऊल टाकले. अखिल भारतीय कबड्डी महासंघाच्या मान्यतेने उत्तर प्रदेश जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या विद्यमाने रोशनबाग बंदिस्त क्रीडा संकुलात सायंकाळच्या सत्रातील ग गटात महाराष्ट्राच्या मुलींनी चुरशीच्या लढतीत चंदीगडला ५१-४७ असे रोखत बाद फेरी गाठण्याचा आपला मार्ग मोकळा केला.



पहिल्या डावापासून रंगतदार ठरलेल्या या सामन्यात विश्रांतीला २२-१८ अशी आघाडी महाराष्ट्राकडे होती. आघाडी निसटू न देता महाराष्ट्राने आपला विजय निश्चित केला. महाराष्ट्राच्या मुलींची साखळीतील शेवटची लढत उत्तरांचल संघाशी होईल. सकाळी झालेल्या कुमारी ग गटात महाराष्ट्राने मणिपूरचा ५२-३० असा पराभव करीत पहिल्या साखळी विजयाची नोंद केली. आक्रमक सुरुवात करीत पूर्वार्धात ३१-१४ अशी आघाडी घेणाऱ्या महाराष्ट्राने उत्तरार्धात सावध खेळावर भर देत गुणांचे अर्धशतक पार केले. १८ गुणांनी महाराष्ट्राने सामना आपल्या बाजूने झुकविला.

सायंकाळच्या सत्रात मुलांच्या इ गटात महाराष्ट्राने कर्नाटकला ३३-२२ असे रोखत बाद फेरी गाठण्याच्या दृष्टीने आणखी एक पाऊल टाकले. विश्रांतीला २३-११ अशी आघाडी घेणाऱ्या महाराष्ट्राने ११ गुणांच्या फरकाने विजय मिळविला. महाराष्ट्राची साखळीतील शेवटची लढत दिल्ली संघाशी होईल.

दरम्यान, मुलांच्या इ गटात महाराष्ट्राने आसामला ३७-०७ असे सहज नमविले. मुलांचा इ गटात समावेश असून मुलींचा ग गटात समावेश आहे. आता कोण बाजी मारणार याकडे चाहत्यांचे लक्ष लागले आहे.

# चेस ट्रेनर बनण्याची सुवर्णसंधी

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना चेस इन स्कूल ( शाळेत बुद्धिबळ) हा उपक्रम २०२५-२६ पासून सुरु करणार आहे. रायगडमध्ये बुद्धिबळ वाढावा असे वाटते त्यांनी या प्रशिक्षण शिबिरांमध्ये भाग घेवून चेस ट्रेनर पदवी घ्यावी. तसेच आपल्या जवळच्या किमान दोन शाळांमधून हा उपक्रम राबवावा, अशी अपेक्षा आहे. रायगडमध्ये १२ जानेवारी २०२५ रोजी प्रशिक्षण आयोजित केले आहे.

भारतामध्ये सध्या बुद्धिबळ या खेळाने चांगलाच जोर पकडला आहे. आपल्याकडील मुलेही मागे पडणार नाहीत. याची काळजी आपण घेतली पाहिजे. आपण जर बुद्धिबळ प्रेमी आहोत तर आपली जबाबदारी आहे की या खेळाचा प्रचार आणि प्रसारासाठी आपणच प्रयत्न केले पाहिजेत. म्हणूनच याचाच एक भाग म्हणून शाळेत बुद्धिबळ हा उपक्रम या वर्षी जून २०२५ पासून ५०० शाळांमधून राबविण्यात येत आहे. त्यासाठी बुद्धिबळ ट्रेनरची आवश्यकता असल्याने ट्रेन द ट्रेनरस या कॅम्पमार्फत बुद्धिबळ ट्रेनर्स ही पदवी देवून प्रशिक्षक तयार करण्यात येणार आहेत. किमान एक-दोन शाळेतून बहुसंख्य विद्यार्थ्यांना खेळात आणतील.

या प्रशिक्षणाचा भाग होऊन आपला सहभाग नोंदवावा. अधिक माहिती साठी ८८८८०११४११ विलास म्हात्रे अलिबाग यांच्याशी संपर्क साधावा.

# 'गौतम गंभीर ढोंगी'...

## माजी खेळाडू मनोज तिवारीची टीका

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भारतीय संघाच्या अलीकडच्या कामगिरीवर माजी फलंदाज मनोज तिवारीने प्रश्न उपस्थित करत गौतम गंभीरच्या प्रशिक्षक शैलीवर सडकून टीका केली आहे. गंभीर ऐवजी व्हीव्हीएस लक्ष्मण आणि साईराज बहुतुले हे भारतीय संघाचे प्रशिक्षक करण्यासाठी आदर्श पर्याय ठरले असते, असेही तो म्हणाला आहे.

गंभीरच्या प्रशिक्षकपदी विराजमान झाल्यानंतर भारतीय संघाने २७ वर्षात प्रथमच श्रीलंकेत वनडे मालिका गमावली. त्यानंतर घरच्या मैदानावर न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत संघाला ०-३ असा पराभव स्वीकारावा लागला होता. तसेच १० वर्षांनंतर पहिल्यांदाच ऑस्ट्रेलियाविरुद्ध बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीमध्ये संघाला पराभव पत्करावा लागला. मनोज तिवारी म्हणाला की, गौतम एक गंभीर ढोंगी आहे.



तो जे बोलतो ते करत नाही. रोहित शर्मा कोठला आहे? मुंबईचा आहे. अभिषेक नायर कोठून आहे? मुंबईचा आहे. त्याला मुंबईचे खेळाडू पुढे ठेवण्याची संधी मिळाली आहे. जलज सक्सेनासाठी बोलणारे कोणी नाही.

तो चांगली कामगिरी करतो, पण शांत राहतो. आता हा मॉर्ने मॉर्केल लखनौ सुपर जायंट्सकडून आला आहे. अभिषेक नायर केकेआरमध्ये गंभीरसोबत होता. हे लोक गौतम गंभीरसाठी सोयीस्कर आहेत. हे सर्व गंभीर सांगेल त्याप्रमाणे वागणारे लोक आहे. म्हणूनच त्यांचा कोचिंग स्टाफमध्ये समावेश करण्यात आला आहे, अशी जोरदार टीका तिवारी याने केली.

# काव्याचा संघ ७७ धावांत तंबूत

**मुंबई :** इंडियन्स फ्रँचाझीचा संघ असलेल्या केप टाऊ संघाने २०२५ च्या पहिल्याच सामन्यात दमदार कामगिरी केली. संघाने पहिल्याच सामन्यात दोन वेळच्याविजेत्या सनरायझर्स इस्टर्न केप संघाला ९७ धावांनी पराभूत केले. वर्चस्वपूर्ण विजयात डेलानो पॉटगिएटर चमकला. त्याने १० धावांत ५ विकेट्स घेऊन काव्या मारनच्या संघाला ७७ धावांत तंबूत पाठवले. त्याने फलंदाजीतही १२ चेंडूत २५ धावांचे योगदान दिले. ज्याच्या जोरावर केप टाऊन संघाने १७४ धावांपर्यंत मजल मारली. पॉवर प्लेमध्ये संघाची अवस्था २ बाद ३६ अशी झाली होती. रिचर्ड ग्लीसन आणि लियाम डॉसन यांनी प्रभावी मारा करून केप टाऊनला ४२ धावांवर तिसरा झटका दिला. पण, डेवाल्ड ब्रेव्हिसने अनुभवी कॉलिन इंग्रामसह ६७ धावांची भागीदारी केली. ब्रेव्हिसने २९ चेंडूत ५७ धावा केल्या.

# इंग्लंड विरुद्ध वनडे मालिकेत दोघांना पदार्पणाची संधी

## नितीशकुमार रेड्डी, हर्षित राणाच्या नावाची चर्चा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील कसोटी मालिकेनंतर भारतीय संघ घरच्या मैदानावर इंग्लंड विरुद्ध पाच टी-२० सामन्यांच्या मालिकेसह ३ सामन्यांची वनडे मालिका खेळणार आहे. चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेआधी इंग्लंड विरुद्ध रंगणाऱ्या वनडे मालिकेतून यशस्वी जैस्वालसह नितीशकुमार रेड्डी आणि हर्षित राणा या युवा खेळाडूंना वनडे संघात पदार्पणाची संधी मिळू शकते.

यशस्वी जैस्वालसाठी इंग्लंड दौरा खास असणार आहे. यशस्वी जैस्वाल याने अल्पावधित आपली छाप सोडली आहे. २३ वर्षीय युवा सलामीवीराला इंग्लंड विरुद्धच्या वनडे मालिकेत संधी मिळू शकते. जैस्वालने टी-२० सह टेस्टमध्ये आपल्यातील क्लास दाखवून दिला आहे. आता वनडेत छाप सोडण्यासाठी तो उत्साहीत असेल. आगामी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेसाठीही तो टीम इंडियाचा




भाग असेल, असे बोलले जाते. रोहित शर्मा आणि शुबमन गिलच्या बॅकअपच्या रुपात तो पहिली पसंती असेल.

नितीशकुमार रेड्डी या युवा खेळाडूने ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर आपल्यातील धमक दाखवून दिली आहे. कसोटीत छाप सोडल्यानंतर आता हा क्रिकेटर वनडे संघात एन्ट्रीसाठी तयार आहे. बॉर्डर गावसकर स्पर्धेत एका बाजूला स्टार खेळाडू अपयशी ठरले तिथं या युवा खेळाडूनं मैदानात तग धरून सातत्यपूर्ण चांगली कामगिरी केली. चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेसाठीच्या संभाव्य संघात या अष्टपैलू खेळाडूचा समावेश असून इंग्लंड विरुद्ध घरच्या मैदानात तो पहिला वनडे सामना खेळताना दिसले तर नवल वाटणार नाही. हर्षित राणाचंही वनडे पदार्पण निश्चित मानल जात आहे. इंग्लंड विरुद्धच्या वनडे मालिकेनंतर भारतीय संघ चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा खेळणार नाही.

या स्पर्धेआधी जसप्रीत बुमराहसह स्टार गोलंदाजांना विश्रांती मिळू शकते. या परिस्थितीत हर्षित राणासाठी वनडेत पदार्पणाची संधी निर्माण झाल्याचे पाहायला मिळेल. आयपीएलसह देशांतर्गत क्रिकेटमध्ये उल्लेखनिय कामगिरी केल्यावर हर्षित राणाला ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर टीम इंडियाकडून पदार्पणाची संधी मिळाली होती.

कसोटीत ३ डावात ४ विकेट्स घेणारा हर्षित राणा इंग्लंड विरुद्धच्या वनडे मालिकेत टीम इंडियाच्या गोलंदाजीतील प्रमुख गोलंदाजांपैकी एक असेल, अशी जोरदार चर्चा क्रिकेट वर्तुळात चर्चिली जात आहे.

मानसशास्त्रज्ञ पतीने दिले पत्नीला पाठबळ | भारत श्री मिळवण्याची व्यक्त केली इच्छा

# शुभांगी सुतार पहिल्या महिला शरीरसौष्ठवपटू

**। सांगली । वृत्तसंस्था ।**

शरीरसौष्ठव हे खर तर पुरुषी क्रीडा प्रकाराचे क्षेत्र म्हणून ओळखले जाते. आपल्या डौलदार, पिळदार आणि प्रमाणबद्ध शरीराचे सौष्ठव म्हणजे बळकट शरीराचे जाहीर प्रदर्शन करणे होय. या खेळात खेळाडूंना खूपच मेहनत घ्यावी लागते. स्पर्धा म्हणून शरीराचे प्रदर्शन करण्यात पुरुषाला जशी सवय असते, तसे महिलांनी करणे म्हणजे धाडस. परंतू विटा येथील शुभांगी सुतार या पश्चिम महाराष्ट्रातील पहिल्या महिला शरीरसौष्ठवपटू ठरल्या आहेत.

सर्वच क्षेत्रांत पुरुषांवर मात करून आघाडीवर असणारी नारीशक्तीही आज पुरुषांच्या क्षेत्रात संचार करत आहे. महिलांनी शरीर दाखवणे ही समाजमान्य नसणारी गोष्ट. मात्र शरीराचा प्रत्येक अवयव बांधेसूद असावा, अशी अपेक्षा शरीरसौष्ठव प्रकारात असते. कोल्हापूर जिल्ह्यातील अरळगुंडी (ता. गडहिंग्लज) येथील शुभांगी यांचा विवाह विट्यातील कैलास सुतार यांच्याशी झाला. मानसशास्त्रज्ञ कैलास यांनी पूर्वी शरीरसौष्ठव स्पर्धा गाजवल्या आहेत. यशराज व सोनिका ही दोन फुले संसारवेलीवर उमलल्यानंतर त्यांनी तब्येत तंदुरुस्त ठेवण्यासाठी 'जिम'



सुरू केली. दीड वर्षांपूर्वी त्यांनी शरीरसौष्ठव प्रकाराकडे वळताना पती कैलास यांच्याकडून सर्व गोष्टींचे बारकावे जाणून घेतले. उंची कमी असल्याने त्यांनी त्या प्रमाणात वजन, स्नायूंची प्रमाणबद्ध वाढ व पिळदार शरीरयष्टी या गोष्टींवर लक्ष केंद्रित केले. परीक्षकांच्या दृष्टीने महत्त्वाच्या गोष्टींवर जादा भर देऊन शरीराला आवश्यक व्यायाम सुरू केला. सकाळी एक तास व सायंकाळी दोन तास असा 'वर्कआऊट' केला. विशेषतः स्नायू व चपळता यावर शरीरसौष्ठव स्पर्धेत गुण दिले जातात. त्यादृष्टीने व्यायाम व आहाराचे नियोजन केले. ४८ किलो असणारे वजन आज ५५ किलोपर्यंत वाढले तरी ते प्रमाणबद्ध आहे. हरभरा, मोड आलेली कडधान्ये, चपाती, भाजी, भात असा आहार घेताना प्रोटिनसाठी रोज ६ अंडी खातात. पुण्यातील शिवनेरी केसरी ही जुन्नर येथे झालेली स्पर्धा त्यांच्या आयुष्यातील पहिली ठरली. प्रशिक्षक राम साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव सुरू आहे.

> **शरीरसौष्ठव हे क्रीडा क्षेत्र मला नवे होते. समाजासमोर अंगप्रदर्शन करणे हा आपल्या समाजाच्या दृष्टीने लाजीरवाणा प्रकार. सुरुवातीला त्या गोष्टींचे प्रचंड दडपण होते. मात्र, पती कैलास यांनी दिलेली साथ व पाठबळ महत्त्वाचे ठरले. नॅशनल ॲमॅच्युअर बॉडीबिल्डर्स असोसिएशन (एनएबीबीए) तर्फे घेण्यात येणाऱ्या स्पर्धांत सहभागी होण्याचा मानस आहे. 'भारतश्री' हा किताब मिळवणे माझे ध्येय आहे.**
>
> **- शुभांगी सुतार, महिला शरीरसौष्ठवपटू, विटा.**

# बालांगण



## बनवा घरट्याची प्रतिकृती

**फन टाईम**

छोट्या दोस्तांनो, नव्या वर्षात काही तरी वेगळं करायचंय का? मग नेचर वॉकला चला. अभयारण्यात जाऊन पक्षी बघा. जवळच्या डोंगरावरही जाता येईल. सकाळी लवकर उठलात तर घराच्या बाहेरही विविध पक्षी दिसू शकतील. मित्रांनो, पक्षी घरटी तयार करतात. एवढी छान, सुबक आणि मजबूत घरटी त्यांना कशी बरं बांधता येत असतील, असा प्रश्न पडलाय का कधी? पडला असेल तर पक्ष्यांच्या घरट्याची कलाकृती तयार करून याचं उत्तर जाणून घेऊ शकता. यासाठी काही वस्तू जमवाव्या लागतील. पक्षी जमवतात अगदी तश्शाच! मग बनवायचं ना घरटं?



साहित्य : पानं, पालापाचोळा, कळ्या, फुलांचे देठ, काटक्या, काड्या, पिसं, गवत आणि भुसा. एखाद्या अभयारण्यात जाणार असाल तर सोबत पिशवी घेऊन जा. या वस्तू जमवा. गम, कागदी पिशवी, ब्राऊन पेपर, कापडी पोत्यासारखं कापड, रंगीत कागदी प्लेट, गुगली आईज, पक्ष्यांचे आकार कापण्यासाठी कागद, कात्री इत्यादी.

कृती : सर्वात आधी घरट्यासाठी लागणाऱ्या वस्तू तुम्हाला जमवायच्या आहेत. तुमच्याकडील कागदाचे पक्ष्यांचे आकार कापा किंवा पक्ष्याच्या चित्राची प्रिंटही काढता येईल. आकार कापून घ्या. आता तुम्हाला पक्ष्याचं घरटं तयार करायचं आहे. यासाठी पोत्याचं जाड कापड घ्या. हे कापड अर्धगोल आकारात कापा. आता हा तुकडा पेपर प्लॅटच्या खालच्या भागात चिकटवा. आता त्यावर पक्षी चिकटवा. नंतर पोत्याच्या तुकड्यावर इतर वस्तू चिकटवता येतील. काटक्या, काड्या, कापूस, पिसं, वाळलेली पानं, फुलं, देठ या सगळ्या वस्तू चिकटवा. पेपर प्लेट अजून सजवायची असेल तर अशाच काड्या, पानं, फुलं चिकटवता येतील. पांढऱ्या कागदाचे अंड्याचे आकार कापा. पक्ष्याच्या खाली ते चिकटवता येतील. आता तुमची कल्पकता वापरा आणि इतर सजावट करा. गम पूर्णपणे वाळू द्या. ही कलाकृती घरात ठेवता येईल किंवा कुणाला गंमत म्हणून भेटही देता येईल.

## लिथुआनियाविषयी...

**सफर देशांची**

युरोप खंडातल्या बऱ्याच छोट्या देशांपैकी एक म्हणजे लिथुआनिया. उत्तर युरोपातला हा देश बाल्टिक समुद्राच्या पूर्व किनाऱ्यावर वसला आहे. या देशाची लोकसंख्या ३० लाखांच्या घरात आहे. 'लिथुआनियन' ही इथली प्रमुख भाषा. देशातले ८२ टक्के लोक ही भाषा बोलतात. 'व्हिल्नियस' या देशाची राजधानी आणि सर्वात मोठं शहर. १७९५ मध्ये लिथुआनिया रशियन साम्राज्याचा भाग झाला. १६ फेब्रुवारी १९१८ या दिवशी हा देश स्वतंत्र झाला. पण लिथुआनियावर आक्रमणं सुरूच राहिली. १६ जून १९४० या दिवशी 'सोव्हिएत युनियन'ने या देशाचा ताबा घेतला. १९४१ ते १९४४ या काळात लिथुआनियावर नाझी जर्मनीचं राज्य होतं. १९४४ पासून १९९० पर्यंत हा देश पुन्हा 'सोव्हिएत युनियन'च्या ताब्यात होता. ११ मार्च १९९० या दिवशी लिथुआनियाला स्वातंत्र्य मिळालं.




हा देश नाटो आणि युरोपियन युनियनचा सदस्य आहे. या देशाला ९९ किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभला आहे. 'नेमुनास' ही या देशातली सर्वात मोठी नदी. लिथुआनियाचा बराचसा भाग सपाट आहे. देशात ३३ टक्के वनसंपदा आहे. या देशात बरेच तलावही आहेत. भरपूर जंगल असल्यामुळे इथे लाकूड उद्योग मोठ्या प्रमाणावर आहे. या देशात पाच राष्ट्रीय तर ४०२ निसर्ग उद्यानं आहेत. देशात वन्य प्राणीही मोठ्या प्रमाणावर आहेत. निसर्गसौंदर्याने नटलेल्या या देशात पर्यटक मोठ्या संख्येने येतात. युरोपातल्या इतर देशांप्रमाणे युरो हे इथलं प्रमुख चलन असलं तरी 'लिथुआनियन लिटास' या चलनाचा वापरही केला जातो.

**ठिपके जुळवा**



## सोनं का गंजत नाही?

**जाणून घ्या**

लोखंडाच्या वस्तू पटकन गंजतात. पण सोन्याच्या दागिन्यांवर गंज चढत नाही. कितीही वापरले तरी सोन्याचे दागिने खराब होत नाहीत. लोखंड आणि सोनं हे दोन्ही धातू असले तरी लोखंडाप्रमाणे त्यावर गंज का चढत नाही, असा प्रश्न तुमच्या मनात आला असेल. चला तर मग याचं कारण जाणून घेऊ या.

सोनं हा एक निष्क्रिय धातू आहे. त्यामुळे त्याचा वातावरणातल्या कोणत्याही घटकाशी किंवा वायुशी संपर्क आला तर कोणतीही रासायनिक प्रक्रिया घडत नाही. लोखंडावर गंज चढण्यासाठी या धातूची वातावरणातल्या ऑक्सिजनशी प्रक्रिया व्हावी लागते. या प्रक्रियेनंतर आयर्न ऑक्साइडची निर्मिती झाल्याने लोखंड गंजतं. सोनं म्हणजे सुवर्ण निसर्गात शुद्ध स्वरूपात असतं. तसंच हा मऊ धातू आहे. मात्र दागिने घडवताना सोन्यात थोड्या प्रमाणात तांबं किंवा पितळ मिसळलं जातं. यामुळे या धातूला काठिण्य येतं आणि दागिने तयार करणं सोपं होतं.



काही काळानंतर सोन्याच्या दागिन्यांची चमक कमी झाल्याचं आपल्याला जाणवतं. सोन्याची कोणत्याही वायुसोबत रासायनिक प्रकिया होत नसली तरी यात मिसळलेल्या इतर धातूंचा ऑक्सिजनशी संपर्क होऊन ऑक्साइडची निर्मिती होते. यामुळे सोन्याचे दागिने फिके दिसतात. मात्र या ऑक्साइड्सचा रंग लाल किंवा भुरकट नसतो. त्यामुळे दागिने लालसर दिसत नाहीत. सोन्यात कधीही लोखंड मिसळलं जात नाही.

## देखणे ब्लू सी ड्रॅगन

**दोस्त हे मस्त**

दोस्तांनो, प्राणी-पक्ष्यांच्या विविध प्रजातींचे शोध सतत लागत असतात. काही तरी नवं सापडत राहतं आणि अशा जिवांविषयी कुहुतहल वाढत राहतं. ऑस्ट्रेलियातील समुद्र किनाऱ्यावर 'ब्लू सी ड्रॅगन' नावाचा एक जलचर सापडलाय. या जलचराचे फोटो सोशल मिडियावर वायरल होत आहेत. हा जलचर क्वींसलँड येथील समुद्र किनाऱ्यावर सापडलाय. त्यामुळे संशोधकांमध्ये उत्साहाचं वातावरण आहे. 'ब्लू सी ड्रॅगन' हा सागरी जीव असून तो उडू शकतो. त्यामुळेच त्याच्या अस्तित्त्वाबाबत कुतुहल निर्माण झालंय. 'ग्लॉसियस अटलांटियस' या जलचरांच्या प्रजातीतील अत्यंत दुर्मिळ असा हा जीव आहे. हा प्राणी माणसांच्या फारशा नजरेत आला नसला तरी त्याचं



सौंदर्य डोळ्यात भरणारं असतं. जेलीफिशप्रमाणे हा प्राणीही फार सुंदर आहे. असं असलं तरी याची गणना विषारी प्राण्यांमध्ये केली जाते. हा प्राणी चावला तर त्याच्या विषामुळे माणसाला त्रास होतो. हा जलचर आपल्या कल्ल्यांच्या मदतीने समुद्राच्या पृष्ठभागावर थोड्या उंचीवर उडू शकतो. या प्राण्याचा आकार फारच छोटा आहे. त्यातच याच्या निळ्याशार रंगामुळे तो पटकन दृष्टीस पडत नाही. या प्राण्याच्या शरीरावर चंदेरी रेषा असतात. या रेषाही समुद्राच्या पाण्याच्या रंगाशी मिळत्याजुळत्या असल्याने त्याच्या अस्तित्वाचा थांग लागत नाही. म्हणूनच शत्रूंपासून याचा अगदी सहज बचाव होतो. निळ्या सागरी ड्रॅगनचा आकार ४० मिलीमीटरपर्यंत वाढू शकतो. या प्राण्याचा आकार फारच वेगळा असल्याने सुरूवातीला आपला गोंधळ उडतो. पण ही कोणतीही वनस्पती नसून सजीव प्राणी असल्याचं आपल्या लक्षात येतं. हातांच्या तळव्यांवर ठेवल्यावर हा फारच छोटा दिसतो. हा सजीव नुकताच आढळल्याने त्यावर अजून संशोधन होईल. त्यानंतरच या प्राण्याचे रंगढंग आपल्या लक्षात येऊ शकतील.

## क्षेत्र हेल्थ मॅनेजमेंटचं

**कोण होणार?**



आरोग्य क्षेत्रात करीअर करण्यासाठी फक्त डॉक्टर हा एकमेव पर्याय नाही. हे क्षेत्र खूप मोठं आहे. इथे तुम्ही विविध प्रकारे काम करू शकता. व्यवस्थापन क्षेत्रात रस असेल तर हॉस्पिटल मॅनेजमेंट म्हणजे रुग्णालय व्यवस्थापनाकडे तुम्ही वळू शकता. हेल्थकेअर क्षेत्राची वाढ वेगाने होते आहे. त्यातच परदेशी कंपन्यांनीही या क्षेत्रात मोठी गुंतवणूक केल्याने रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होत आहेत. म्हणूनच तुम्ही हॉस्पिटल मॅनेजमेंटचा अभ्यासक्रम पूर्ण करून पुढे जाऊ शकता.

हॉस्पिटल मॅनेजमेंटमध्ये डिप्लोमापासून पोस्ट ग्रॅज्युएशनपर्यंतचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. काही कॉलेजेसमध्ये या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी प्रवेश परीक्षेचं आयोजन केलं जातं. हॉस्पिटल मॅनेजमेंटसंबंधीच्या या अभ्यासक्रमांमध्ये कायदा, फायनान्स, ह्युमन रिसॉर्स, ऑपरेशन्स मॅनेजमेंट, वैद्यकीय तसंच कायदाविषयक प्रश्न असे विषय शिकवले जातात. यामुळे संपूर्ण व्यवस्थापनाचं ज्ञान तुम्हाला मिळतं.

हे अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर हॉस्पिटल बिझनेस मॅनेजर, फूड अँड बिव्हरेज मॅनेजर, गेस्ट रिलेशन मॅनेजर, हॉस्पिटल ॲडमिनिस्ट्रेटर, फ्लोअर मॅनेजर, सेंटर मॅनेजर, पेशंट रिलेशन एक्सिक्युटिव्ह, फ्रंट ऑफिस ॲडमिनिस्ट्रेटर, ऑपरेशन एक्सिक्युटिव्ह म्हणून तुम्ही काम करू शकता. विविध शिक्षण संस्था आणि कॉलेजेसमध्ये हे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

**दोस्त हे मस्त**

### व्हिक्टोरिया क्राउन्ड पिजन



पक्षी मुळातच सुंदर असतात. त्यांची रंगीबेरंगी पिसं खूप आकर्षक वाटतात. वेगवेगळ्या आकाराच्या, प्रकारच्या या पिसांमुळे पक्षी स्टायलिश दिसतात. काही पक्ष्यांना केसही असतात. या केसांचीही विशिष्ट रचना असते. त्यामुळे पक्ष्यांनी हेअरस्टाईल केल्यासारखंच वाटतं. असाच एक पक्षी म्हणजे व्हिक्टोरिया क्राउन्ड पिजन. हे पक्षी म्हणजे कबुतरांची सर्वात मोठी प्रजाती आहे. ते मादी टर्कीच्या आकाराचे असतात. त्यांचे केस तुऱ्यासारखे वाटतात. जांभळट रंगाच्या या तुऱ्यांमुळे डोक्यावर मुकुट घातल्यासारखं वाटत असल्याने त्यांना व्हिक्टोरिया क्राउन्ड पिजन हे नाव पडलं.

**खादाडी**

### यम्मी वॉटरमिलन स्मूदी



छोट्यांनो, कलिंगडं भरपूर प्रमाणात मिळतात. गारेगार कलिंगड खायला खूप छान वाटतं. या कलिंगडाची तुम्ही मस्त स्मूदी करू शकता. त्यासाठी तीन कप कलिंगडाच्या फोडी घ्या. बिया काढून टाका. अर्धा कप व्हॅनिला आईस्क्रीम, पुदीन्याची पानं हे साहित्य घ्या. मिक्सरच्या भांड्यात कलिंगडाचे तुकडे आणि व्हॅनिला आईस्क्रीम घाला. नीट फिरवून घ्या. हे मिश्रण ग्लासमध्ये ओता. पुदीन्याच्या पानांनी सजावट करा. गारेगार प्या. संध्याकाळी किंवा रात्री ही स्मूदी बनवून पिता येईल.

**धमाल**

### मित्रमैत्रिणींसोबत घालवा वेळ

मुलांनो, सुट्टीमध्ये तुम्हाला दररोज काहीतरी वेगळं करायचं असतं. मित्रमैत्रिणींसोबत वेळ घालवायचा असतो. मग एखाद्या रविवारी तुम्ही मित्रमैत्रिणींना घरी बोलवू शकता. घरीच टीव्हीवर एखादा चित्रपट बघू शकता.





थिएटरमध्ये जाऊनही चित्रपट बघण्याचा प्लॅन करता येईल. अशाप्रकारे प्रत्येक मित्रमैत्रिणीच्या घरी वेगळा कार्यक्रम ठरवा. काहीतरी क्रिएटिव्ह करा. तुमची सुट्टी मस्त आनंदात जाईल. लांब राहणाऱ्या मित्र किंवा मैत्रिणीला यावेळी पत्र लिहा. व्हॉट्स ॲप, फोनवर तुम्ही रोज भेटत असलात तरी पत्र लिहिण्याची गंमत वेगळीच असते. ती मजा अनुभवा.

**योगा टाईम**

### पाठीसाठी शिशुआसन

मुलांनो, शाळेत जाताना तुम्ही पाठीवर दप्तर घेता. दप्तराच्या वजनामुळे पाठीच्या कण्याला त्रास होतो. पाठीला आराम मिळावा यासाठी तुम्ही शिशुआसन करा. शिशुआसन म्हणजे लहान बाळ रांगताना ज्या स्थितीत असतं तशी शारीरिक स्थिती. यामुळे मज्जासंस्थेचं कार्यही सुधारतं. हे आसन अगदी सोपं आहे.






## आग विझवणारा 'फायर वास'

**व्हॉट्स न्यू?**



आग लागल्यावर सगळ्यांची धावपळ होते. घरात लागलेली छोटीशी आगही मोठं नुकसान करू शकते. आग लागल्यावर आपण अग्निशमन दलाला फोन करतो. पण ते येईपर्यंत बराच वेळ जातो. पाण्याने आग विझवण्याचा प्रयत्न होतो. पण यात इजा होण्याची शक्यता असते. म्हणूनच सॅमसंगने अनोखा फ्लॉवरपॉट तयार केला. हा फ्लॉवरपॉट फेकल्यावर आग पटकन विझते. मित्रांनो, हा जादूचा फ्लॉवरपॉट नाही. यात आग विझवण्यासाठी वापरलं जाणारं पोटॅशियम कार्बोनेटचं मिश्रण भरण्यात आलं आहे. आग लागलेल्या ठिकाणी हा फ्लॉवरपॉट फेकल्यानंतर तो तुटतो आणि त्यातून पोटॅशियम कार्बोनेटचं मिश्रण बाहेर पडल्याने आग विझते.

'फायर वास' असं नाव या फ्लॉवरपॉटला देण्यात आलं आहे. नेहमीच्या फ्लॉवरपॉटप्रमाणेच तो घरात ठेवायचा. शोभेची वस्तू म्हणूनही तो वापरला जातो. मुख्य म्हणजे वेळेला पटकन मिळतो. या फ्लॉवरपॉटमधलं पोटॅशियम कार्बोनेट आग विझवतं. शिवाय आगीशी ऑक्सिजनचा संपर्क होऊ देत नाही. यामुळे आग पसरत नाही. अनेक ठिकाणी अग्निशमन यंत्र लावलेली असतात. पण त्यांच्या तुलनेत हा फ्लॉवरपॉट वापरायला अगदी सोपा आहे. त्यामुळे आपण अगदी बिनधास्त आग विझवू शकतो.

## का हसायचं?

**हेल्थ वेल्थ**

छोट्यांनो, तुम्ही सकाळी सकाळी जवळच्या बागेतून जोरजोरात हसण्याचे आवाज ऐकले असतील. कोण बरं हसत असावं, असा प्रश्नही तुम्हाला पडत असेल. मित्रमैत्रिणींनो, अनेक ठिकाणी लाफ्टर क्लब्ज असतात. इथे फक्त हसायचं असतं. वेगवेगळ्या लयीत हसायला शिकवलं जातं. हसणं आपल्या आरोग्यासाठी चांगलं असतं. हसल्यामुळे आयुष्य वाढतं असं म्हणतात. हसण्याचे फायदे जाणून घेऊ या.

✻ हसणं म्हणजे एकप्रकारचा व्यायाम. जोरात हसताना आपल्या हृदयाची गती वाढते. रक्तदाबही वाढतो. धावल्यामुळे किंवा कोणताही व्यायाम केल्यामुळे शरीराला होणारे फायदे फक्त हसल्यामुळे मिळू शकतात.

✻ हसणारे लोक आजारी पडत नाहीत. हसताना आपल्या शरीरात एचजीएच नावाचा हार्मोन तयार होतो. यामुळे रोगप्रतिकारक क्षमता वाढते आणि शरीर जंतूंशी लढायला सज्ज होतं.

✻ हसण्याचं शास्त्र आणि त्याच्या आपल्या शरीरावर होणाऱ्या परिणामांच्या अभ्यासाला 'जेलोटोलॉजी' असं म्हणतात.



✻ समोरची व्यक्ती हसत असेल तर आपल्यालाही हसू येतं.

✻ हसल्यामुळे स्मरणशक्ती सुधारते. एकाग्रता वाढते. त्यामुळे तुम्हा मुलांनी भरपूर हसायला हवं.

✻ स्वतःला गुदगुल्या केल्यावर हसायला येत नाही. दुसऱ्याने अचानक गुदगुल्या केल्यावर मेंदूला धक्का बसतो. पण आपणच गुदगुल्या करणार असू तर याची मेंदूला कल्पना असते. गुदगुल्या करण्याआधीच त्याला आपल्या बोटांच्या स्पर्शाची जाणीव झालेली असते. त्यामुळे स्वतःच स्वतःला गुदगुल्या करणं मेंदूसाठी धक्का ठरत नाही आणि आपल्याला हसू येत नाही.

## ओळखा पाहू

**जिज्ञासा**

१) एंटॉमॉलॉजीमध्ये कशाचा अभ्यास केला जातो?
२) फिल्म अँड टिव्ही इन्स्टिटयूट ऑफ इंडिया कुठे आहे?
३) गोवा शिपयार्ड लिमिटेडची स्थापना कधी झाली?
४) संयुक्त राष्ट्रांचं मुख्यालय कुठे आहे?
५) फॅथॉमीटरनी काय मोजतात?
६) महाराष्ट्रात लोकसभेच्या किती जागा आहेत?
७) कोणत्या ऋतूत शरीराला जास्त फॅट्सची गरज असते?
८) इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ पेट्रोलियम कुठे आहे?
९) ट्रान्स सायबेरियन रेल्वे लाईन कुठे आहे?
१०)भारताच्या अंतराळ कार्यक्रमाला कोणत्या वर्षी सुरूवात झाली?

उत्तरं : १) किटक २) पुणे ३) १९५७ ४) न्यूयॉर्क ५) समुद्राची खोली ६)४८ ७) हिवाळा ८) देहरादून ९) रशिया १०) १९६२



## कलासक्त



# संगीत शिरोमणी कुंदनलाल सहगल

एक असा भारतीय गायक ज्याने भारतीय चित्रपट संगीत क्षेत्रात इतिहास घडविला. ज्याच्या गायकीचे पंडीत भिमसेन जोशी, लता मंगेशकर यांच्यासारखे दिग्गज दिवाने होते. एका नृत्य आणि गायन करणाऱ्या वेश्या स्त्रीला त्यांनी आपली गुरूमाता मानली. तिच्याकडून ठूमरी हा गायनाचाही प्रकार आत्मसात केला. गायनासाठी घरचे सर्व वैभव सोडून घराचा त्याग केला. गाणी गात गात दारोदारी साड्या विकल्या.

मुकपटांच्या जमात्यातून चित्रपट सृष्टी बोलपटांच्या दिशेने वाटचाल करीत होती. अशा सुरवातीच्या काळात गायक आणि नट असलेल्या कुंदनलाल सहगल यांची वाटचाल सुरू झाली. हिंदी चित्रपट सृष्टीचे पहिले सुपरस्टार आणि पहिले गायक नट कुंदनलाल सहगलच होते. लता मंगेशकर, मुकेश, महमद रफी, किशोर कुमार ज्यांच्याकडून प्रेरणा घेऊनच हे सगळे गायनक्षेत्रात आले. त्या सगळ्यांनाच गुरूस्थानी असणारे सर्वश्रेष्ठ गायक म्हणजेच कुंदनलाल सहगल. गायनाच्या अनेक पिढ्या येतील परंतु कुंदनलाल सहगल यांचे स्थान ध्रुवपदासारखे अजिंक्य राहिल. कुंदनलाल सहगल हे गायनक्षेतातील भीष्म पितामह आहेत.

पंजाब प्रांतातील जालंदरमधून जम्मूमध्ये येऊन वसलेल्या सहगल परिवारात ११ एप्रिल १९०४ साली कुंदनलाल यांचा जन्म झाला. कुंदनलाल यांचे वडील तहसिलदार होते. त्या काळात तहसिलदाराच्या घरात जन्म घेणे म्हणजे एखाद्या राज्याच्या घरात जन्म घेण्यासारखेच होते. जम्मूमधील सुप्रसिद्ध सुफी इमामाने भविष्यवाणी केली होती हा मुलगा एक दिवस आपल नाव मोठे करेल.

पाच वर्षाचा कुंदन गाढ झोपेत असतानाच त्याच्या कानावर लोकसंगीताची धून येत असे. झुंझूमुंजू झालं की काश्मीरच्या निसर्गसंपन्न डोंगरावरील धुके थोडे कमी झालेले असायचे. हळूवार पहाटे पहाटे बासरीचे मोहित करणारे मधूर स्वर आणि डोंगरी गीतांचे ध्वनी कानांत गुंजत असतानाच कुंदन झोपेतून हळूहळू जागा व्हायचा. कुंदनची आई खुप सुंदर गात असे.

कुंदन शाळेत जाऊ लागला पण त्याचे लक्ष अभ्यासाकडे नसायचे. शिक्षक गणित शिकवायचे पण कुंदनचे लक्ष मात्र डेरेदार वृक्षांनी बहरलेल्या काश्मीरच्या सुंदर वनातून गाणाऱ्या गुराख्यांच्या गायनाकडे असायचे. कुंदन शाळेतून मध्येच उठून गुराख्यांची गाणी ऐकण्यासाठी पळून जात असे म्हणून त्याच्यावर नजर ठेवण्यासाठी वडिलांनी एक नोकर नेमला होता. कुंदन त्याच्या हातावर तुरी देऊन पळून जात असे व शाळा सुटण्याच्या वेळेस परत येत असे. कुंदन फक्त बारा वर्षाचा होता पण त्याच्या गायकीची चर्चा जम्मू मध्ये पसरली होती. एकदा कुंदन कश्मीरचे महाराज प्रताप सिंह यांच्या दरबारात आपल्या वडीलांसोबत गेला होता. तेथे त्याने संत मीराबाई यांचे भजन गायले. सर्व दरबार टाळ्यांच्या कडकडाटांने दणाणून गेला. महाराजांनी कुंदनची पाठ थोपटली. महाराज म्हणाले भविष्यात हा मुलगा मोठा गायक होईल. या मुलाच्या जिभेवर सरस्वती बसली आहे.

एक दिवस सुप्रसिद्ध रामलीला कलाकार परशुराम नगर घरी आले. त्यांनी कुंदनच्या वडीलांना समजाऊन रामलीला मध्ये कुंदनला सीतेच्या भुमिकेसाठी तयार केले.

स्वत: परशुराम नगर रामाची भुमिका करीत असत. त्यांनी कुंदनला गायन आणि अभिनयाचे विविध पैलू शिकविले. सीता बनलेला कुंदन आपल्या भुमिकेतील गायन आणि अभिनयाने प्रेक्षकांच्या डोळ्यात अक्षरक्षः पाणी आणत असे.

शो संपल्यावर महिला सीता बनलेल्या कुंदनच्या पायाला स्पर्श करून नमस्कार करीत असत.

एक दिवस कुणाची नजर लागली कुणास ठाऊक? लहानग्या कुंदनचा आवाज अचानक बंद झाला.

''आई मी आता कधीच गाऊ शकणार नाही.''असे म्हणत कुंदन रात्रभर रडत राहिला.

आई खुप घाबरली पीर बाबा सलमान युसुफच्या दरबारात घेऊन गेली. बाबा म्हणाले, ''घाबरू नका उद्या पासून माझ्याकडे पाठवून द्या मी स्वत: त्याला संगीत शिकवणार.'' दोन वर्षानंतर सलमान बाबाचे अंगण कुंदन च्या मधुर सरांनी गुंजू लागले होते. काही काळाने कुंदनचे वडील सेवानिवृत्त झाले. जालंधरला गावी आले. कुंदन पुढील शिक्षणासाठी आपल्या काकांच्या बरोबर जम्मूमध्येच राहिला. 'प्रिन्स ऑफ वेल्स' कॉलेजात ॲडमिशन घेतले. परंतू कुंदन शिक्षण पूर्ण करू शकला नाही. एक दिवस कॉलेज आणि जम्मू दोन्ही सोडून कुंदन जालंधरला आपल्या घरी परतला. साल १९२६ जालंधरमध्ये कुंदनच्या वडीलांनी रिटायर्ड झाल्यावर ठेकेदारी सुरू केली होती. कुंदनने त्यांच्या धंद्यात यावे अशी वडीलांची इच्छा होती.

पण कुंदनला गायन क्षेत्रात जायचे होते. एक दिवस वडीलांनी घर डोक्यावर घेतले. त्यांनी कुंदनला इशारा दिला. घरात रहायचे असेल तर संगीताचा नाद सोड. घर किंवा संगीत यापैकी एक निवड. आयुष्यभर तुझा बोझ उचलायचा मी ठेका घेतलेला नाही.

कुंदनने घर सोडण्याचा निर्णय घेतला आणि दिल्लीची ट्रेन पडली. दिल्लीत मित्रांच्या मदतीने विद्युत विभागात नोकरी मिळाली. नंतर मिलिटरी इंजिनियर सर्विस मध्ये शिफ्ट अटेंडटची नोकरी केली. पण या नोकरीत मन रमत नव्हते.

भाऊ रामलाल सहगल दिल्ली येथे रेल्वेमध्ये नोकरी करीत होते. त्यांनी कुंदनला टाईम कीपर म्हणून रेल्वेत कामाला लावले. काही काळ दिल्लीत काम केल्यानंतर भावाची बदली मुरादाबादला झाली. कुंदंनही मुरादाबादला गेला. पण त्याच्या संगीत कलेला मुरादाबादमध्ये चालना मिळत नव्हती. म्हणून परत दिल्ली रेल्वेयार्डात कुंदन नोकरी करू लागला. दरम्यान दिल्ली रेल्वे यार्डमध्ये मोठ्या पदावर काम करणाऱ्या रायसाहेब राघवानंद गौतम यांच्याशी कुंदनची ओळख झाली. कुंदनची गायकी बघून प्रभावित झाले. रायसाहेब शिमला येथे रहाणारे होते. ते एक ड्रामा क्लब चालवायचे. त्यांनी कुंदनला रेल्वेची नोकरी सोडायला लावली. त्याला क्लबच्या नाटकात काम दिले.

**श्रीराम शेटये**

कुंदन रात्री नाटकात काम करायचा. पण दिवसभर बसून राहण्यापेक्षा दिवसा एका कंपनीत टाईपरायटर विकायचे काम कुंदन करू लागला. गाणी गात गात टाईपरायटर विकत असल्यामुळे त्याची विक्री इतर सेल्समन पेक्षा जास्त व्हायची. म्हणून इतर सेल्समनी षडयंत्र करून कुंदन विक्री केलेली रक्कम कंपनीत जमा करीत नाही असा आळ कुंदनवर आणला. चौकशीत कुंदन निर्दोष सुटला. पण नोकरीवरून मन उडाले त्याने ती नोकरी सोडून दिली.

परत एकदा नव्या नोकरीच्या शोधात निघालेला कुंदन कानपूरला गाडीतून उतरला. खुप प्रयत्न करूनही नोकरी मिळेना. खिशातले पैसे संपले होते. राहण्याचा ठिकाणा नव्हता. पोटात अन्नाचा कणही नव्हता. अशा अवस्थेत कुंदन रस्त्यावर बेशुद्ध होऊन पडला. तेथील चामडा फॅक्टरी मधील कामगारांनी कुंदनला आपल्या वस्तीत नेले. थोडा सावरल्यावर त्यावर दोन चार दिवस ठेऊन मग पाठवून दिले.

एक दिवस गंगेच्या किनाऱ्यावर सराय्या घाटावरील मंदिरासमोर कुंदन दु:ख वेगाने तल्लीन होऊन एकटाच भजन गाण्यात इतका तल्लीन झाला की देहभानच विसरला होता. शुद्धीवर आला तेव्हा बाजूला पैशाचा वर्षाव झाला होता. कुंदनला लाज वाटली. लोक आपल्याला भिकारी समजले होते. एक गृहस्थ मात्र तो शुद्धीवर येण्याची वाट पाहत होते. त्यांनी त्याला गाणी गात गात साड्या विकण्याची नोकरी ऑफर केली. कुंदन गाणी गात गात साडी विकत होता. पण संगीत क्षेत्रात जायचे स्वप्न अधुरेच होते.

त्याच दरम्यान जालंधर येथील कुंदनचे शेजारी संगीत निर्देशक हरिश्चंद्र बाली यांची कानपूरमध्ये अचानक कुंदनबरोबर भेट झाली. त्यांनी कुंदनला कलकत्ता येथे येऊन भेटायचा सल्ला दिला. साडीवाल्या शेटजींची कलकत्ता येथे एक शाखा होती. त्यांनीच राहण्याची व जेवणाची सोय केली. जोपर्यंत संगीत क्षेत्रात नोकरी मिळत नाही तोपर्यंत साड्या विकत रहायची सवलत दिली. कलकत्ता येथे गेल्यावर हरिश्चंद्र बाली कुंदनला आर.सी. बोराल यांच्याकडे घेऊन गेले. बोराल यांनी न्यु थिएटरचे मालक बी. एन. सरकार यांना विनंती करून कुंदनची शिफारस केली. दोनशे रुपये पगार आणि पाच रुपये प्रतिदिन भत्ता अशी नोकरी ठरली. अट होती कुंदनने बांगला भाषा आणि शास्त्रीय संगीत शिकावे लागेल. एग्रीमेंट बनवली गेली.

'न्यु थिएटर' ने सहगल यांना घेऊन सन १९३२ मध्ये 'मोहब्बत के आसु हा पहिला चित्रपट काढला. चित्रपट आपटला नंतर आलेले आणखीन दोन चित्रपट आपटले. पण प्रचंड आत्मविश्वास असलेल्या बी. एन. सरकार यांनी सहगल यांना घेऊन 'पुरण भगत' हा चित्रपट काढला. त्या चित्रपटाची गाणि लोकप्रिय झाली. 'चंडीदास' सन १९३४ मध्ये हा चित्रपट प्रचंड चालला सहगल यशाच्या शिखरावर पोहचले. यानंतर आलेल्या 'देवदास' या चित्रपटांने सहगल यांची कारकिर्द झळाळून गेली.

सन १९३८ मध्ये आलेल्या 'स्ट्रीट सिंगर' चित्रपटातील 'बाबुल मोरा नैहर छूटो ही जाए' ही ठूमरी एवढी लोकप्रिय झाली की आजही ती गायली जाते.

एकापेक्षा एक चित्रपट 'न्यु थिएटर' काढत असतानाच सन १९४० मध्ये थिएटरला आग लागली या आगीत भस्मसात झाले. नंतर दुसरे महायुद्ध सुरू झाले. कलकत्याच्या आकाशात लडाखु विमान घिरट्या घालू लागली. सिनेमागृह युद्धाच्या भितीमुळे बंद पडू लागला. मुंबईतील फिल्म इंडस्ट्री त्या मानाने चांगली चालली होती. पृथ्वीराज कपूर, केदार शर्मी, के. एन. सिंह हे 'न्यु थिएटर' सोडून मुंबईत गेले होते. अशा वेळेस 'न्यु थिएटर' चे मालक बी. एन. सरकार यांनी सहगल यांना मुंबईत जायची परवानगी दिली. 'न्यु थिएटर' चे संगीतकार खेमचंद प्रकाश यांनी मुंबईत 'रणजीत मूवीटोन' बरोबर काम सुरू केले होते. त्यांना सहगल सारखा दुसरा आवाज सापडत नव्हता. त्यांनी मुव्हीटोन चे मालक चंदुलाल शहा यांना सहगल यांना बोलवण्याची विनंती केली. सहगल मुंबईत आल्यावर रणजीत मूवीटोन ने 'सुरदास' नावाचा चित्रपट काढला. मुंबईत देखील सहगल यशाच्या शिखरावर पोहचले. सन १९४४ मध्ये आलेल्या 'तानसेन' चित्रपटतील गाणी अजरामर झाली. कुंदन आपल्या बंगाली गाण्यांनी बंगालमध्येही लोकप्रिय झाला. एग्रीमेंट नुसार सहगल कलकत्त्याला न्यू थिएटर कंपनीत परतले. पण कंपनी ने बनविलेला 'माय सिस्टर' ( १९४५) चित्रपट चालला नाही. सहगल मुंबईत परतले पण सुपरस्टार झालेल्या सहगल यांची बिदागी देणे कंपन्यांना परवडत नव्हते. त्यातच 'कुरूक्षेत्र' 'तदबीर' आणि १९४६ मध्ये आलेला 'उमर खय्याम' तीन्ही चित्रपट आपटले. फिल्म इंडस्ट्रीमध्ये सहगल चे चित्रपट पडत आहेत असा संदेश गेला.

हताश झालेले सहगल दारूच्या नशेच्या आहारी गेलेले होतेच त्यातच आजारपणाने डोके वर काढले.

सहगल यांनी आपल्या गावी परतण्याचा निर्णय घेतला. तिकिट काढले पण तेवढ्यात 'शाहजहान' चित्रपटाची ऑफर आली. शाहजहानची गाणी सुपरहीट झाली. परत एकदा सहगल शिखरावर पोहचले. परंतू आजारपणा वाढत गेला. 'परवाना' हा शेवटचा चित्रपट केल्यावर सहगलनी बिस्तर पकडला. औषधाला शरीर साथ देईना. अखेरीस १८ जानेवारी १९४७ रोजी सहगल यांनी वयाच्या अवघ्या त्रेचाळीसाव्या वर्षी इहलोकाचा निरोप घेतला. भारतीय चित्रपट सृष्टी एका महान कलाकाराला अवेळी मुकली. ✻✻

पंजाब प्रांतातील जालंदरमधून जम्मूमध्ये येऊन वसलेल्या सहगल परिवारात ११ एप्रिल १९०४ साली कुंदनलाल यांचा जन्म झाला. कुंदनलाल यांचे वडील तहसिलदार होते. त्या काळात तहसिलदाराच्या घरात जन्म घेणे म्हणजे एखाद्या राज्याच्या घरात जन्म घेण्यासारखेच होते. जम्मूमधील सुप्रसिद्ध सुफी इमामाने भविष्यवाणी केली होती हा मुलगा एक दिवस आपल नाव मोठे करेल. पाच वर्षाचा कुंदन गाढ झोपेत असतानाच त्याच्या कानावर लोकसंगीताची धून येत असे. झुंझूमुंजू झालं की काश्मीरच्या निसर्गसंपन्न डोंगरावरील धुके थोडे कमी झालेले असायचे.



**विंधन विहिरीत मुले अडकून झालेल्या दुर्घटना काळजाचा ठोका चुकवून जातात. अलिकडेच अशा दोन दुर्दैवी घटनांनी समाजमन हेलावले. १८ वर्षीय मुलगी अडकल्याची घटनाही या प्रश्नाचे गांभीर्य दाखवून गेली. मात्र तरीदेखील या प्रश्नी कठोर पावले उचलण्यात आपण कमी पडत आहोत. अशा घटनांमध्ये बचावकार्य वेळखाऊ आणि आव्हानात्मक असू शकते हे मान्य केले तरी लवकरात लवकर मार्ग काढणे गरजेचे आहे.**

# जीवघेण्या अंधारवाटा

राजस्थानमध्ये बोअरवेलमध्ये पडून जीव गमावलेल्या चेतनाचे प्रकरण ताजे असतानाच गुजरातमध्येही अशीच एक घटना समोर आली आणि जीव कळवळला. अलिकडेच कोटपुतली-बेहरोर जिल्ह्यात तीन वर्षांची चेतना शेतात बांधलेल्या १५० फूट खोल बोअरवेलमध्ये पडली. दहा दिवस चाललेल्या बचाव मोहिमेनंतर १ जानेवारीला तिची सुटका करण्यात आली खरी, मात्र डॉक्टरांच्या पथकाने तिला मृत घोषित केले. त्यानंतर गुजरातमधील कच्छ जिल्ह्यातील गावात एक मुलगी ५४० फूट खोल बोअरवेलमध्ये पडली आणि ४९० फूट खोलवर अडकली. लगोलग बचावकार्य सुरू झाले. १८ वर्षे वयाच्या मुलीला वाचवण्यासाठी ऑक्सिजनचा पुरवठा, खाण्याचे जिन्नस पुरवण्यात आले. मुलगी बेशुद्ध अवस्थेत असल्यामुळे तातडीने सुटका करणे गरजेचे होते. अर्थात ही काही एकमेव घटना नाही. आत्तापर्यंत देशामध्ये अशा बऱ्याच घटना घडल्या आहेत. अशा अपघातांनंतर राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, सीमा सुरक्षा दल वा यासारख्या अन्य दलांची मदत घेतली जाते. पथकांनाही पाचारण करण्यात येते. मात्र त्यांना यश येतेच असे नाही. वरील दोन्ही उदाहरणे पुरेशी बोलकी आहेत. राजस्थानच्या दौसा जिल्ह्यात आणि मध्य प्रदेशमधील गुना येथे घडलेल्या घटनेनंतर झालेला आक्रोश देशातील अनेक भागांनी ऐकला आहे.

अलिकडे पाण्यासाठी जमिनीची चाळण करणाऱ्या हव्यासातून विंधन विहिरी आणि कूपनलिका खोदण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यासाठी खोदण्यात येणारे खड्डे एक तर बुजवले जात नाहीत किंवा त्यांच्याभोवती सुरक्षेचे कवच केले जात नाही. मग खेळता खेळता गेलेली मुले त्यात अडकतात आणि कोमलण्याआधीच त्यांचे जीवन कुस्करले जाते. अपुरा प्राणवायू, भूक आणि तहानेने व्याकूळ झालेले मूल आंधळ्या बोगद्यात मृत्यूची वाट कशी पाहत असेल, याचा विचार करूनही मन हेलावून जाते. भीती आणि अंधारात लहान मुलाला कोणत्या मानसिक आणि शारीरिक छळांचा सामना करावा लागतो, याचा विचारच करवत नाही. मात्र आपला असंवेदनशील समाज आणि बेफिकीर यंत्रणा या शोकांतिका गांभीर्याने घेत नाही. लाखो रुपये खर्च करणाऱ्या विंधन विहिरीच्या खड्ड्याचे तोंड बंद करण्यासाठी काही रुपये खर्च न करण्याचा निष्काळजीपणा संबंधित दाखवतात. राजस्थानमधील कोटपुतली येथे विंधन विहिरीत पडलेल्या तीन वर्षांच्या मुलीला आठवडा उलटूनही बाहेर काढण्यात आले नव्हते, ही बाब यंत्रणेचे अपयश दर्शवते. ही कार्यवाही गुंतागुंतीची असून मदतकार्यात अडथळे येत असल्याचे सांगण्यात आले असले, तरी सुरुवातीला प्रशासनाच्या हलगर्जीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. अशा कारवायांमध्ये राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) आणि स्थानिक सुरक्षा दलांचे अपयश वारंवार समोर येत असते. नि:संशयपणे अशा संकटात, तात्काळ पावले उचलण्याची आणि आधुनिक तंत्रज्ञानाने मदतकार्य सुरू करण्याची गरज भासू लागली आहे.





वारंवार होत असलेले कूपनलिका आणि विंधन विहिरींचे अपघात पाहता सर्वोच्च न्यायालयाने २०१० मध्ये मार्गदर्शक तत्त्वे जारी केली होती. त्यात असे अपघात टाळण्याच्या सूचना होत्या. विंधन विहिरी आणि कूपनलिकांभोवती कुंपण उभारून मजबूत बोल्टसह स्टीलचे कव्हर लावण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. असे असतानाही विंधन विहिरी आणि कूपनलिकांमध्ये मुले पडल्याच्या घटना रोज घडत आहेत. शेतकरी आणि स्थानिक प्रशासन सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाकडे दुर्लक्ष करत असल्याचे उघड आहे. अन्यथा, अशा अपघातांची पुनरावृत्ती झाली नसती. देशाच्या विविध भागांमध्ये विंधन विहिरी आणि कूपनलिका अपघातांच्या घटना केवळ देखरेख विभागांचा निष्काळजीपणाच प्रतिबिंबित करत नाही, तर कूपनलिका आणि विंधन विहिरी उघडे ठेवतात. त्यांच्या गुन्हेगारी वृत्तीचेही दर्शन त्यातून घडते.

**प्रा. अशोक ढगे**

त्याच वेळी, उघड्या कूपनलिका आणि विंधन विहिरींच्या विरोधात सर्वसामान्यांच्या पातळीवर आवाज उठवावा, प्रशासनाला तसे कळवावे ही जाणीव आपल्या समाजात नसल्याचेही या अपघातांवरून दिसून येते. उगाच कशाला विरोधात जायचे, असा दृष्टिकोन त्यामागे असला तरी त्यातून लहानग्यांचा जीव जातो, हे कुणाच्या लक्षात येत नाही. राजस्थानमधील मुलीच्या आईने आपल्या भावना व्यक्त करताना विचारलेला जिल्हाधिकाऱ्यांची मुलगी कूपनलिकेत पडली असती तर प्रशासनाने इतका काळकाढूपणा केला असता का, हा प्रश्न प्रशासनाचे डोळे उघडणारा ठरु शकतो. पाटबंधारे खाते हा राज्याचा विषय असल्याने केंद्र सरकार त्यात हस्तक्षेप करू शकत नाही, हेही विशेष.

एका अंदाजानुसार, देशात सुमारे सव्वा तीन कोटी विंधनविहिरी आणि कूपनलिका आहेत. त्यापैकी बहुतांश कोरड्या पडल्या आहेत. बेजबाबदार लोक त्या उघड्या ठेवतात आणि अपघाताचे कारण बनतात. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या दोन तृतीयांश मदत आणि बचाव मोहिमा अयशस्वी ठरतात. सर्व राज्यांमध्ये अशा प्रकरणांमध्ये मुलांचे प्राण वाचवण्यासंबंधीच्या सुरक्षेच्या उपाययोजना प्रत्येक जिल्ह्याच्या अधिकाऱ्यांना मॅन्युअलच्या स्वरूपात दिल्या पाहिजेत. त्यामुळे कोणतीही दुर्घटना घडल्यानंतर तातडीने मदतकार्य सुरू करून मुलांना वाचवता येईल. आपली मदत आणि बचाव यंत्रणा किती कमकुवत आणि कुचकामी आहे, हे ही अशा संकटातून दिसते. अनेकदा परिस्थिती गुंतागुंतीची झाल्यावर लष्कराच्या तज्ज्ञांचीही मदत घेतली जाते. मात्र बऱ्याच वेळा लष्कराच्या तज्ज्ञांना इतक्या उशिरा बोलावले जाते की मुलांच्या जगण्याची फारशी आशाच नसते. कूपनलिका आणि विंधन विहिरींची देखभाल करणाऱ्या संस्थांच्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्याची वेळ आली आहे. अशा प्रकरणांमध्ये निष्काळजीपणा दाखवणाऱ्या अधिकाऱ्यांना शिक्षा होणे गरजेचे आहे. उघड्या विंधन विहिरी आणि कूपनलिकांच्या मालकांवर कडक कारवाई करणे, ही त्यांची जबाबदारी आहे. या संदर्भात समाजातील लोकांनाही सतर्क करण्याची गरज आहे, जेणेकरून ते उघड्या कूपनलिका आणि विंधन विहिरींबाबत प्रशासनाला माहिती देऊ शकतील. त्यांचे नाव गोपनीय राखण्याची हमी प्रशासनाने घेतली पाहिजे. अन्यथा, त्यातून खून पडायचे. समाजाने सजग आणि संवेदनशील राहिल्यास प्रशासनावरही दबाव येईल. या सजगतेने आणि दक्षतेने अनेक मुलांचे अनमोल जीव वाचतील.

विंधन विहिरी आणि कूपनलिकांच्या दुर्घटनेला जिल्हाधिकारी जबाबदार असतील, असे मार्गदर्शक तत्त्वात स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते. मात्र असे शेकडो अपघात होऊन एकाही जिल्हाधिकाऱ्यावर राज्यांनी कारवाई केल्याचे ऐकिवात नाही. जिल्हाधिकाऱ्यांवर कारवाई झाली तर गाव पातळीपासून जिल्हास्तरापर्यंतचे प्रशासन हलेल. प्रशासन अपघाताच्या वेळीच कृतीत उतरते आणि नंतर पुढील अपघात होईपर्यंत मांजरीसारखे डोळे मिटून झोपते. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, कूपनलिका आणि विंधन विहीर खोदण्यापूर्वी जिल्हाधिकारी/ग्रामपंचायत यांना लेखी माहिती देणे आवश्यक आहे. खोदकाम करणाऱ्या शासकीय, निमशासकीय संस्था किंवा कंत्राटदाराची नोंदणी करणे अपेक्षित आहे. या नियमांकडे सातत्याने दुर्लक्ष होत आहे. प्रशासनाच्या परवानगीशिवाय लोक विंधन विहिरी आणि कूपनलिका खोदतात. गंभीर बाब म्हणजे प्रशासनाकडे आपल्या भागातील बेकायदा विंधन विहिरी आणि कूपनलिकांची कोणतीही आकडेवारी उपलब्ध नाही.

राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाची याबाबतची आकडेवारी चिंताजनक आहे. २००६ ते २०१५ दरम्यान देशभरात कूपनलिका, विंधन विहिरींचे खड्डे आणि मॅनहोलमध्ये पडून १६ हजार २८१ लोकांचा मृत्यू झाला. या आकडेवारीच्या आधारे राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन दलाने (एनडीआरएफ) म्हटले होते की देश दहशतवादी घटनांपेक्षा अशा अपघातांमध्ये अधिक नागरिक गमावत आहे. एक मूल विंधन विहिरीत पडल्यानंतर लष्कर आणि 'एनडीआरएफ' बचावकार्यात हतबल ठरत असल्याचे दिसून येते. ही बाबही चिंताजनक आहे. चंद्रावर अवकाशयान उतरवणाऱ्या भारताकडे चीनसारखे स्वयंचलित तंत्रज्ञान का नाही, असा प्रश्न पडतो. अशा अपघातांमधील सर्वच मुले हरयाणाच्या प्रिन्ससारखी नशीबवान नसतात. कूपनलिका आणि विंधन विहिरीचे अपघात रोखण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात विशेष दक्षता घेणे आवश्यक आहे. सर्व विंधन विहिरी आणि कूपनलिका नियमितपणे तपासल्या पाहिजेत. निष्काळजीपणा करणाऱ्यांवर कडक कारवाई केली पाहिजे. या दुर्घटनेवर मगरीचे अश्रू ढाळण्याऐवजी प्रशासनाच्या सतर्कतेने धोका बऱ्याच अंशी कमी होऊ शकतो. ✻✻

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, **संपादकीय विभाग**-email : krushivalnews@gmail.com / **जाहिरात विभाग**- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(✻ या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)